CMYK

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा

SOLAPUR TARUN BHARAT

सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित

सदाफुलीसह

लातूर | बुधवार, २२ एप्रिल २०२६ । वर्ष ४ थे अंक ४५ । पाने १२+८ । किंमत रु. ८/- ■ RNI No. MAHMAR/2023/86477 ■ Postal Regd No. SLP/32/2024-2026.

dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com




आजचा सामना

लखनौ वि. राजस्थान

वेळ : सायं. ७.३० वाजता

ठिकाण : लखनौ

## विचारपुष्प



एक कार्यकर्ता म्हणून व्यक्तीचे व्यक्तिमत्त्व असते तसेच कार्यकर्त्यांच्या संचाचेही एक व्यक्तिमत्त्व असते, प्रतिमा असते. आपल्या पद्धतीने आपले काम प्रगतिपथावर नेण्याचा आपला प्रयत्न असतो. आपल्या शाखेचे काम वाढवताना, विशिष्ट पद्धतीनेच आपल्या शाखेचा विकास व्हावा याचे भान ठेवावेच लागते. संघकार्य करणाऱ्या सर्वच कार्यकर्त्यांनी याच विशिष्ट पद्धतीने चिंतन आणि काम करणे आवश्यक आहे.

**सुरेशराव केतकर**
रा. स्व. संघाचे पूर्व सह सरकार्यवाह

# करार की युद्ध इराणने ठरवावे

### शांतता चर्चेवरील विलंबावर ट्रम्प यांचा इशारा ● संघर्षविरामाला मुदतवाढ नाही; हल्ले सुरू करणार



◆ **वॉशिंग्टन, २१ एप्रिल**

संघर्षविरामाची मुदत २२ एप्रिल रोजी संपणार असून, त्यानंतर मुदतवाढ दिली जाणार नाही. करार करायचा की युद्ध सुरू ठेवायचे हे इराणवर अवलंबून आहे. संघर्षविरामाची मुदत संपल्यानंतर आम्ही हल्ले सुरू करणार आहोत. त्यांच्या बहुतांश मागण्या आम्ही मान्य केल्या आहे. त्यात आता तडजोड केली जाणार नाही, अशा शब्दात राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणला पुन्हा धमकी दिली आहे.

शांततेची मुदत आता संपली आहे. कोणत्याही परिस्थितीत २२ एप्रिलच्या मध्यरात्रीनंतर संघर्षविराम वाढवला जाणार नाही आणि इराणवर हल्ले सुरू केले जातील, असे ट्रम्प यांनी समाज माध्यमावरील पोस्टमध्ये म्हटले आहे. राजनैतिक वाटाघाटींसाठी अधिक वेळ देणे शक्य नाही. आमच्याकडे तेवढा वेळ नाही. अमेरिका सध्या वाटाघाटींमध्ये खूप मजबूत स्थितीत आहे आणि गेल्या ४७ वर्षांत कोणत्याही राष्ट्राध्यक्षाने जे केले नाही ते आम्ही करत आहोत.

इराणकडे करार केल्याशिवाय पर्याय नाही. इराणने प्रस्तावित करारासंदर्भात होकार दिल्यास आमचे शिष्टमंडख पाकिस्तानकडे रवाना होईल. त्यांनी आधीच विलंब केला आहे, करार करायचा की युद्ध सुरू ठेवायचे हे इराणवर अवबंबून आहे. दरम्यान चर्चेसाठी मध्यस्थी करणाऱ्या पाकिस्तानातील एका अधिकाऱ्याने सांगितले की, बुधवारी सकाळी अमेरिकेचे उपराष्ट्राध्यक्ष जे.डी. व्हान्स आणि इराणचे संसद अध्यक्ष मोहम्मद गालिबाफ यांच्या नेतृत्वातील शिष्टमंडळ इस्लामाबादमध्ये दाखल होणार आहे. मात्र इराणकडून अद्याप पुष्टी करण्यात आलेली नाही. ◂(वृत्तसंस्था)

#### इराकी मिलिशियांना हल्ल्याची मोकळीक

**अमेरिकेकडून शांतता चर्चेसाठी पुढाकार घेतला असताना दुसरीकडे इराण मात्र संघर्षासाठी डावपेच आखत असल्याची माहिती समोर आली आहे. इराकमध्ये कार्यरत असलेल्या इराण समर्थित मिलिशिया गटांना अमेरिकेच्या सैन्यावर हल्ल्याची मोकळीक देण्यात आली. आम्हाला केंद्रीय आदेशाचा सल्ला न घेता कारवाई करण्याचा अधिकार देण्यात आल्याचे मिलिशिया गटाच्या कमांडरने संदेशात म्हटले आहे.** ■

#### अद्याप प्रतिसाद नाही

**व्हाईट हाऊसच्या अधिकाऱ्याने सांगितले आहे की, उपराष्ट्राध्यक्ष जे. डी. व्हान्स शांतता चर्चेसाठी अमेरिकन शिष्टमंडळाचे नेतृत्व करणार आहे. परंतु इराणने ते कोणाला पाठवणार हे सांगितलेले नाही. शांतता चर्चा आणि करारासंदर्भात त्यांच्याकडून प्रतिसाद मिळालेला नाही.** ■

#### धमक्या देऊन चर्चा शक्य नाही : गालिबाफ

इराणचे संसद अध्यक्ष मोहम्मद गालिबाफ यांनी ट्रम्प यांनी दिलेल्या धमकीवर प्रत्युत्तर देताना म्हटले की, अमेरिका वाटाघाटीच्या आड आम्हाला शरण आणण्याचा डाव रचत आहे. एकीकडे धमक्या आणि दुसरीकडे चर्चा शक्य नाही. इराणने युद्धाच्या मैदानात शत्रूवर कशी मात करायची, याची रणनीती आखली आहे. ■

# यंदा भारताची अर्थव्यवस्था ६.४ टक्क्यांवर जाणार

### संयुक्त राष्ट्रसंघाचा अंदाज



◆ **न्यू यॉर्क, २१ एप्रिल**

भारताची अर्थव्यवस्था या वर्षी ६.४ टक्के आणि २०२७ मध्ये ६.६ टक्के दराने वाढण्याचा अंदाज संयुक्त राष्ट्रसंघाने वर्तवला आहे. दक्षिण आणि नैऋत्य आशियातील अर्थव्यवस्थांची वाढ २०२५ मध्ये ५.४ टक्क्यांनी झाली. ही वाढ २०२४ मधील ५.२ टक्क्यांच्या तुलनेत अधिक असून, प्रामुख्याने भारतातील भक्कम वाढीमुळे ती साध्य झाली, असे संयुक्त राष्ट्रसंघाच्या आशिया आणि प्रशांतसाठी आर्थिक व सामाजिक आयोगाने सोमवारी प्रसिद्ध केलेल्या अहवालात म्हटले आहे.

ग्रामीण अर्थव्यवस्थांकडून मजबूत उपभोग तसेच वस्तू आणि सेवा कराच्या दरातील कपात आणि अमेरिकेच्या शुल्काची अंमलबजावणी होण्यापूर्वीच निर्यातीला दिलेल्या गतीच्या बळावर २०२५ मध्ये भारताची आर्थिक वाढ किंचित वाढून ७.४ टक्क्यांवर पोहोचली, असे आशिया आणि प्रशांतच्या आर्थिक सर्वेक्षण-२०२६ या शीर्षकाच्या अहवालात नमूद करण्यात आले आहे. ◂(वृत्तसंस्था)

#### सेवा क्षेत्राचा मोठा वाटा

भारतात ऑगस्ट २०२५ मध्ये ५० टक्के शुल्काची अंमलबजावणी झाल्यावर अमेरिकेला होणाऱ्या निर्यातीत २५ टक्क्यांची घट झाल्यामुळे,२०२५ च्या उत्तरार्धात आर्थिक घडामोडींचा वेग मंदावला. सेवा क्षेत्र मात्र विकासाचे एक प्रमुख चालक म्हणून कायम राहिले, असे त्यात नमूद करण्यात आले आहे. ■

## महत्त्वाचे

### पंतप्रधानांविरुद्ध काँग्रेसची नोटीस

**नवी दिल्ली :** काँग्रेसचे सरचिटणीस केसी वेणुगोपाल यांनी मंगळवारी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याविरोधात लोकसभेत विशेषाधिकार भंगाची नोटीस दिली आहे. त्यांनी ही नोटीस नियम २२२ अंतर्गत दिली आहे. त्यांनी लोकसभा सभापती ओम बिर्ला यांना लिहिलेल्या पत्रात म्हटले की, पंतप्रधानांनी राष्ट्राला उद्देशून केलेल्या भाषणात विरोधी खासदारांच्या मतांवर आणि त्यांच्या हेतूंवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. हे नियमांच्या विरोधात आहे. १८ एप्रिल रोजी पंतप्रधानांनी देशाला केलेल्या संबोधनात विरोधी पक्षांवर महिला आरक्षण विधेयक रोखल्याचा आरोप केला. खासदारांच्या मतदान पद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. हे प्रकरण लोकसभेच्या विशेषाधिकार समितीकडे पाठवून पंतप्रधानांविरोधात कारवाई सुरू करावी अशी मागणी केली. ■

### पाकिस्तानचे हवाई क्षेत्र २४ मेपर्यंत बंद

**इस्लामाबाद :** पाकिस्तानने मंगळवारी भारतीय विमानांना आपली हवाई हद्द वापरण्यावर असलेली बंदी एक महिन्यासाठी वाढवली. पाकिस्तानने २४ एप्रिल २०२५ पासून भारतीय विमानांसाठी आपली हवाई हद्द बंद ठेवली आहे. या निर्णयामुळे भारतीय विमान कंपन्यांना अब्जावधी रुपयांचे नुकसान झाल्याचे वृत्त आहे. भारतात नोंदणीकृत असलेली, भाडेतत्त्वावर घेतलेली, व्यावसायिक आणि लष्करी अशी सर्व विमाने २४ मे २०२६ रोजी पहाटे पाच वाजेपर्यंत पाकिस्तानी हवाई क्षेत्रात प्रवेश करण्यास प्रतिबंधित राहतील, असे पाकिस्तान विमानतळ प्राधिकरणाने जारी केलेल्या नोटाममध्ये म्हटले आहे. मागील सूचना २४ एप्रिल रोजी संपण्यापूर्वी ही सूचना जारी करण्यात आली. पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर निर्माण झालेल्या तणावाच्या पार्श्वभूमीवर पाकिस्तानने भारतीय विमान कंपन्यांसाठी आपली हवाई हद्द बंद केली. पाकिस्तानने भारतावर अशा प्रकारचे निर्बंध लादण्याची ही पहिलीच वेळ आहे.

### देवस्थान इनाम जमिनींसाठी कायद्याची तयारी

**मुंबई :** राज्यातील देवस्थान इनाम जमिनींचा दीर्घकाळ प्रलंबित असलेला प्रश्न सोडविण्यासाठी राज्य सरकारने महत्त्वाचे पाऊल उचलले असून, येत्या विधिमंडळ अधिवेशनात यासंदर्भात स्वतंत्र कायदा करण्याची तयारी सुरू आहे. महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी याबाबत माहिती देताना सांगितले की, प्रस्तावित कायद्याचा मसुदा लवकरच संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येणार असून, नागरिकांना त्यावर हरकती व सूचना नोंदविण्याची संधी दिली जाणार आहे. रत्नागिरी जिल्ह्यातील चिपळूण तालुक्यातील ऐतिहासिक पेढे परशुराम देवस्थानच्या इनामी जमिनींबाबत सुरू असलेल्या प्रलंबित प्रश्नाच्या पार्श्वभूमीवर मंत्रालयात झालेल्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. बैठकीला आमदार शेखर निकम, जिल्हाधिकारी मनुज जिंदाल तसेच महसूल विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. राज्यातील फळबागायतदारांसाठीही दिलासादायक निर्णय घेण्यात आला आहे. फळबागांचे 'पीकपाणी' नोंद दरवर्षी करण्याऐवजी दर तीन वर्षांनी करण्याचा प्रस्ताव सादर करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. यामुळे शेतकऱ्यांचा प्रशासकीय त्रास कमी होणार आहे.

# सक्तीच्या धर्मांतरात निदा खानचा सहभाग

### टीसीएस प्रकरण, पोलिस आरोपीच्या मागावर

◆ **नाशिक, २१ एप्रिल**

टीसीएसमधील लैंगिक छळ आणि सक्तीच्या धर्मांतर प्रकरणात तेथील कर्मचारी निदा खानचा प्रत्यक्ष सहभाग असल्याचे तपासात समोर आले आहे. एका वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्याने मंगळवारी सांगितले की, तिची भूमिका कंपनीच्या नाशिक युनिटमध्ये घडलेल्या सक्तीच्या धर्मांतराशी संबंधित आहे. ती सध्या फरार असून पोलिस तिच्या मागावर आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, टीसीएस या बहुराष्ट्रीय कंपनीत झालेला लैंगिक छळ आणि सक्तीच्या धर्मांतर प्रकरणात आतापर्यंत आठ जणांना अटक करण्यात आली आहे. पोलिस या प्रकरणाच्या तळाशी जाण्याचा प्रयत्न करत आहे. या प्रकरणाचा तपास करण्यासाठी लैंगिक छळ प्रतिबंधक समितीमध्ये स्थानिक सदस्यांचा




समावेश असावा. त्यांनी केवळ व्हिडिओ कॉन्फरन्सवर अवलंबून न राहता वारंवार प्रत्यक्ष भेटून चर्चा करायला हवी. या प्रकरणात दाखल करण्यात आलेल्या नऊ एफआयआरपैकी एकात निदा खानचे नाव इतर चार जणांसह आरोपी म्हणून समाविष्ट करण्यात आले आहे.

**सत्र न्यायालयाने फेटाळला अटकपूर्व जामीन**

हे प्रकरण उघडकीस आल्यापासून फरार असलेल्या निदा खानला सोमवारी सत्र न्यायालयाकडून अटकेपासून अंतरिम संरक्षण मिळवण्यात अपयश आले. न्यायालयाने तिच्या अटकपूर्व जामीन अर्जावरील सुनावणी २७ एप्रिलला निश्चित केली आहे. ◂(वृत्तसंस्था)

# प्रचारतोफा थंडावल्या

### भाजपासमोर तृणमूलचे आव्हान

◆ **कोलकाता, २१ एप्रिल**

पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यासाठी १६ जिल्ह्यांतील १५२ विधानसभा मतदारसंघांत गुरुवारी मतदान होईल. या मतदारसंघांमध्ये एकूण १,४७८ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात आहेत. पहिल्या टप्प्यासाठी मंगळवारी प्रचारतोफा थंडावल्या.

यानंतर दुसऱ्या टप्प्यासाठी २९ एप्रिल रोजी मतदान होईल. ४ मे रोजी निकाल जाहीर केला जाईल. या निवडणुकीत सत्ताधारी तृणमूल काँग्रेस आणि भाजपा या दोन्ही पक्षांमध्ये लढत आहे. काँग्रेससह डावे पक्ष शर्यतीत नाहीत. ममता बॅनर्जी २०११ मध्ये मुख्यमंत्री झाल्या तेव्हापासून त्या पदावर आणि सत्तेत कायम आहेत. भाजपाने ममता बॅनर्जी यांचा पराभव करण्यासाठी २०२१ मध्ये खूप प्रयत्न केले. मात्र, त्यांना यश मिळाले नाही. आता पुन्हा एकदा भाजपाने ममता बॅनर्जींना पराभूत करण्यासाठी जोरदार ताकद लावली आहे. ◂(वृत्तसंस्था)

# अपघाताचे सत्य बाहेर आणणारच : मुख्यमंत्री

### सुनेत्रा पवारांना रेकॉर्ड ब्रेक मतांनी निवडून देण्याचे आवाहन

◆ **बारामती/पुणे, २१ एप्रिल**

बारामतीत होत असलेल्याविधानसभेच्या पोटनिवडणुकीत सुनेत्रा पवार यांना विक्रमी मतांनी निवडून देण्याचे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. ही निवडणूक राजकीय नसून दादांच्या कार्याला आदरांजली अर्पण करण्याची संधी असल्याचे त्यांनी सांगितले. अजित पवार यांच्या अपघाताबाबतचे सत्य बाहेर येईपर्यंत शांत बसणार नाही, असेही फडणवीस यावेळी म्हणाले.

बारामती पोटनिवडणुकीच्या प्रचार सांगता सभेत मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते. यावेळी त्यांनी मतदारांना भावनिक साद घातली. तसेच बारामतीतील विकासकामांचा उल्लेख करीत अजित पवार यांनी केलेल्या विकास कामांचे कौतुक केले. यावेळी केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले, मंत्री छगन भुजबळ, उद्योग मंत्री उदय सामंत, कृषीमंत्री दत्तात्रय भरणे, हसन मुश्रिफ, संजय बनसोडे, खासदार प्रफुल्ल पटेल, सुनील तटकरे, पार्थ पवार आणि जय पवार आदी उपस्थित होते. सभेपूर्वी मुख्यमंत्री फडणवीस यांनी अजित पवार यांच्या स्मृतीस्थळाला भेट देऊन अभिवादन केले. महाराष्ट्राच्या परंपरेनुसार ज्येष्ठ नेत्यांच्या निधनानंतर होणाऱ्या पोटनिवडणुका बहुतांशी बिनविरोध होतात. त्यानुसार विविध पक्षांनी एकत्र येत सुनेत्रा पवार यांना पाठिंबा दिला आहे. शरद पवार यांनीही फोन करून पाठिंबा दर्शविल्याचे यावेळी फडणवीस यांनी नमूद केले. काँग्रेसने उमेदवार न देण्याचा घेतलेला निर्णय ही राज्याच्या राजकीय संस्कृतीची जपणूक असल्याचे त्यांनी सांगितले.



प्रचाराच्या शेवटच्या दिवशी झालेल्या सभेला उपस्थित मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उमेदवार सुनेत्रा पवार व पदाधिकारी

**सुनेत्रा वहिनींमध्ये दादांची सर्व स्वप्न पूर्ण करण्याची क्षमता**

राज्यातील विक्रमी मतांनी निवडून येण्याचे रेकॉर्ड दादा करत होते. त्यांच्या पश्चात हा रेकॉर्ड पुन्हा एकदा झाला पाहिजे. दादांच्या मागे वहिनींनी स्वतःचे दु:ख बाजूला सारुन जनतेच्याप्रती कर्तव्य भावनेस प्राधान्य दिले. त्यांचे सामाजिक काम मोठे असून राजकारण त्यांनी जवळून पाहिले आहे. उपमुख्यमंत्री झाल्यापासून वहिनींचे कामाची क्षमता मी पाहिली असून दादांची सर्व स्वप्न पूर्ण करण्याची क्षमता सुनेत्रावहिनी यांच्यात आहे, असे मुख्यमंत्री यावेळी म्हणाले. ◂(तभा वृत्तसेवा)

#### पारदर्शक चौकशी व्हावी : सुनेत्रा पवार

अजित पवार यांच्या विमान अपघाताबाबत पारदर्शक चौकशी होऊन सत्य समोर यावे आणि दोषींवर कठोर कारवाई व्हावी, अशी मागणी उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी बारामतीत केली. बारामती पोटनिवडणुकीच्या प्रचाराच्या सांगता सभेत त्यांनी प्रथमच या प्रकरणावर जाहीर भाष्य केले. तसेच ही निवडणूक केवळ माझी नसून प्रत्येक बारामतीकरांची आहे. २३ एप्रिल रोजी नागरिकांनी मतदानाचा हक्क बजावून विकासाला साथ द्यावी, असे आवाहनही सुनेत्रा पवार यांनी केले. बारामती पोटनिवडणुकीच्या प्रचार सांगता सभेत त्या बोलत होत्या. ■




पवित्र पंचमुखी उत्सव पालखीचे मंगळवारी आगमन झाले. हा उत्सव सोहळा पाहण्यासाठी हजारो भाविक उपस्थित होते. 'हर हर महादेव' असा गजर करीत पालखीचे स्वागत करण्यात आले. केदारनाथ मंदिराचे बुधवारी सकाळी आठ वाजता कपाट उघडणार आहे

# शांततेच्या आशेने बाजार तेजीत

◆ **मुंबई,२१ एप्रिल**

भारतीय शेअर बाजारात सलग तिसऱ्या दिवशी तेजीचे सत्र पाहायला मिळाले. मंगळवारी बाजार बंद होताना सेन्सेक्स ७५३.०३ अंकांच्या वाढीसह ७९,२७३.३३ वर पोहोचला, तर निफ्टीमध्ये २११.७५ अंकांची वाढ होऊन तो २४,५७६.६० वर स्थिरावला. अमेरिका आणि इराण यांच्यात पुन्हा एकदा चर्चेची फेरी होणार असल्याच्या वृत्तामुळे जागतिक स्तरावर संघर्षाचे ढग विरतील, अशी आशा निर्माण झाली आहे. या सकारात्मक संकेतांमुळे बाजारात चौफेर खरेदी झाली.

निर्देशांकांतही मोठी वाढ नोंदवण्यात आली. यामध्ये निफ्टी मिडकॅप ०.५ टक्क्यांनी, तर स्मॉलकॅप निर्देशांक १ टक्क्यांनी वधारला. निफ्टीच्या आघाडीच्या समभागांमध्ये नेस्ले इंडिया, हिंदुस्थान युनिलिव्हर, ट्रेंट, आयसीआयसीआय बँक आणि बजाज फायनान्स यांचा समावेश होता. दुसरीकडे एसबीआय लाइफ इन्शुरन्स, भारत इलेक्ट्रॉनिक्स, जिओ फायनान्शिअल, डॉ. रेड्डीज लॅब्स आणि टायटन कंपनी या समभागांमध्ये घसरण दिसून आली. तज्ज्ञांच्या मते, निफ्टीला आता २४,६६० ते २४,७०० या स्तरांवर अडथळा येऊ शकतो. जर निफ्टीने २४,७०० ची पातळी ओलांडली, तर हा निर्देशांक २४,९५० पर्यंत जाण्याची शक्यता आहे. ◂(तभा वृत्तसेवा)

#### रुपयाची स्थिरता महत्त्वाची

आगामी काळात गुंतवणूकदारांचे लक्ष प्रामुख्याने कंपन्यांचे तिमाही निकाल, अमेरिका-इराण संघर्षातील घडामोडी आणि कच्च्या तेलाच्या किमतींवर असेल. सद्यस्थितीत जागतिक बाजारपेठेतील सकारात्मक वातावरण आणि रुपयाची स्थिरता भारतीय बाजारासाठी पूरक ठरत आहे. ■



# पहलगाम विसरलेलो नाही; मर्यादा ओलांडल्यास प्रत्युत्तर

### भारतीय लष्कराचा पाकिस्तानला इशारा

◆ **श्रीनगर, २१ एप्रिल**

भारतीयांचे हृदय पिळवटून टाकणाऱ्या काश्मिरातील पहलगाम येथील दहशतवादी हल्ल्याची बुधवारी २२ एप्रिल रोजी वर्षपूर्ती आहे. या पृष्ठभूमीवर सुरक्षा यंत्रणां सतर्क असून, काश्मीरमधील सर्व पर्यटन स्थळांवर सुरक्षा वाढवण्यात आली आहे. अशातच भारतीय लष्कराने प्रसिद्ध केलेल्या पोस्टमधून भारत विसरलेला नाही, मर्यादा ओलांडल्यास सडेतोड प्रत्युत्तर दिले जाईल, असा इशारा पाकिस्तानला दिला आहे.

पहलगाम हल्ल्याला प्रत्युत्तर देण्यासाठी भारताने राबवलेल्या ऑपरेशन सिंदूरचे एक छायाचित्र प्रसिद्ध करीत भारतीय लष्कराने पोस्टमध्ये म्हटले की, भारत काहीही विसरत नाही. जेव्हा माणुसकीच्या



मर्यादा ओलांडल्या जातात, तेव्हा प्रत्युत्तर हे निर्णायक असते. भारत कधीही हल्ले विसरत नाही. ज्या निष्पाप लोकांचा बळी घेतला गेला, त्यांना न्याय देण्यात आला आहे. भारत एकसंध आहे आणि देशांच्या सीमांचे रक्षण करण्यासाठी नेहमीच तत्पर आहे. कुठलीही चूक झाल्यास शत्रूला तितक्यात ताकदीने प्रत्युत्तर दिले जाईल. पाकिस्तानातून आलेल्या काही दहशतवाद्यांनी जम्मू काश्मीरच्या पहलगाममध्ये सामान्य नागरिकांवर हल्ला केला. या भ्याड हल्ल्यात २६ निष्पाप भारतीयांचा बळी गेला. ऑपरेशन सिंदूरमधून आणि काश्मिरात राबविण्यात आलेल्या मोहिमेतून हल्ल्यासाठी जबाबदार असलेल्यांना शिक्षा देण्यात आली. ◂(वृत्तसंस्था)

#### सुरक्षेत बदल, विशेष दलांची स्थापना

पहलगाम हल्ल्यानंतर जम्मू-काश्मीर पोलिसांनी सुरक्षेत मोठे बदल करीत डोंगराळ भागात दोन विशेष दलांची स्थापना केली आहे. बर्फाळ प्रदेशात अतिउंच ठिकाणी वास्तव्य करणाऱ्या 'स्नो लिओपार्ड' व 'मार्खोर' या दोन प्राण्यांची नावे विशेष दलांना देण्यात आली आहे. 'स्नो लिओपार्ड' दलाला अति उंचीवर ऑपरेशन्स करण्याचे, तर 'मार्खोर' दलाला घनदाट जंगलात ऑपरेशन्सचे प्रशिक्षण देण्यात आले आहे. भारतीय लष्कराने देखील स्वतःच्या क्षमता वाढवण्यावर भर दिला आहे.

#### २२ एप्रिलला काय घडले ?

२२ एप्रिल २०२५ ला मिनी स्वित्झर्लंड म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पहलगाममध्ये दहशतवाद्यांनी भ्याड हल्ला करत मृत्यूचे तांडव केले. दहशतवाद्यांनी निष्पाप पर्यटकांना लक्ष्य करून बेछूट गोळीबार केला. या हल्ल्यात २६ निरपराध लोकांचा बळी गेला. या हृदयद्रावक घटनेने संपूर्ण देशाला हादरवून सोडले. प्रत्युत्तरात भारताने ऑपरेशन सिंदूर सुरू केले. ६-७ मे रोजी पाकिस्तान आणि व्याप्त काश्मीरमधील अनेक दहशतवादी तळ उद्ध्वस्त केले.

# खडगेंच्या 'निसरड्या' जिभेचा प्रमाद

### घसरल्यावर मोदींना म्हटले दहशतवादी

◆ **नवी दिल्ली, २१ एप्रिल**

कुठेही घसरणाऱ्या आणि नंतर मागे वळणाऱ्या 'निसरड्या' जिभेच्या प्रमादामुळे काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खडगे मंगळवारी अडचणीत आले. एका पत्रकार परिषदेत खडगेंनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना दहशतवादी संबोधले. त्यानंतर एका पत्रकाराने या वक्तव्यामागील संदर्भ विचारताच, त्यांना आपल्या चुकीची जाणीव झाली. नरेंद्र मोदी लोकांना आणि राजकीय पक्षांना भयभीत करीत आहेत. त्यांना मी दहशतवादी म्हटलेले नाही, अशी सारवासारव त्यांनी केली.

खडगेंनी केलेल्या वक्तव्याचा भाजपाने तीव्र निषेध केला. त्यांनी काँग्रेस पक्ष शहरी नक्षलवादी असल्याचे म्हटले. ◂(वृत्तसंस्था)

> खडगे यांची टिप्पणी काँग्रेसने जाणीवपूर्वक आखलेला कट आहे. राहुल गांधींच्या सांगण्यावरून खडगे यांनी मोदींचा दहशतवादी असा उल्लेख केला. काँग्रेस नेते ओसामा बिन लादेनला ओसामा जी म्हणतात आणि देशाच्या पंतप्रधानांना दहशतवादी संबोधतात. यातून त्यांची मानसिकता किती खालच्या स्तरावर गेली हे दिसून येते.
>
> **- संबित पात्रा,** भाजपा नेते

## महत्वाचे...



### ५० वर्षांपूर्वीचा आणि नंतरच्या समाजामधील बदल लक्षात घ्या

**सोलापूर, दि. २१ एप्रिल-**

येथील पद्मशाली समाज ५० वर्षांपूर्वी कसा होता आणि त्यानंतर कसा बदलत गेला, हे प्रामुख्याने लक्षात घेतले पाहिजे, असे प्रतिपादन पद्मशाली शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष प्रा. श्रीनिवास कोंडी यांनी केले. श्री मार्कंडेय सोशल फाउंडेशन, पद्मशाली सखी संघम आणि पूर्व विभाग सार्वजनिक वाचनालय यांच्या सहकार्याने पूर्व विभाग सार्वजनिक वाचनालयाच्या विणकर सभागृहात पद्मशाली समाजात सध्याचे ज्वलंत उदाहरण घटस्फोट आणि लग्नाळूंच्या अपेक्षा या विषयावर चर्चासत्रेचे आयोजनप्रसंगी ते बोलत होते.

**पद्मशाली शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष प्रा. श्रीनिवास कोंडी यांचे प्रतिपादन**

यावेळी माजी ज्येष्ठ नगरसेवक पांडुरंग दिड्डी, नुकतेच न्यायाधीशपदी निवड झालेले नागेश कोंडा, निवृत्त पोलीस निरीक्षक बाबू गंधमल, कवी प्रा. नरेंद्र गुंडेली, फाउंडेशन व सखी संघमचे संस्थापक गौरीशंकर कोंडा, पद्मशाली पुरोहित संघाचे माजी अध्यक्ष देवीदास अन्नलदास, फाउंडेशनचे सल्लागार सुकुमार सिध्दम, आदी उपस्थिती होते. ते म्हणाले, पूर्वी प्रत्येक घरात ज्येष्ठ कर्ता व्यक्ती होता. त्यांना ताता (आजोबा), पेद्दनाना (मोठेवडील), वडील (नायना - अण्णा), काका, दादा, भाऊ अशाप्रकारे एकतरी व्यक्ती कुटूंब प्रमुख होता. त्यांना त्या टोपण नावाने हाक मारायचे. त्यांच्या शब्दाला मान होता. धाक व धराराही होता. त्यांनी आखलेल्या 'लक्ष्मण रेषा' पार करायचे म्हटले तर, कुटूंबातील प्रत्येक सदस्याला एकप्रकारे 'भिती' असायचे. पूर्वी एकत्रित कुटूंब आणि आर्थिक सुबत्ता होती. परंतू, आर्थिक प्रश्न आणि इगो मुळे विभक्त कुटूंब वाढून एकप्रकारे 'स्वातंत्र्य' मिळाल्याचे समाधान, तसेच 'विचार' करण्याचे स्वातंत्र्यही मिळाले. संसार म्हणजे भांडणे होत असायचे. पूर्वी वडीलधारी माणसे समजावून सांगायचे. सध्याच्या जमान्यात ज्येष्ठांचे कोणीही ऐकत नसल्याने घटस्फोटाचे प्रमाण आणि लग्नाळूंच्या अपेक्षा वाढले आहेत.

### उदयकिर्ती 'अर्बन'च्या चेअरमनपदी माने; व्हाईस चेअरमनपदी अंबुरे

**मोडनिंब, दि. २१ एप्रिल-**

मोडनिंब येथील उदयकिर्ती अर्बन को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटीच्या चेअरमन पदी उदय माने तर व्हाईस चेअरमनपदी दत्तात्रय अंबुरे यांची निवड झाली आहे. उदय माने चेअरमन व व्हाईस चेअरमन पदाची निवडणूक नुकतीच पार पडली. निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून सुहास शिंगाडे यांनी काम पाहिले. यावेळी विशेष सभा पार पडली. उदयकिर्ती अर्बन को-ऑपरेटिव्ह केडिट सोसायटीची आर्थिक स्थिती मजबूत आहे. ठेवीला आम्ही १२ टक्के व्याजदर देत आहोत. सुमारे ११ कोटी रूपयांचा मिश्र व्यवसाय पूर्ण केला आहे. पिग्मी सुविधा, एसएमएस सेवा, पेन्शन योजना, रिकरिंग ठेव अशा सक सुविधा आम्ही उपलब्ध करून दिल्या आहेत, अशी माहित नूतन चेअरमन उदय माने यांनी दिली. यावेळी आकाश उदय माने, संतोष कोरडे, अभिजित गिड्डे, अनमोल शेलार, उज्वला शहा, शुभांगी माने, सुहास ताकतोडे, नागनाथ पवार, सायली माने या नूतन संचालकांसह व्यवस्थापक साईप्रसाद काळे व सदस्य उपस्थित होते.



### 'वालचंद'च्या होस्टेलमधून लॅपटॉपची चोरी

**सोलापूर, दि.२१ एप्रिल-**

वालचंद कॉलेजच्या बॉईज होस्टेलमधून एका विद्यार्थ्याचा ६० हजार रुपये किंमतीचा लॅपटॉप चोरीस गेल्याची घटना घडली. याबाबत यश सचिन कन्याप्पा (वय-२०, रा.वालचंद कॉलेज बॉइज हॉस्टेल, सोलापूर ) याने जेलरोड पोलिस ठाण्यात फिर्याद दाखल केली. यातील फिर्यादी हा वालचंद कॉलेजच्या बॉईज हॉस्टेल क्रमांक दोन मधील रुम क्रमांक २३ मध्ये मित्रासोबत राहण्यास असताना दि.१७ एप्रिल रोजी सकाळी अज्ञात चोरट्याने रुममध्ये प्रवेश करुन एच पी विक्टस मॉडेलचा ६० हजार रुपये किंमतीचा लॅपटॉप चोरुन नेला.

### मंदिरातील दिव्याने भाजून जखमी झालेल्या वृद्ध महिलेचा अखेर मृत्यू

**सोलापूर, दि. २१ एप्रिल -**

मंदिरात पेटविलेल्या दिव्याने साडीला आग लागून भाजलेल्या वृद्ध महिलेचा उपचारादरम्यान येथील शासकीय रुग्णालयात आज मंगळवारी सकाळी साडेसात वाजता मृत्यू झाला. छोटी गौराबाई नागप्पा अण्णारेड्डी (वय ८० वर्ष ,राहणार मौलाली चौक, सोलापूर) असे त्या मयत महिलेचे नाव असून त्या दोन एप्रिल रोजी दुपारी राहत्या घराजवळील दुर्गा माता मंदिरात पेटविलेल्या दिव्याने साडी पेटून जखमी झाल्या होत्या. त्यांना उपचाराकरता खाजगी दवाखान्यात नेऊन येथील शासकीय रुग्णालयात मदतनीस सैफन शेख यांनी दाखल केले असता त्यांचा उपचारादरम्यान आज सकाळी मृत्यू झाला.

### मधुमित्र आणि मधुसखी पुरस्कारासाठी नामांकन सादर करा

**सोलापूर, दि. २१ एप्रिल -**

महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळाच्या वतीने वर्ष २०२६ सालासाठी 'मधुमित्र' आणि 'मधुसखी' पुरस्कारांची घोषणा करण्यात आली असून, यासाठी पात्र मधपाळांकडून नामांकने मागवण्यात आली आहेत. मधमाशीपालन व्यवसायाला चालना देणे आणि या क्षेत्रातील कष्टकरी मधपाळांना प्रोत्साहन देणे, हा या पुरस्कारांचा मुख्य उद्देश आहे. गेल्या तीन वर्षांपासून मंडळाने ही कौतुकास्पद योजना राबवण्यास सुरुवात केली आहे.या पुरस्कार योजनेअंतर्गत मधमाशीपालन क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या यशस्वी मधपाळांची निवड करण्यात येणार आहे. यामध्ये प्रथम, द्वितीय आणि तृतीय अशा तीन श्रेणींमध्ये पुरस्कार दिले जातील. विशेष म्हणजे, महिला मधपाळांच्या कर्तृत्वाची दखल घेण्यासाठी एक पुरस्कार महिलांसाठी राखीव ठेवण्यात आला आहे. पुरस्काराचे स्वरूप खालीलप्रमाणे असेल. प्रथम पुरस्कार: ११,००० रुपये, द्वितीय पुरस्कार: ७,००० रुपये, तृतीय पुरस्कार: ५,००० रुपये, हे सर्व पुरस्कार २० मे २०२६ रोजी 'जागतिक मधमाशी दिना'चे औचित्य साधून पुणे येथे आयोजित समारंभात प्रदान केले जाणार आहेत.

# शक्तीसोबत भक्तीही आवश्यक : सरसंघचालक डॉ.मोहनजी भागवत

### माँ सौंदर्या चिन्मयी मंदिराचे लोकार्पण

**आगरतळा, २१ एप्रिल**

ज्ञान म्हणजे केवळ बोलणे नव्हे; ज्ञान म्हणजे समज. मागील दोन हजार वर्षांत संपूर्ण जगाने विज्ञानापासून ते समाजवादापर्यंत अनेक तत्त्वज्ञानांचे प्रयोग अनुभवले आहेत. परंतु, आज जगाला भारताच्या जीवनाकडे पाहण्याच्या दृष्टिकोनाची गरज आहे, याची जाणीव जगाला होत आहे. म्हणूनच आज जगाला भारताची आवश्यकता आहे. शक्तीसोबतच भक्तीही आवश्यक असते, असे प्रतिपादन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत यांनी मंगळवारी केले. डॉ. मोहनजी भागवत यांच्या हस्ते पश्चिम त्रिपुरा जिल्ह्यातील मोहनपूर उपविभागाच्या अंतर्गत येणाऱ्या फकीरपुरा गावात आदि शंकराचार्यांच्या शुभदिनी माँ त्रिपुरेश्वरीला समर्पित असलेल्या माँ सौंदर्य चिन्मयी मंदिराचे लोकार्पण करण्यात आले.



यावेळी सरसंघचालकांनी चिन्मय विद्यालयात पूर्णपणे मोफत शिक्षण देण्याच्या उद्देशाचे मनापासून कौतुक केले. सनातन धर्म संपूर्ण जगाला योग्य दिशा दाखवत आहे. मंदिरे ही भारतीय सामाजिक जीवनाची केंद्रे होती, असे डॉ. मोहनजी भागवत म्हणाले. आज सत्तेसोबतच भक्तीचीही आवश्यकता आहे. शिवाय सर्वांध्ये मिसळून सर्वांची सेवा करण्याची वृत्ती बाळगणाऱ्यांनाच समाज स्मरणात ठेवतो. हीच भारताची संस्कृती आहे. दक्षिणेकडील चार राज्ये सेवाकार्यात सर्वाधिक अग्रेसर आहेत. अनेक युगांपासून आपल्यामध्ये विविधता अस्तित्वात आहे. परंतु, भारताची ही प्रगती रोखण्यासाठी बाह्य शक्ती आपल्यात फूट पाडण्याचा प्रयत्न करीत असून, त्यापासून सर्वांनी सावध राहावे, असे आवाहन त्यांनी केले.

#### सत्याची प्रस्थापना करण्यासाठी सामर्थ्याची गरज

आजच्या युगात आपल्यापाशी केवळ सत्य असणे पुरेसे नाही, तर त्या सत्याची प्रस्थापना करण्यासाठी सामर्थ्याची आवश्यकता असते. भारताची शक्ती त्याच्या संस्कृतीमध्ये सामावलेली आहे. तथापि, भारताने कधीही आक्रमक मानसिकता बाळगलेली नाही. भारताने सातत्याने शांतता आणि बंधुभावाचा पुरस्कार केला, अशी शांतता जिची आजच्या युद्धग्रस्त जगात अत्यंत निकडीने गरज आहे. नेक्या याच क्षेत्रात भारत आपले कार्य अविरतपणे करीत आला आहे, असे डॉ. मोहनजी भागवत म्हणाले.

#### भारताची उपासना पद्धत अद्वितीय

भारताच्या ऋषिमुनींनी देशाच्या सामाजिक रचनेच्या कानाकोपऱ्यात, भारताने स्वीकारलेली ईश्वर उपासनेची ती अद्वितीय पद्धत रुजवण्याचे कार्य हाती घेतले आहे. एक अशी पद्धत, जिचे वैशिष्ट्य म्हणजे नद्या, टेकड्या आणि पर्वतांचा समावेश असलेल्या निसर्गाविषयी बाळगलेली सखोल आदरभावना होय. हा प्रचंड मोठा उपक्रम एका रात्रीत साध्य झाला नाही. ते उदात्त ध्येय साध्य करण्याची ती मोहीम एक अखंड चालणारी प्रक्रिया आहे, असे डॉ. मोहनजी भागवत यांनी सांगितले.

# खोटारड्यांची आता खैर नाही

### मुख्यमंत्री फडणवीस यांचे प्रतिपादन

**मुंबई, २१ एप्रिल**

महिला आरक्षण विधेयकाला विरोध करून नारीशक्तीचा आणि लोकशाहीचा अपमान करणाऱ्या सीरियल लायर्स विरोधकांची आता खैर नाही, अशा आक्रमक शब्दांत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विरोधकांवर घणाघाती हल्ला चढवला आहे.



जोपर्यंत देशाच्या संसदेत आणि विधानसभेध्ये ३३ टक्के महिला पोहोचणार नाहीत, तोपर्यंत या खोटारड्या विरोधकांना आम्ही शांतपणे झोपू देणार नाही, असा सज्जड दमही त्यांनी दिला आहे. मुंबईत युवाशक्ती जागर यात्रेच्या शुभारंभ प्रसंगी ते बोलत होते. कृष्णराज महाडिक यांच्या नेतृत्वात सुरू झालेल्या या युवाशक्ती जागर यात्रेच्या मंचावरून फडणवीसांनी विरोधकांचा खरपूस समाचार घेतला. संसदेत महिला आरक्षण बिलाची भ्रूणहत्या याच विरोधी पक्षाने केली असल्याची टीका त्यांनी केली. हे विरोधक म्हणजे सीरियल लायर्स (सराईत खोटारडे) असून ते दिवसातून पाच वेळा खोटं बोलतात, असा हल्लाबोल त्यांनी केला. २०२३ मध्ये जेव्हा हे विधेयक आले तेव्हा एनडीएकडे दोन तृतीयांश बहुत असल्यामुळे त्यांनी नाईलाजाने तोंड दाबून समर्थन केले होते. मात्र, आता बहुताचे गणित बदलल्याचे पाहताच त्यांनी आपले खरे दात दाखवले असून खऱ्या अर्थाने या बिलाला विरोध केला आहे.

डीलिमिटेशन आणि जनगणनेबद्दलही हे विरोधक रोज धादांत खोटे बोलत आहेत. नारीशक्तीला जागृत करून विरोधकांना धडा शिकवा! सभागृहामध्ये अमित शहा यांनी सर्व वस्तुस्थिती स्पष्ट करूनही या लोकांना महिलांना आरक्षण द्यायचेच नाही, असा थेट आरोप फडणवीसांनी केला.

# देशाच्या राजकारणात काही महिने चिंताजनक

### मोहोळच्या यात्रेत खर्गे महाराजांची भाकणूक

**तभा वृत्तसेवा,**
**मोहोळ, दि. २१ एप्रिल-**

देशाच्या राजकारणात काही महीने चिंताजनक आहेत. या काळात विविध समस्यांना तोंड द्यावे लागणार आहे. त्यानंतर त्यावर विजय मिळवून सुस्थिती आणि स्थिरता निर्माण होईल, अशी भाकणूक खर्गे महाराज यांनी सांकेतीक खुणांव्दारे संचार अवस्थेत मोहोळच्या यात्रेत केली. हिंदू-मुस्लिम ऐक्याचे प्रतिक मानलेल्या मोहोळ येथे ग्रामदैवत श्री. नागनाथांचे अगोदर त्यांचे शिष्य दिल्लीचे बादशहा शेख नसरोद्दीन यांच्या नावाच्या जयघोष करून मुख्य यात्रेला शेख नसरुद्दीन बादशहा की दो चिराऊ दिन । हर बोले हर हर ! असा जयघोष करीत प्रारंभ होतो.



मोहोळ शहर व पंचक्रोशीतील हजारो भाविकांच्या उपस्थितीत सोमवारी पहाटेच्या ४ च्या सुमारास जयघोष करीत खर्गाची पालखीसह भव्य मिरवणूक निघाली. खर्ग तीर्थावर श्री. नागनाथांचे शिष्य आणि ज्यांच्या १२ वर्षांच्या कठोर तप:श्चर्येनंतर आलेले निस्सीम भक्त हेग्रस यांचे वंशज विनायकराव तथा अरुणबुवा मोहोळकर यांचा आणि गुरु म्हणजे प्रत्यक्ष भगवान शंकराचा वायु रूपाने संचार अवस्थेत असलेले खर्गे महाराज या गुरु शिष्य भेटीचा नयनरम्य सोहळा खर्ग तीर्थावर पहाटे ५ वाजता मोठ्या उत्साहात संपन्न झाला.

दि. १९ एप्रिल रोजी श्रीक्षेत्र वडवळहून श्रींच्या पांढऱ्या छत्रीचे मध्यरात्री आगमन झाले. तदनंतर असंख्य भाविकांचे श्रद्धास्थान असणाऱ्या श्री नागनाथांचा वायुरूपाने शरिरात संचार झालेल्या खर्गे महाराज यांची पहाटे ४ वाजता खर्गासह सवाद्य मिरवणूक काढण्यात आली. यावेळी खर्गे महाराज यांनी देशाच्या राजकारणाविषयी भाकणुक दिल्ली दरवाजात वर्तविली. श्री नागनाथांची सुंदर अशी मुर्ती सजविलेल्या पालखीत ठेवण्यात आली होती. यात्रेमध्ये १२ बलुतेदार १८ अलुतेदारासह विविध जाती तर धर्माचे लोक पारंपारिक जबाबदाऱ्या वंशपरंपरागत सांभाळत आहेत.

श्री शंकराचा अवतार असलेल्या श्री नागनाथांनी परमभक्त हेग्रसाला दिलेल्या चंद्र सुर्य असेपर्यंत भेटत राहीन या दिलेल्या वचनाची पुर्तता पाहण्यासाठी हजारो नागेश भक्तांनी खर्गतीर्थावर गर्दी केली होती. खर्ग डोहासह, काकडे पार, मुंगीचा धोंडा येथे चारा, पीकपाणी यावर खर्गे महाराजांनी सांकेतिक खुणांसह भाकणुक केली. पालखीसह निघालेली मिरवणुक मंदिरात पोहचल्यानंतर महाआरती झाली. त्यानंतर प्रसादाचे वाटप करण्यात आले. यात्रा शांततेत व सुव्यवस्थीत होण्यासाठी चोख पोलीस बंदोबस्त ठेवला आहे




### कुंभारी ब्रिज खालील जखमीचा अखेर मृत्यू

**सोलापूर, दि. २१ एप्रिल -**

कुंभारी येथील ब्रिज खाली जखमी अवस्थेत मिळून आलेल्या नई जिंदगी येथे राहणाऱ्या एका तरुणाचा उपचारादरम्यान येथील शासकीय रुग्णालयाचा आज मंगळवारी पहाटे मृत्यू झाला .इस्माईल शेख ( वय ३८ वर्ष , रा . नई जिंदगी सोलापूर) असे त्या मयत तरुणाचे नाव असून तो १९ एप्रिल रोजी सकाळी कुंभारी येथील ब्रिजखाली जखमी अवस्थेत मिळून आला होता . त्याला रुग्णवाहिकेतून येथील शासकीय रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले असता त्याचा आज मंगळवारी पहाटे मृत्यू झाला.

# बेकायदा गर्भलिंग निदान; डॉक्टर पती-पत्नीची निर्दोष मुक्तता

### न्यायाधीश संदीप नवले यांचा महत्वपूर्ण निकाल

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ एप्रिल -**

बाळे येथील आरोही मॅटर्नीटी व जनरल हॉस्पिटलमध्ये बेकायदेशीरपणे सोनोग्राफी मशीन ठेवून रुग्णांचे प्रसूतीपूर्व गर्भलिंग निदान केल्याप्रकरणी सोलापुरातील डॉ. प्रशांत पांडुरंग इंगळे आणि डॉ. अपर्णा प्रशांत इंगळे या डॉक्टर पती-पत्नीची प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी श्री. संदीप नवले यांनी निर्दोष मुक्तता केली आहे. महाराष्ट्रातील पूर्व गर्भधारण आणि प्रसूतीपूर्व निदान करणारे कौशल्य (लिंग निवडीस प्रतिबंध) कायदा - १९९४ च्या कायाद्यान्वये प्रलंबीत असणाऱ्या केवळ पाच ते सहा खटल्यामधील या खटल्याचा निकाल न्यायालयीन क्षेत्रात अत्यंत महत्वाचा मानला जात आहे.



याची हकीगत अशी की, सोलापूर महानगरपालिकेच्या तत्कालीन प्रभारी आरोग्य अधिकारी डॉ. जयंती आडके यांनी त्यांच्या सहकारी वैद्यकीय अधिकारी डॉ. ज्योत्स्ना कोरे, डॉ. वैशाली शिरशेट्टी, डॉ. शोभा पुजारी व अन्य स्टाफसह दि. २४/०६/२०१५ रोजी डॉ. इंगळे यांच्या आरोही हॉस्पिटलवर छापा घालून तपासणी केली असता तेथे त्यांना सोनोग्राफी मशीन, फाईल वगैरे आढळून आले. तेथे ॲडमिट असणाऱ्या रुग्णांनी इंगळे डॉक्टर हेच सोनोग्राफी मशीन हाताळून त्यांच्या तपासण्या करीत असल्याचे सांगितले. डॉ. इंगळेसह परिचारिका या देखील त्यांना दवाखान्यात दिसून आल्या. डॉ. इंगळे यांना सोनोग्राफी मशीन हाताळण्यासाठी शिक्षण व अधिकारही नव्हते. तसेच त्याकरिता कायाद्यानुसार आवश्यक कागदपत्रे ठेवली नव्हती व सोनोग्राफी मशीनची नोंदणीही म.न.पा. आरोग्य खात्यात केली नव्हती. त्यामुळे डॉ. इंगळे पती-पत्नीनी कोणतीही कायदेशीर प्रक्रिया न करता गैरमार्गाने व गुपचूप सोनोग्राफी मशीनचा गर्भलिंग निदान करण्याकरिता गैरवापर करून गुन्हा केल्यामुळे सोलापूर महानगरपालिकेच्या तत्कालीन प्रभारी आरोग्य अधिकारी डॉ. जयंती संजीव आडके यांनी न्यायालयात फिर्याद दाखल केली होती. या खटल्यात सात साक्षीदार तपासण्यात आले.

प्रस्तुत खटला दाखल करण्याचा कायदेशीर अधिकार डॉ. जयंती आडके यांना नाही, तथाकथित छापा घालण्यात आलेले हॉस्पिटल तसेच सोनोग्राफी मशीन, फाईल वगैरेंशी आरोपींचा संबंध नाही, परिचारिका, पेशंट या काल्पनिक व्यक्ती असून त्यांचा आरोपींशी संबंध नाही, असे विविध मुद्दे डॉ. प्रशांत इंगळे यांचे वकील अरविंद अंदोरे यांनी न्यायालयासमोर वरिष्ठ न्यायालयांच्या न्यायनिवाड्यांसह मांडून आरोपींविरुद्ध साक्ष देणारे म.न.पा. चे डॉक्टर्स संगनमताने खोटी कागदपत्रे बनवून आरोपींविरुद्ध खोटा खटला दाखल केल्याचा युक्तिवाद केला. तर डॉ. अपर्णा इंगळे यांचे वकील शशी कुलकर्णी यांनी आरोपींविरुद्धचा खटला बेकायदेशीर असून कोणताही ठोस पुरावा न्यायालयासमोर नसल्याचा युक्तिवाद केला. आरोपींच्या वकिलांचा युक्तिवाद ग्राह्य मानून न्यायाधीशांनी दोन्ही आरोपींची निर्दोष मुक्तता केली. महाराष्ट्रात वैद्यकीय क्षेत्रात गाजलेल्या या खटल्यात आरोपी नं.१ तर्फे ॲड. अरविंद अंदोरे, ॲड. आल्हाद अंदोरे, ॲड. अथर्व अंदोरे यांनी काम पाहिले. आरोपी नं.२ तर्फे ॲड. शशी कुलकर्णी यांनी काम पाहिले. तर फिर्यादी तर्फे (सरकारी वकील) ॲड. शिल्पा बनसोडे यांनी काम पाहिले.

# शेतकऱ्यांची दिशाभूल करणाऱ्या 'त्या' २ दुकानदारांवर गुन्हा दाखल



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ एप्रिल-**

शेतकऱ्यांना चढ्या दराने खते, बियाणे विकून जादा दराच्या पावत्या करणे, युरिया व इतर खतांचा मोठा स्टॉक करणे यासह इतरही काही कारणावरून शेतकऱ्यांची फसगत केलेल्या जिल्ह्यातील २३ दुकानदारांच्या १५ एप्रिलला जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी शुक्राचार्य भोसले यांनी सुनावण्या घेतल्या आणि कसलीही भाडभीड न ठेवता दोषी असलेल्या सर्वांवरच 'निब्बर' कारवाई केली आहे. या कारवाईमध्ये दोघांवर 'एफआयआर' दाखल करण्याचे आदेशही संबंधित अधिकाऱ्यांना दिले होते आणि त्या दोघांवर गुन्हाही दाखल केला आहे. यामुळे खत, किटकनाशके, बियाणे विक्रेत्यांमध्ये चांगलीच खळबळ उडाली आहे.

या कारवाईबाबत जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी भोसले यांच्याकडून मिळालेली माहिती अशी की, कृषी अधीक्षक कृषी अधिकारी कार्यालयास आणि ११ तालुक्यातील तालुका गुणवत्ता निरीक्षकांकडे काही शेतकऱ्यांनी केलेल्या तक्रारीवरून, कृषी अधिकारी व तालुका गुणवत्ता निरीक्षक अधिकाऱ्यांच्या पथकास तपासणी करताना दुकानदारांच्या स्टॉकमध्ये, विक्रीत अनियमितता आढळून आल्याने संबंधित दुकानदारांच्या सुनावण्या बुधवारी घेण्यात आल्या. यामध्ये शेतकऱ्यांना विकलेल्या मालाच्या जादा दराच्या पावत्या केल्याने आणि स्टॉकचा साठा मोठ्या प्रमाणात आढळून आल्याने २ जणांवर गुन्हा दाखल करण्याचे आदेश तालुका गुणवत्ता निरीक्षकांना तत्काळ दिले आहेत; यामुळे मंगळवेढा आणि मोडनिंब येथील त्या संबंधित दुकानदारांवर आता लवकरच गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. तर उर्वरित २० जणांवर तात्पुरता परवाना निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे. तर यातील टेंभुर्णी येथील एकाचा कायमस्वरूपी परवाना रद्द केला आहे. या कारवाई केलेल्या २३ जणांमध्ये २० खतविक्रेते, १ किटकनाशक आणि ३ बियाणे अशा २४ विक्रेत्यांचा समावेश आहे. गतवर्षीही भोसले यांनी २०० च्यावर दुकानदारांवर अशीच बेधडक कारवाई केली होती.

# तंत्रज्ञानामुळे सीईटी २०२६ परीक्षा अधिक सुरक्षित व पारदर्शक



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२१ एप्रिल-**

महाराष्ट्र राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाने सीईटी २०२६ साठी तंत्रज्ञानाचा व्यापक वापर करून परीक्षा प्रक्रियेत मोठा बदल घडवून आणला आहे. या वर्षीच्या परीक्षेत अत्याधुनिक प्रणालींचा वापर केल्यामुळे परीक्षा अधिक सुरक्षित, पारदर्शक आणि विश्वासार्ह बनली आहे.

उमेदवारांची ओळख निश्चित करण्यासाठी आधार आधारित पडताळणी, फेशियल रिकग्निशन आणि बायोमेट्रिक प्रमाणीकरण यांचा वापर करण्यात आला. यामुळे बनावट उमेदवार किंवा गैरप्रकारांना आळा बसण्यास मोठी मदत झाली आहे. केंद्रीकृत मॉनिटरिंग प्रणालीमुळे प्रत्येक हालचालीवर लक्ष ठेवणे शक्य झाले, ज्यामुळे परीक्षेची प्रामाणिकता अधिक बळकट झाली. तक्रार निवारण आणि आक्षेप नोंदविण्यासाठी डिजिटल प्लॅटफॉर्म उपलब्ध करून देण्यात आला.

या तंत्रज्ञानाधारित उपक्रमांमुळे सीईटी २०२६ ही परीक्षा केवळ अधिक सुरक्षितच नाही, तर भविष्यातील परीक्षा व्यवस्थेसाठी एक आदर्श ठरली आहे. महाराष्ट्राने या माध्यमातून न्याय्य, पारदर्शक आणि आधुनिक परीक्षा प्रणालीकडे एक महत्त्वपूर्ण पाऊल टाकले आहे.



सीमांकनावरून विरोधक टीका करीत असले तरी त्याशिवाय मतदारसंघांचा विस्तार शक्य नाही. आज भारताची लोकसंख्या १४० कोटी आहे आणि इतक्या मोठ्या लोकसंख्येच्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी मतदारसंघांचा विस्तार आवश्यक आहे.

**प्रफुल्ल पटेल**, नेते राकाँ.

तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
बुधवार, २२ एप्रिल २०२६ 

देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात आम्ही तीन वेळेस १०० च्या वर जागा जिंकल्या. शरद पवार यांना ते कधीही शक्य झाले नाही. देवाभाऊंचा स्तर काय आहे हे जनतेने दाखवून दिले. उरला प्रश्न राऊतांच्या स्तराचा तर ते गटार गंगेमध्ये आंघोळ करतात.

**नवनाथ बन**, भाजपा प्रवक्ते



# शत्रूला निर्णायक प्रत्युत्तर देण्यास सज्ज

## इराणी लष्करी कमांडरची धमकी; होर्मुझ जलमार्गात अतिक्रमण अमान्य

◆ **तेहरान, २१ एप्रिल**

शत्रूच्या कारवाईला त्वरित आणि निर्णायक प्रत्युत्तर देण्यास सज्ज आहे. होर्मुझ जलमार्गातील अमेरिकेची नाकाबंदी अमान्य असून, त्यांनी जप्त केलेले तोस्का जहाज तत्काळ मुक्त करावे अन्यथा परिणामास सामोरे जावे अशी धमकी इराणी लष्कराच्या खतम अल-अंबिया केंद्रीय मुख्यालयाचे कमांडर अली अब्दुल्लाही यांनी अमेरिकेला दिली आहे.





पाकिस्तानात होणाऱ्या शांतता चर्चेसंदर्भात अनिश्चितता निर्माण झाली असताना इराणच्या भूमिकेने पुन्हा संघर्षाची ठिणगी पडण्याची शक्यता आहे. कमांडर अली यांनी मंगळवारी सैन्य सज्जतेचे छायाचित्र जारी करीत निवेदनात म्हटले की, होर्मुझच्या सामुद्रधुनीवर नियंत्रण ठेवण्याचा इराणचा अधिकार कोणीही हिरावून घेऊ शकत नाही. अमेरिका-इस्रायलविरुद्धच्या संघर्षात इराणचे पारडे जड आहे. अण्वस्त्राच्या मुद्यावर आम्ही कोणतीही तडजोड करणार नाही. अमेरिकन राष्ट्राध्यक्षांनी केलेले दावे निराधार आहेत. होर्मुझमधील अमेरिकेच्या नौदलाची कृती आंतरराष्ट्रीय सागरी हद्दीतील एक धोकादायक हस्तक्षेप आहे, ज्यामुळे प्रादेशिक स्थिरतेला धोका निर्माण होऊ शकतो. ◂(वृत्तसंस्था)

### परिस्थिती बिघडल्यास अमेरिका जबाबदार

अमेरिकेच्या होर्मुझमधील नाकाबंदीमुळे मध्यपूर्वेतील परिस्थिती अस्थिर होत आहे. कुठलीही अनुचित घटना घडल्यास याची जबाबदारी अमेरिकेची असेल. ओमानच्या आखातातील आणि आसपासच्या सागरी मार्गांवर इराणचे नियंत्रण आहे. कोणत्याही देशाच्या जहाजाला जाण्यासाठी परवानगी दिली जाणार नाही. अशा परिस्थितीत चर्चा करणे निरर्थक असल्याचे अब्दुल्लाही यांनी म्हटले आहे. ■

### ... तर विध्वंसासाठी तयार राहावे : ट्रम्प



अमेरिका आणि इराण यांच्यातील शांतता प्रस्थापित करण्यासाठी सुरू असलेले प्रयत्न आता निर्णायक वळणावर आहेत. बुधवारी दोन आठवड्यांचा संघर्षविराम संपत असून, तो पुढे वाढवण्याची शक्यता कमी असल्याचे संकेत अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी दिले आहेत. शांतता करार झाला नाही, तर इराण विध्वंसासाठी तयार राहावे असा इशारा ट्रम्प यांनी दिला. ■

# दिल्लीत लक्ष्यित हत्यांचा कट उधळला

## आयएसआयच्या दोन हस्तकांना अटक

◆ **नवी दिल्ली, २१ एप्रिल**

पाकिस्तानातील पाताळयंत्री गुप्तचर यंत्रा आयएसआयच्या इशाऱ्यावर नाचणारा शहजाद भट्टीच्या दोन हस्तकांना दिल्ली पोलिसांच्या विशेष शाखेने अटक केली. या कारवाईच्या माध्यमातून दिल्ली-एनसीआर क्षेत्रात गोळीबार, ग्रेनेड हल्ले आणि लक्ष्यित हत्या घडवून आणण्याचा कट उधळण्यात आला, अशी माहिती एका अधिकाऱ्याने मंगळवारी दिली.

राजवीर आणि विवेक बंजारा, अशी अटक केलेल्यांची नावे असून, ते मूळचे मध्यप्रदेशातील ग्वाल्हेरचे आहेत. या अटकेच्या माध्यमातून राष्ट्रीय राजधानी व सभोवतालीच्या परिसरात हल्ले करण्याचा कट उधळण्यात आला. या अटकसत्रातून भट्टीने रचलेला एक मोठा कट उघडकीस आला आहे. भट्टी हा आयएसआय संबंधित इतर सूत्रधारांच्या साथीने समाज माध्यम मंचाद्वारे तरुणांची भरती करीत होता आणि त्यांना दिल्ली-एनसीआरमध्ये हिंसेच्या लक्ष्यित कृत्यांसाठी वापरत होता, असे पोलिस उपायुक्त (विशेष कक्ष) प्रवीणकुमार त्रिपाठी यांनी सांगितले. या भागात ग्रेनेड हल्ले आणि लक्ष्यित हत्या घडवून आणण्याच्या योजनेबाबत मिळालेल्या माहितीच्या आधारे, ३१ मार्च रोजी या संदर्भात गुन्हा दाखल करण्यात आल्याचे अधिकाऱ्याने सांगितले. विवेक बंजाराचा सर्वप्रथम शोध घेण्यात आला आणि १६ एप्रिल रोजी ग्वाल्हेरमध्ये डाब्रा येथून त्याला अटक करण्यात आली. चौकशीदरम्यान त्याने आपला साथीदार राजवीर याच्याविषयी माहिती दिली. यामुळे १८ एप्रिल रोजी दिल्लीतील सराई काले खान परिसरातून त्याला अटक करणे शक्य झाले, असे या अधिकाऱ्याने सांगितले. ◂(वृत्तसंस्था)

### नामांकित हॉटेल होते लक्ष्य

राजवीर हा त्याचा सूत्रधार शहजाद भट्टी याच्या निर्देशानुसार दिल्ली-एनसीआरमधील एका नामांकित हॉटेलला लक्ष्य करणार होता. त्याची तयारी करीत असतानात त्याला अटक करण्यात आली. त्याच्या ताब्यातून एक पिस्तूल आणि सहा जिवंत काडतुसे जप्त करण्यात आले आहेत. या व्यतिरिक्त कटाशी संबंधित असलेले तसेच गुन्ह्याचा पुरावा ठरू शकणारे व्हिडीओ आणि व्हॉईस नोट्स असलेले दोन मोबाईल फोनही जप्त करण्यात आले. ■

# गुजरात एटीएसने उद्ध्वस्त केले कट्टरतावादी मॉड्युल

## दहशतवादी कट रचल्याच्या आरोपाखाली दोघांना अटक

◆ **अहमदाबाद, २१ एप्रिल**

समाज माध्यमांचा वापर करीत कट्टरपंथी घडवून देशविरोधी कारवाया करण्यासाठी चिथावणी देणे आणि देशाविरुद्ध युद्ध पुकारल्याच्या आरोपाखाली गुजरात दहशतवादविरोधी पथक अर्थात ‸ एटीएसने दोन जणांना अटक केली.

आरोपींना 'गझवा-ए-हिंद' प्रस्थापित करण्याच्या उद्देशाने एक दहशतवादी जाळे उभारण्याची, आरडीएक्स स्फोटकांचा वापर करून देशाविरुद्ध युद्ध छेडण्याचा, रा. स्व. संघाशी संबंधित लोकांना लक्ष्य करण्याचा आणि आपले हेतू साध्य करण्यासाठी समाज माध्यमांद्वारे तरुणांची भरती करण्याचा कट रचला होता, असे पोलिस अधिकाऱ्यांनी सांगितले. तांत्रिक आणि मानवी गुप्तचर यंत्रणेच्या माध्यमातून समाजमाध्यमे व इंटरनेटवरील राष्ट्रविरोधी हालचालींवर एटीएस बारकाईने पाळत ठेवून आहे, असे पोलिस अधिकाऱ्यांनी सांगितले. या प्रक्रियेदरम्यान पाटण जिल्ह्यातील सिद्धपूरचा रहिवासी असेल्या आणि कथितरीत्या कट्टरपंथी इस्लामी विचारसरणीने प्रभावित झालेल्या इरफान कालेखान पठाण यांच्याबाबत विशिष्ट माहिती प्राप्त झाली होती.

या गोपनीय माहितीच्या आधारे एटीएसने पठाणला चौकशीसाठी बोलावले. त्याच्या फोनची तपासणी केली असता, व्हॉट्सॲप, इन्स्टाग्रामसारख्या समाज माध्यमांचा वापर करीत तो इसिसशी संबंधित कट्टरवादी लोकांच्या आणि संघटनांच्या संपर्कात असल्याचे आढळले. जिहादी विमर्श पसरवण्यात आणि समविचारी लोकांचे जाळे देशभरात उभारण्याच्या प्रयत्नात तो असल्याचे प्राथमिक तपासात आढळले. ◂(वृत्तसंस्था)

### दुसरा आरोपी मुंबईचा

पुढील तापसात या प्रकरणात मुंबईतील साकिनाका परिसरातील मुर्शिद झाहीद अख्तर शेख नावाचा तरुणही गुंतला असल्याचे निष्पन्न झाले. गुजरात एटीएसने महाराष्ट्र पोलिसांची मदत घेत त्याला ताब्यात घेतल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली. शेखच्या मोबाईलमधूनही आक्षेपार्ह मजकूर सापडला आहे. ■

# भाविकाला पूजेपासून वंचित ठेवावे काय?

## शबरीमला सुनावणी; सर्वोच्च न्यायालयाचा सवाल

◆ **नवी दिल्ली, २१ एप्रिल**

भाविकाला परंपरेच्या आधारावर पूजेच्या अधिकारापासून वंचित ठेवावे काय?, असा सवाल सर्वोच्च न्यायालयाने विचारला आहे. सर्वोच्च न्यायालय सध्या केरळमधील शबरीमला मंदिरासह विविध धर्म आणि धार्मिक स्थळांवर महिलांसोबत होणाऱ्या कथित भेदभावाशी संबंधित प्रकरणांवर सुनावणी करत आहे. यासाठी, न्यायालयाने नऊ न्यायाधीशांचे घटनापीठ स्थापन केले आहे, जे २०१८ च्या निर्णयाविरुद्ध दाखल केलेल्या पुनर्विलोकन याचिकांवर विचार करत आहे



जर एखाद्या श्रद्धाळू भक्ताला देवतेला स्पर्श करण्यापासून रोखले गेले, तर संविधान त्यांच्या बचावासाठी पुढे येणार नाही का?, जन्म किंवा परंपरेच्या आधारावर एखाद्याला पूजेच्या अधिकारापासून वंचित ठेवता येईल का?, यावर चर्चा करताना न्यायमूर्ती अहसानूद्दीन अमानुल्लाह यांनी ही टिप्पणी केली. या प्रकरणात, मंदिराच्या मुख्य पुजाऱ्याने असा युक्तिवाद केला की, पूजेच्या परंपरा आणि विधी हे धर्माचा अविभाज्य भाग आहेत आणि ते धार्मिक अधिकार मानले पाहिजेत. त्यांच्या मते, जेव्हा एखादा भक्त मंदिरात जातो, तेव्हा त्याने देवतेचे स्वरूप आणि तिच्या परंपरा स्वीकारल्या पाहिजेत.

सबरीमला प्रकरणाव्यतिरिक्त , न्यायालय अनुच्छेद २५ अंतर्गत धार्मिक स्वातंत्र्याशी संबंधित अनेक महत्त्वाच्या मुद्द्यांचीही तपासणी करत आहे. यामध्ये मुस्लिम महिलांचा मशिदी आणि दर्ग्यांमध्ये प्रवेश, आंतरधर्मीय विवाहानंतर पारशी महिलांना अग्नि मंदिरात प्रवेश करण्याचा अधिकार, बहिष्काराच्या प्रथांची वैधता आणि दाऊदी बोहरा समुदायातील महिला जननेंद्रिय विच्छेदनाशी संबंधित कायदेशीर प्रश्नांचा समावेश आहे.

**मुदतीचे काटेकोर पालन व्हावे**

सुनावणीच्या पहिल्या दिवशी, घटनापीठाने स्पष्ट केले की सर्व पक्षांनी विहित मुदतीत आपले युक्तिवाद सादर करणे आवश्यक आहे. न्यायालयाने सांगितले की इतर महत्त्वाची प्रकरणे प्रलंबित असल्याने, कोणतीही अतिरिक्त वेळ दिली जाणार नाही. सर्व वकिलांना त्यांचे युक्तिवाद आणि कागदपत्रे वेळेवर सादर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. ◂(वृत्तसंस्था)

### संपूर्ण सुनावणीचे वेळापत्रक निश्चित

सरन्यायाधीश सूर्यकांत यांच्या अध्यक्षतेखालील खंडपीठाने संपूर्ण सुनावणीचे वेळापत्रक आधीच निश्चित केले होते. पुनर्विलोकन याचिकांच्या समर्थनार्थ ७ ते ९ एप्रिल दरम्यान युक्तिवाद ऐकण्यात आला. विरोधी पक्षाचा युक्तिवाद १४ ते १६ एप्रिल दरम्यान सादर करण्यात आला. प्रत्युत्तराचा युक्तिवाद २१ एप्रिलपर्यंत पूर्ण होण्याची शक्यता आहे आणि न्यायालयीन मित्राचा (ॲमिकस क्युरी) अंतिम युक्तिवाद २२ एप्रिलपर्यंत पूर्ण होण्याची अपेक्षा आहे. ■

# मणिपूरमध्ये ५.२ तीव्रतेचा भूकंप

**इम्फाळ,** : ईशान्येकडील अनेक राज्यांमध्ये भूकंपाचे धक्के जाणवले. मंगळवारी सकाळी ५:५९ वाजता मणिपूरसह अनेक राज्यांमध्ये जमीन हादरली. रिश्टर स्केलवर या भूकंपाची तीव्रता ५.२ होती. भूकंपाचे केंद्र मणिपूरमधील कामजोंग येथे होते. मणिपूर, नागालँड, आसाम, मेघालय आणि अरुणाचल प्रदेशमध्ये भूकंपाचे धक्के जाणवले. सुदैवाने, यात कोणतीही जीवितहानी झाल्याचे वृत्त नाही. एप्रिल महिन्यात ईशान्येकडील राज्यांमध्ये भूकंप होण्याची ही पहिलीच वेळ नाही. यापूर्वी ७ एप्रिलला मणिपूरमध्ये रिश्टर स्केलवर ४.३ आणि ३.० तीव्रतेचे दोन भूकंप झाले होते. त्याचे धक्के अरुणाचल प्रदेशपर्यंत जाणवले होते. २१ एप्रिलला झालेल्या भूकंपाची तीव्रता ५.२ होती. भूकंपाचे केंद्रबिंदू कामजोंगमध्ये जमिनीच्या आत ६२ किमी होते. भूकंपाचे धक्के बसताच लोक घाबरुन घरांमधून बाहेर पळाले. ■

## चित्रपट वार्ता

### 'राजा शिवाजी'मध्ये जेनेलियाच्या मुलाची एंट्री

**मुंबईः** 'राजा शिवाजी'या बहुप्रतिक्षित चित्रपटाच्या झलकने प्रेक्षकांमध्ये प्रचंड उत्सुकता निर्माण केली आहे. यामध्ये एक लहानसा, गोंडस कलाकार सर्वांचे लक्ष वेधून घेत आहे. अवघ्या दहा वर्षांच्या या मुलाने आपल्या अभिनयाची सुरुवात करत मोठ्या पडद्यावर पाऊल ठेवले आहे. विशेष म्हणजे तो एका नामांकित कलाकार दांपत्याचा मुलगा असून त्याच्या घराण्याचा राजकीय वारसाही मोठा आहे. अभिनेता रितेश देशमुख आणि अभिनेत्री जेनेलिया देशमुख हे पडद्यावर जितके लोकप्रिय आहेत, तितकेच ते खऱ्या आयुष्यातही आदर्श कुटुंब म्हणून ओळखले जातात. या चित्रपटाच्या झलकमध्ये राहिलने साकारलेली छत्रपती शिवाजी महाराजांच्या बालपणीची भूमिका विशेष लक्ष वेधून घेते. हा दुसरा कोणी नसून त्यांचा मुलगा राहिल देशमुख आहे. सुरुवातीच्या दृश्यांमध्ये तो स्वराज्याविषयी बोलताना दिसतो आणि त्यातून प्रेक्षकांना त्या ऐतिहासिक काळात नेण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. ■




### 'चिरंजीव परफेक्ट बिघडलाय' नाटकाचा दमदार प्रयोग

**मुंबईः** रसिक प्रेक्षकांच्या प्रेमामुळे मराठी रंगभूमीवर अनेक लोकप्रिय नाटकांची दमदार वाटचाल सुरू असून, त्यापैकी काहींनी १००-१५० प्रयोगांचा महत्त्वाचा टप्पा ओलांडला आहे. मनोरंजनाची भन्नाट मेजवानी घेऊन रंगभूमीवर आलेले 'चिरंजीव परफेक्ट बिघडलाय!' हे नाटक अल्पावधीतच प्रेक्षकांच्या पसंतीस उतरले असून, आता या नाटकाने आपल्या यशस्वी वाटचालीत शंभर प्रयोगांचा अभिमानास्पद टप्पा गाठला आहे. नाटकाचा शतक महोत्सवी प्रयोग नुकताच अक्षय्य तृतीयेच्या शुभमुहूर्तावर उत्साहात साजरा झाला. या विशेष प्रयोगाला ज्येष्ठ अभिनेते पद्मश्री अशोक सराफ, अभिनेत्री निवेदिता सराफ, अभिनेते सचिन पिळगांवकर, अभिनेत्री सुप्रिया पिळगांवकर, अभिनेते आदेश बांदेकर, अभिनेत्री सुचित्रा बादेकर यांसह अनेक मान्यवर मंडळी शुभेच्छा देण्यासाठी आवर्जून उपस्थित होते. ■

### 'मिर्झापूर : द मूव्ही' मोठ्या पडद्यावर

**मुंबईः** भारतातील सर्वाधिक चर्चित क्राईम-ड्रामा फ्रँचायझींपैकी एक असलेली मिर्झापूर आता मोठ्या पडद्यावर झळकण्यासाठी सज्ज झाली आहे. 'मिर्झापूरः द मूव्ही' या नावाने सादर होणारा हा चित्रपट ४ सप्टेंबर २०२६ रोजी चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित होणार असून, या घोषणेमुळे चाहत्यांमध्ये प्रचंड उत्साह निर्माण झाला आहे. वेब सिरीजमधील गाजलेल्या कथानकाला अधिक विस्तृत आणि भव्य स्वरूप देण्याचा प्रयत्न या चित्रपटातून केला जाणार असल्याचे निर्मात्यांकडून सांगण्यात आले आहे.टीव्ही मालिकेने आधीच आपल्या तीव्र कथानक, सत्तासंघर्ष आणि प्रभावी व्यक्तिरेखांमुळे प्रेक्षकांमध्ये विशेष स्थान निर्माण केले आहे. आता त्याच विश्वाला सिनेमॅटिक स्केलवर सादर करताना अधिक उंचावलेला अनुभव देण्यावर निर्मात्यांचा भर आहे. चित्रपटामध्ये दृश्यात्मक भव्यता, अधिक सघन कथानक आणि भावनिक तसेच हिंसक संघर्षांचे अधिक प्रभावी सादरीकरण अपेक्षित आहे. ■



# दहशतवाद्यांना कंठस्नान घालत हल्ल्याचा घेतला सूड

## भारतीय लष्कराच्या विशेष दलाने राबविली होती मोहीम

◆ **श्रीनगर, २१ एप्रिल**

पहलगाम हल्ल्यात सहभागी असलेल्या दहशतवाद्यांना पकडण्यासाठी एप्रिल २०२५ पासून भारतीय लष्कराने जम्मू-काश्मिरात विविध मोहीम राबवल्या. अखेर जुलैमध्ये सैन्याने पीर पंजाल डोंगराळ भागात केलेल्या कारवाईत सुलेमान उर्फ फैजल जाट, अफगाण आणि जिब्रान या तीन दहशतवाद्यांचा खात्मा केला.



काश्मीर खोऱ्यातील अतिउंच डोंगराळ भागात पॅराट्रूपर (भारतीय लष्कराच्या स्पेशल फोर्सेस) तैनात करण्यात आले आहेत. याच विशेष दलाच्या जवानांनी २ दहशतवाद्यांना कंठस्नान घातले होते. सैन्याने पीर पंजाल डोंगराळ भागात मोठ्या प्रमाणात लष्करी मोहीम हाती घेतली होती. पीर पंजाल डोंगराळ भाग हा एकीकडे काश्मीर खोरे ते पुंछ व राजौरी पर्यंत पसरलेला आहे. तर दुसरीकडे किश्तवाड आणि दोडापर्यंत पसरलेला आहे. या भागात सैन्याने कारवाई करून जैश-ए-मोहम्मद या दहशतवादी गटाच्या सैफुल्लाला संपवले. तसेच पाकिस्तानमधील दहशतवाद्यांशी धागेदोरे असलेले नेटवर्कही उद्ध्वस्त केले. दहशतवाद्यांची लपण्याची ठिकाणे उद्ध्वस्त केली. पहलगाम हल्ल्यानंतर भारतीय लष्कराने रणनीतीत बदल केला. स्थानिक पातळीवर काम करणाऱ्या यंत्रणेपासून ते गुप्तचर यंत्रणेपर्यंत एकमेकांशी सुरक्षा यंत्रणा ताळमेळ साधत आहेत. दर आठवड्याला सुरक्षा यंत्रणा जॉइंट कंट्रोल सेंटर उपक्रमातून बैठका घेतात. त्यात तात्काळ हाती घेण्यायोग्य असलेल्या मोहीम व गुप्तचर यंत्रणांच्या अहवालांची माहिती दिली जात असल्याचे एका अधिकाऱ्याने सांगितले. ◂(वृत्तसंस्था)

# पहलगाम हल्ल्यात चिनी उपकरणांचा वापर

## एनआयएची न्यायालयात माहिती

◆ **श्रीनगर, २१ एप्रिल**

पहलगाम हल्ल्यात दहशतवाद्यांनी चीनी इलेक्ट्रॉनिक उपकरणांचा वापर केल्याचे राष्ट्रीय तपास यंत्रणेच्या (एनआयए) तपासात उघड झाले. या उपकरणांच्या पुरवठ्याची माहिती मागणीसाठी एनआयएने चीनच्या न्यायालयात अपील सादर केली. दरम्यान आतापर्यंत चिनी न्यायालयाकडून कोणतीही माहिती मिळाली नसल्याचे एनआयएने सांगितले.

एनआयएचे उपमहानिरीक्षक संदीप चौधरी यांनी जम्मूमधील एनआयएच्या विशेष न्यायालयात सांगितले होते की, पहलगाम हल्ल्याशी संबंधित अनेक उपकरणे जप्त करण्यात आली आहेत. त्यातील एक महत्वाचे उपकरण म्हणजे गोप्रो कॅमेरा होता. हल्ला करण्यापूर्वी या कॅमेऱ्यात अनेकदा चित्रीकरण करण्यात आले. त्यातून दहशतवाद्यांनी हल्ला कसा करायचा, कधी करायचा याचे नियोजन केले. हल्ल्यात सहभागी तिन्ही दहशतवाद्यांकडून दोन चिनी बनावटीच्या फोनचा वापर करण्यात आला होता. संबंधित फोन हे पाकिस्तानात विकले गेल्याचे चिनी कंपनीने सांगितले आहे. ◂(वृत्तसंस्था)

### १११३ जणांच्या चौकशीतून कटाचा उलगडा

पहलगाम हल्ल्याचे नियोजन लष्कर-ए-तोएबाची संघटना द रेझिस्टन्स फ्रंड (टीआरएफ)च्या साजिद जाट या दहशतवाद्याने केले होते, अशी माहिती एनआयएच्या तपासातून समोर आली. हल्ल्यासाठी ड्रोनने शस्त्र टाकणे, हल्लेखोरांच्या हालचालींचे नियोजन करणे, पर्यटकांवर हल्ला करणे या सगळ्या गोष्टी साजिदने हाताळल्या. तपासादरम्यान एनआयएने १११३ जणांची कसून चौकशी केली, त्यातून कटाचा उलगडा झाला. ■

# आदिलच्या कुटुंबाला मिळाले पक्के घर

## उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शब्द पाळला

◆ **श्रीनगर, २१ एप्रिल**

पहलगाम हल्ल्यात जीव गमावलेल्या आदिल शाह यांच्या कुटुंबियांना घर बांधून देण्याचे आश्वासन महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले होते. जवळचे १२ लाख खर्च करून शिंदे यांनी घर बांधून देत दिलेला शब्द पाळला.

पहलगाम येथील बैसरन व्हॅलीत झालेल्या दहशतवादी हल्ल्यात अनेक पर्यटकांचा जीव वाचवण्यासाठी धाडसाने पुढे सरसावलेले आदिल शाह हे दहशतवाद्यांच्या गोळीबारात ठार झाले होते. आदिल यांच्या निधनानंतर कुटुंबावर दुहेरी संकट कोसळले होते. एकीकडे आदिल गेल्याचे दुःख होते, तर दुसरीकडे कुटुंबाचा आधार गेल्याने परिस्थितीही बिकट झालेली होती. उपमुख्यमंत्री शिंदे यांनी याची दखल घेतली आणि कुटुंबाला नवीन घर बांधून देण्याचा शब्द दिला होता. पहलगाम हल्ल्याला एक वर्ष पूर्ण होत असताना आदिल यांच्या कुटुंबीयांना शिवसेनेकडून नवीन घर बांधून दिले. हे घर बांधण्यासाठी सुमारे १२ लाख रुपये खर्च आला. एकमजली घरात प्रशस्त हॉल, स्वयंपाकघर, दोन बेडरूम आणि स्वच्छतागृहाची सुविधा देण्यात आली आहे.




**मोबाईलवरून साधला संवाद**

पूर्वी आदिल यांचे कुटुंब माती आणि लाकडाच्या जुन्या घरात राहत होते. पर्यटकांनी पुन्हा येथे यावे, घाबरू नका. आम्ही सगळे तुमच्यासोबत आहोत. आमच्या मुलाने देशासाठी बलिदान दिले, त्यामुळे आम्हाला अभिमान आहे, अशी भावना आदिल यांच्या वडिलांनी व्यक्त केली. तसेच शिवसेनेचे आभार मानले. शिंदे मोबाईलवरून आदिलच्या कुटुंबियांशी संवाद साधला.◂(वृत्तसंस्था)

# महाराष्ट्र-गुजरात राहणार जास्त उष्ण


## हवामान खात्याच्या प्रमुखांची माहिती

◆ **नवी दिल्ली, २१ एप्रिल**

भारत-गंगेय मैदानी प्रदेशाचा उत्तरी भाग, पूर्व किनारपट्टीवरील राज्ये, गुजरात आणि महाराष्ट्र ही पश्चिम भारतातील राज्ये आणि त्यांना लागून असलेल्या भागांमध्ये या वर्षीच्या उष्णतेच्या लाटांचे दिवस सामान्य प्रमाणापेक्षा जास्त राहतील, असे भारतीय हवामान विभागाच्या एका वरिष्ठ अधिकाऱ्याने सोमवारी सांगितले.

हवामानशास्त्रीय दृष्ट्या संवेदनशील असे प्रदेश आहेत, जिथे उष्णतेची लाट न येणाऱ्या भागांमध्येही तापमान ४० अंश सेल्सिअसपेक्षा जास्त होण्याची शक्यता आहे. हवामानाच्या दृष्टीने काही विशिष्ट प्रदेश असे आहेत जे अशा परिस्थितीस अधिक प्रवण असतात. याचे उदाहरण द्यायचे झाल्यास वर्षाच्या या काळात विदर्भातील सरासरी तापमा ४१ ते ४२ अंश सेल्सिअस असते. त्याचप्रमाणे, उत्तरप्रदेश आणि हरयाणा या राज्यांमध्येही मे महिन्याच्या सुमारास तापमान ४० ते ४४ अंश सेल्सिअसपर्यंत पोहोचते, असे त्यांनी सांगितले. त्यामुळे अशा उच्च तापमानाच्या दिवसांसाठी आपण सज्ज राहिले पाहिजे, असे मृत्युंजय मोहपात्रा यांनी पुढे नमूद केले. संवेदनशील लोकसंख्येलामदत करण्यासाठी भारतीय हवामान विभाग कोणती पावले उचलत आहे, या प्रश्नाला उत्तर देताना त्यांनी सांगितले की, रस्त्यावरील विक्रेते आणि शेतात काम करणारे मजूर यासारख्या बाहेर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांमध्ये माहिती प्रसारित करण्यासाठी व्हॉट्सॲप ग्रुप तयार करण्याव्यतिरिक्त, उष्णतेची लाट आणि त्या वेळी करावयाच्या अपेक्षित उपाययोजनांची माहिती देणारे फलकही लावण्यात आले आहेत.

सर्वांपर्यंत पोहोचणे आणि भारतीय हवामान विभागाद्वारे तयार करण्यात आलेली हवामानाचा अंदाजविषयक माहिती उपलब्ध करून देणे हे व्हॉट्सॲप ग्रुप तयार करण्याचे उद्दिष्ट आहे, असे त्यांनी सांगितले. आम्ही सरकारी माध्यमांद्वारे माहिती पुरवतो. यामध्ये राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाच्या 'कॉमन अलर्ट प्रोटोकॉल'चा समावेश आहे आणि यामुळे मोबाईल फोन असलेल्या कोणत्याही व्यक्तीला ही माहिती मिळवणे शक्य होते, असे मोहपात्रा म्हणाले. ◂(वृत्तसंस्था)



### उष्णतेच्या लाटेचा अंदाज आधीच

तापमानातील वार्षिक आणि दैनंदिन बदलांचा सामना करण्यासाठी आयएमडी उष्णतेच्या लाटेचा अंदाज एक ऋतू आधीच उपलब्ध करून देते.त्यानंतर पुढील चार आठवड्यांसाठी वैध असलेला विस्तारित श्रेणीचा अंदाज दर गुरुवारी जारी केला जातो. उन्हाळ्याच्या महिन्यांत जिल्हा स्तरावर दररोज सात दिवसांचा इशाराही दिला जातो, असे मृत्युंजय मोहपात्रा यांनी सांगितले. ■

# भारतीय विद्यार्थ्याच्या मारेकऱ्याला कॅनडात आजन्म कारावास

◆ **टोरोंटो/गाझियाबाद, २१ एप्रिल**

भारतीय विद्यार्थी कार्तिक वासुदेव याच्या हत्येप्रकरणी मानसिक विकृतीमुळे आपण गुन्हेगारीदृष्ट्या जबाबदार नसल्याचा आरोपीचा दावा फेटाळत टोरंटो येथील न्यायालयाने त्याला आजन्म कारावासाची शिक्षा ठोठावली, अशी माहिती त्याच्या कुटुंबीयांनी मंगळवारी दिली.

न्यायाधीश जेन केली यांच्या अध्यक्षतेखालील टोरंटोच्या वरिष्ठ न्यायालयाने ७ एप्रिल आणि ९ एप्रिल २०२२ रोजी दोन अनोळखी व्यक्तींची हत्या केल्याप्रकरणी सोमवारी रिचर्ड एडविनला प्रथम श्रेणी हत्येच्या दोन आरोपांवर दोषी ठरवले.

मूळचा गाझियाबाद येथील आणि सेनेका महाविद्यालयाचा विद्यार्थी असलेल्या २१ वर्षीय वासुदेववर गोळीबार केल्याची कबुली एडविनने दिली. मात्र, तो मानसिक विकाराने ग्रस्त होता आणि त्याला योग्य-अयोग्य यातील फरक ओळखता येत नव्हता, त्यामुळे त्याला गुन्हेगारीदृष्ट्या जबाबदार धरता येणार नाही, असा युक्तिवाद त्याच्या वकिलाने केला होता.

घटनेच्या वेळी एडविन सिझोफ्रेनियाने ग्रस्त होता हे न्यायालयाने मान्य केले. पण, एनसीआर याचिका फेटाळत त्याला कोणत्याही पॅरोलविना आजन्म कारावास भोगावा लागेल, असा निर्णय दिला. या निकालानुसार, वासुदेव शेरबोर्न स्टेशनच्या दिशेने चालत ब्लूर स्ट्रीट ईस्ट येथील जिन्याकडे जात असताना एडविन वेगाने त्याच्या जवळून पुढे गेला. त्यानंतर त्याने मागे वळून वासुदेवच्या पाठीवर अनेक गोळ्या झाडल्या. ◂(वृत्तसंस्था)

## अग्रलेख...

# संप, व्यवस्था आणि जनता

राज्यभरातील जवळपास १७ लाख सरकारी व निमसरकारी कर्मचाऱ्यांनी पुकारलेला बेमुदत संप हा केवळ एक प्रशासकीय प्रश्न नाही; तर तो शासनव्यवस्थेच्या कार्यक्षमतेचा, आर्थिक शिस्तीचा आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे सामान्य नागरिकांच्या दैनंदिन जीवनाचा विषय आहे. शासन आणि कर्मचारी यांच्यातील हा संघर्ष नवा नाही; मात्र प्रत्येक वेळी त्याचे परिणाम सर्वसामान्यांनाच भोगावे लागतात, हे कटु सत्य आहे. कामबंद आंदोलन ही कोणत्याही कर्मचारीवर्गाची पहिली पसंती नसते; ती बहुधा शेवटचीच पायरी असते. पण संवादाचे सर्व मार्ग जेव्हा बंद होतात, कर्मचाऱ्यांच्या मागण्यांकडे सातत्याने दुर्लक्ष केले जाते आणि अन्यायाची भावना तीव्र होते, तेव्हा कर्मचारी 'कामबंद' आंदोलन करणारच. या आंदोलनातील पगार कमी असलेल्या आणि निमशासकीय, चतुर्थ श्रेणीतील कर्मचाऱ्यांच्या असंतोषाचे मूळ समजून घ्यायला हवे. त्यावर ताबडतोब उपाययोजना करून त्यांना दिलासा देण्याची तयारी दाखवायला हवी. त्याच वेळी, या आंदोलनात गलेलठ्ठ पगार आणि अधिकाधिक सोयीसुविधा उपभोगणारे काही उच्चपदस्थ अधिकारीही सहभागी आहेत. ते नेमके कशासाठी सहभागी झालेत? हा प्रश्नही तितकाच महत्त्वाचा आहे.

खाजगी क्षेत्राशी तुलना करायची झाल्यास सर्वांत जास्त सुरक्षित नोकरी सरकारी कर्मचाऱ्यांची आहे. काही निमसरकारी आणि तृतीय, चतुर्थ श्रेणीतील कर्मचारी वगळता, इतरांना मोठ्या प्रमाणावर विविध शासकीय सोयीसुविधांचा लाभ मिळत आहे. पगारही लठ्ठ असतो. तुलनेने कमी वेतन, अस्थिर सेवा आणि मर्यादित सुविधा असलेल्या त्यांच्याच काही कनिष्ठ सहकारी- कर्मचाऱ्यांच्या व्यथा कायम आहेत. अशा स्थितीत सर्वच स्तरातील कर्मचाऱ्यांनी एकत्रितपणे संपाचा मार्ग स्वीकारणे योग्य आहे का? हाही प्रश्न आहे. एकाच वेळी सर्वांनी संपाचे हत्यार काढल्यामुळे सामान्य माणसालाच त्याचा फटका बसणार आहे. या आंदोलनादरम्यान, सामाजिक जबाबदारीची जाणीवही आवश्यक आहे. शासनालाही येणाऱ्या काळात व्यवस्थेतील त्रुटी दूर करण्याची आवश्यकता आहे. कर्मचाऱ्यांमध्येही कायम, कंत्राटी, निमशासकीय आणि चतुर्थ श्रेणी अशी भली मोठी उतरंड निर्माण झाली आहे. एकाच कार्यालयात समान काम करूनही वेतन, सुविधा आणि सुरक्षिततेत फरक असल्याने संपाला नेहमी खतपाणी मिळते. त्यामुळे शासनाला कर्मचाऱ्यांच्या मागण्यांचा व्यवस्थित विचार करावा लागणार आहे. शासकीय, निमशासकीय कर्मचाऱ्यांचा सर्वांत मोठा प्रश्न म्हणजे प्रलंबित मागण्यांचा. वेतनवाढ, भत्ते, पदोन्नती, सेवा अटी किंवा जुनी पेन्शन योजना यांसारख्या मागण्या वर्षानुवर्षे प्रलंबित आहेत. या प्रश्नांसाठी कर्मचारी संघटना वारंवार चर्चेची मागणी करतात; पण शासन वेळ देत नाही किंवा निर्णय लांबणीवर टाकला जातो, असा त्यांचा आरोप आहे. त्यातूनच कर्मचाऱ्यांमध्ये असंतोष वाढत चालला असून तोडगा निघण्यासाठी संवादाचे पाऊलच पडत नसल्याचे चित्र आहे. ज्या मागण्यांसाठी बेमुदत संप पुकारण्यात आला आहे, त्यात वाढत्या महागाईच्या पृष्ठभूमीवर सध्याचे वेतन आणि निवृत्तीनंतरची सुरक्षितता नसल्याचे कर्मचारी संघटनांचे म्हणणे आहे. विशेषतः जुनी पेन्शन योजना पुन्हा लागू करण्याची मागणी त्यांच्याकडून करण्यात येत आहे. कर्मचाऱ्यांच्या दृष्टीने ही मागणी योग्य आहे, कारण निवृत्तीनंतर आर्थिक स्थैर्य हा कोणत्याही कर्मचाऱ्याचा मूलभूत हक्क आहे. मात्र, या मागण्यांकडे शासनाच्या दृष्टीने पाहिले, तर जुनी पेन्शन योजना पुन्हा लागू करणे म्हणजे राज्याच्या तिजोरीवर प्रचंड आर्थिक बोजा वाढवणे होय. आधीच महसुली तुटीचा सामना करणाऱ्या राज्यासाठी हा निर्णय दीर्घकालीन आर्थिक संकट निर्माण करू शकतो. विकासकामे, पायाभूत सुविधा, शिक्षण आणि आरोग्य यांसारख्या महत्त्वाच्या क्षेत्रांसाठी लागणारा निधी कमी पडण्याची शक्यता आहे. त्यामुळे सरकारचा विरोध हा केवळ हटवादीपणातून नसून, आर्थिक वास्तवाच्या भानातून आहे, हेही मान्य करावे लागेल.

१ नोव्हेंबर २००५ पूर्वी विनाअनुदान किंवा अंशतः अनुदानावर नियुक्त शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू करावी, सुधारित राष्ट्रीय निवृत्तिवेतन योजनेच्या अंमलबजावणीसंदर्भातील अधिसूचना तत्काळ जारी करावी, सर्व कर्मचाऱ्यांना खाजगी रुग्णालयांमध्ये कॅशलेस उपचारांची सुविधा उपलब्ध करून द्यावी, १० वर्षे सेवा बजावणाऱ्या सर्व कंत्राटी कर्मचाऱ्यांना नियमित सेवेत सामावून घ्यावे, सेवानिवृत्तीचे वय ६० वर्षे करावे, सर्व विभागांतील रिक्त पदे लवकरात लवकर भरावीत, मुख्यमंत्र्यांनी प्रलंबित मागण्यांवर चर्चा करण्यासाठी वेळ द्यावा, सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा लाभ मिळावा, लिपिक संवर्गातील कर्मचाऱ्यांसाठी सुधारित धोरण तयार करण्यात यावे, तसेच चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांच्या पाल्यांना नियुक्ती देण्यासंदर्भातील शासन निर्णयाची पुनर्स्थापना करावी, अशा अनेक मागण्या कर्मचारी संघटनांनी सरकारकडे केल्या आहेत.

कर्मचारी आणि शासन यांच्यातील संवादात आलेली दरी ही या संपाचे मूळ कारण आहे. अनेकदा कर्मचारी संघटनांचा आरोप असतो की, सरकार त्यांच्या मागण्यांकडे दुर्लक्ष करते, तर सरकारचे म्हणणे असते की, संप हा दबावतंत्र म्हणून वापरला जातो. या परस्पर अविश्वासामुळेच प्रश्न अधिक गुंतागुंतीचे होत जातात आणि गैरसमज वाढत जातो. त्यात या संपाचा सर्वांत मोठा फटका बसतो तो सामान्य नागरिकांना. सर्व शासकीय कार्यालये बंद राहिल्याने विविध सेवा ठप्प होतात. जमीन नोंदणी, महसूल कामे, आरोग्यसेवा, शिक्षण, सार्वजनिक वितरण व्यवस्था आणि इतर अनेक अत्यावश्यक सेवा बंद पडतात. एका बाजूला कर्मचारी आपले हक्क मिळवण्यासाठी लढत असतात, तर दुसऱ्या बाजूला नागरिक आपल्या मूलभूत सेवांसाठी हेलपाटे मारत असतात; ही स्थिती लोकशाही व्यवस्थेत खरंच अपेक्षित आहे का? कोणत्याही लोकशाही व्यवस्थेत आंदोलन हा हक्क असला, तरी तो जबाबदारीने वापरणे आवश्यक आहे. बेमुदत संपामुळे प्रशासन पूर्णपणे ठप्प होते आणि त्याचे मोठे परिणाम भविष्यावर होतात. त्यामुळे येणाऱ्या काळात कर्मचारी संघटनांनीही पर्यायी मार्गांचा विचार करणे गरजेचे आहे. सरकारनेही या प्रश्नाकडे केवळ आर्थिक दृष्टिकोनातून पाहणे टाळले पाहिजे. कर्मचाऱ्यांच्या असंतोषामागील उत्तरे शोधण्याचा प्रयत्न करायला हवा. त्यावर सकारात्मक पावलेही उचलायला हवीत. संवादाचे दरवाजे खुले ठेवून वेळोवेळी संघटनांशी चर्चा करायला हवी आणि व्यवहार्य तोडगा काढण्याची तयारी दाखवायला हवी. उदाहरणार्थ, जुनी पेन्शन योजना पूर्णपणे लागू करण्याऐवजी, सुधारित पेन्शन योजना तयार करावी, ज्यात कर्मचाऱ्यांना सुरक्षितता आणि सरकारला आर्थिक संतुलन राखता येईल. तसेच, वेतन आणि भत्त्यांबाबत टप्प्याटप्प्याने सुधारणा करता येतील. एक स्वतंत्र वेतन आयोग किंवा तज्ज्ञ समिती स्थापन करून या प्रश्नाचा सखोल अभ्यास करावा.

शेवटी, हा प्रश्न केवळ 'कर्मचारी विरुद्ध सरकार' असा मर्यादित नाही, तर तो 'व्यवस्था विरुद्ध वाढता असंतोष' असा व्यापक स्वरूप धारण करतो. एका बाजूला आपल्या हक्कांसाठी लढणारे कर्मचारी आहेत, तर दुसऱ्या बाजूला आर्थिक, प्रशासकीय आणि धोरणात्मक बंधनांमध्ये अडकलेले सरकार आहे. या दोन्ही बाजूंनी परस्परांच्या भूमिकेचा आदर राखत, संघर्षाऐवजी संवादाचा मार्ग स्वीकारावा. संप हा असंतोष व्यक्त करण्याचे प्रभावी माध्यम असले, तरी तो दीर्घकालीन तोडगा ठरू शकत नाही. उलट, त्याचा सर्वाधिक फटका सामान्य नागरिकांच्या दैनंदिन आयुष्याला बसतो. आरोग्य, शिक्षण, वाहतूक अशा अत्यावश्यक सेवांमध्ये निर्माण होणारा अडथळा समाजाच्या सर्व स्तरांवर परिणाम करतो. त्यामुळे हा संप लवकरात लवकर मागे घेण्यात यावा. यासाठी सरकारने अधिक संवेदनशीलता आणि लवचीकता दाखवत सकारात्मक पावले उचलली पाहिजेत, तर कर्मचाऱ्यांनीही संयम आणि जबाबदारीची जाणीव ठेवत संवादासाठी पुढाकार घ्यावा. कारण शेवटी, या व्यवस्थेचा केंद्रबिंदू 'सर्वसामान्य नागरिक' आहे, हे कुणीही विसरू नये. ■

## विशेष

**प्रा. सुखदेव बखळे**

# पुलांच्या बांधकामात तंत्रज्ञानाचा समन्वय

मुंबईसारख्या गतिमान शहरात विकास आणि इतिहास यांचा संघर्ष नेहमीच दिसून येतो. एल्फिन्स्टन रोड ओव्हरब्रिजचे (प्रभादेवी पूल) अलिकडील विसर्जन हा त्याचाच एक जिवंत पुरावा आहे. ब्रिटिशकालीन अभियांत्रिकीचा उत्कृष्ट नमुना असलेला हा पूल केवळ एक वाहतूक मार्ग नव्हता, तर मुंबईच्या औद्योगिक आणि नागरी विकासाचा साक्षीदार होता. १९१३ मध्ये बांधण्यात आलेला एल्फिन्स्टन पूल त्या काळातील प्रगत अभियांत्रिकीचा उत्तम नमुना होता. स्टीलचे मजबूत गर्डर्स, आर्च-आधारित रचना आणि अचूक मोजमाप यामुळे हा पूल अत्यंत भक्कम बनवण्यात आला होता. त्या काळात वाढत्या रेल्वे वाहतुकीमुळे लेव्हल क्रॉसिंग धोकादायक ठरत असल्यामुळे अशा ओव्हरब्रिजची गरज निर्माण झाली. विशेष म्हणजे या पुलाची उभारणी करताना दीर्घकालीन वापर आणि सुरक्षितता यांचा विचार करण्यात आला होता. यावरून ब्रिटिशकालीन नियोजनाची दूरदृष्टी स्पष्ट होते. एल्फिन्स्टन उड्डाणपुलाने तब्बल शंभर वर्षांहून अधिक काळ मुंबईकरांची सेवा केली. परळ आणि प्रभादेवी या महत्त्वाच्या भागांना जोडणारा हा पूल गिरणगावातील कामगार, व्यापारी आणि प्रवासी यांच्यासाठी जीवनवाहिनी ठरला होता. इतक्या दीर्घ काळ टिकून राहणे हे त्याच्या दर्जेदार बांधकामाचे आणि नियमित देखभालीचे द्योतक आहे. या पुलाप्रमाणे नगर रेल्वे स्टेशनकडे जाणारा सीनेवरचा लोखंडी पूल, कल्याणमधील दुर्गाडी किल्ल्याजवळचा पूल यांनी शंभर वर्षांहून अधिक काळ सेवा दिली. रेल्वेचे पूल तर दीडशे वर्ष सेवा देत आहेत. आजकाल तर उद्घाटन होण्याअगोदरच पूल कोसळतात. पणजी नजीकचा मांडवी नदीवरचा पूल असो की बिहारमधील पूल; कामाच्या गुणवत्तेचा आरसा त्यांनी दाखवला. आजच्या आधुनिक तंत्रज्ञानाच्या तुलनेत जुनी साधने वापरूनही इतका टिकाऊ पूल उभारणे ही त्या काळातील अभियंत्यांची मोठी कामगिरी म्हणावी लागेल.

बदलत्या काळानुसार मुंबईतील वाहतुकीच्या गरजा झपाट्याने वाढल्या. वाढती लोकसंख्या, वाहनांची संख्या आणि उपनगरी रेल्वेवरील ताण यामुळे जुना पूल अपुरा ठरू लागला. याच पृष्ठभूमीवर नवीन दुमजली उड्डाणपूल उभारण्याचा निर्णय घेण्यात आला. नागपूरमध्ये तर तीनमजली पूल आहेत. स्थापत्य अभियांत्रिकीमध्ये सुधारणा झाल्या असल्या, तरी तंत्रज्ञानात जुन्या-नव्याची सांगड घातल्यास टिकाऊपणा वाढू शकतो. आता एल्फिन्स्टन पुलाच्या जागी तयार होणारा नवीन पूल वरळी-शिवडी उड्डाणपूल प्रकल्पाचा भाग आहे. तो अधिक क्षमतेचा आणि आधुनिक सुविधांनी युक्त असेल. यामुळे पूर्व-पश्चिम जोडणी अधिक सुलभ होईल आणि वाहतुकीचा वेग वाढेल. जुना पूल हटवण्यामुळे कुर्ला ते परळ दरम्यान दोन अतिरिक्त उपनगरी रेल्वे मार्गांसाठी जागा उपलब्ध झाली आहे. यामुळे रेल्वेची क्षमता वाढेल, गर्दी



कमी होईल आणि प्रवाशांचा वेळ वाचेल. तसेच नवीन उड्डाणपुलामुळे रस्ते वाहतुकीवरील ताणही कमी होईल. वाहतूक कोंडी कमी होऊन शहरातील हालचाल अधिक सुसूत्र आणि जलद होण्यास मदत होईल. एल्फिन्स्टन पूल पाडणे म्हणजे एका युगाचा अंत आहे; मात्र या प्रक्रियेत त्यावरील ऐतिहासिक शिलालेख जतन करून नव्या पुलात समाविष्ट करण्याचा निर्णय सकारात्मक आहे.

मुंबईचा एल्फिन्स्टन पूल हा केवळ लोखंड आणि दगडांचा ढाचा नव्हता, तर शहराच्या प्रगतीचा साक्षीदार होता. त्याने शतकभर दिलेली सेवा आणि टिकाऊपणा आजही प्रेरणादायी आहे. नव्या पुलामुळे मुंबईच्या वाहतुकीला नवी दिशा मिळेल; पण त्याच वेळी जुन्या पुलाचा इतिहास जपणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे. विकास आणि वारसा यांचा समतोल राखतच मुंबई पुढे जात राहील, हाच या बदलाचा खरा अर्थ आहे. एल्फिन्स्टन रोड उड्डाणपुलाचे शेवटचे गर्डर पाडण्यात आले, तेव्हा एक युग इतिहासजमा झाले. तब्बल ११३ वर्षे परळ आणि प्रभादेवी दरम्यान प्रवाशांच्या हालचाली सुलभ करणारा हा पूल इतिहासजमा झाला. हा बदल केवळ एक पायाभूत सुविधा बदल नाही, तर शहराच्या बदलत्या गरजांचे प्रतीक आहे. मध्य रेल्वेने छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस ते कुर्ला या अत्यंत व्यस्त मार्गावर पाच ब्रिटिशकालीन पूल हटवण्याचे काम पूर्ण केले आहे. हे काम मुंबईच्या उपनगरी रेल्वे सेवांचा विस्तार आणि आधुनिकीकरण करण्यासाठी अत्यावश्यक मानले जात आहे. विशेष म्हणजे, एल्फिन्स्टन पूल हटवताना रेल्वे वाहतुकीत कमीत कमी अडथळा निर्माण होईल, याची पूर्ण काळजी घेण्यात आली.

तांत्रिक दृष्टिकोनातून पाहता १९१३ मध्ये बांधलेला हा पूल त्या काळातील अभियांत्रिकी कौशल्याचे उत्कृष्ट उदाहरण होता. स्टील गर्डर, क्रॉस सपोर्ट आणि आर्च सिस्टिम यांचा वापर करून तयार करण्यात आलेली ही रचना आजच्या आधुनिक तंत्रज्ञानाच्या तुलनेत जुनी वाटली, तरी तिचे योगदान अमूल्य होते. या पुलाच्या पाडकामासाठी अत्यंत नियोजनबद्ध पद्धतीने काम करण्यात आले. जवळपास वीस वेळा रेल्वे ब्लॉक्स घेऊन डेक स्लॅब, पाईपलाईन, केबल्स आणि इतर संरचना हटवण्यात आल्या. अंतिम टप्प्यात ८०० टन क्षमतेच्या क्रेनच्या साहाय्याने मुख्य गर्डर्स काढण्यात आले. यासाठी विविध विभागांमधील अधिकाऱ्यांचे समन्वय आणि ९५ कर्मचाऱ्यांचे योगदान महत्त्वाचे ठरले. हा संपूर्ण उपक्रम एक गोष्ट स्पष्ट करतो, की शहराचा विकास ही सतत चालणारी प्रक्रिया आहे. जुन्या आणि कालबाह्य झालेल्या संरचना बदलणे आवश्यक असते. त्यामुळे सुरक्षितता आणि कार्यक्षमता वाढेल; मात्र या प्रक्रियेत इतिहास आणि वारसा जपणेही तितकेच महत्त्वाचे आहे. एल्फिन्स्टन पूल आज राहिला नाही; पण त्याने घडवलेला इतिहास कायम स्मरणात राहील. मुंबईसारख्या गतिमान शहरासाठी हा बदल अपरिहार्य आहे. विकासाच्या या नव्या टप्प्यात आधुनिक सुविधा आणि ऐतिहासिक जाण यांचा समतोल राखणे हीच खरी कसोटी आहे. मुंबई शहर हे नेहमीच विकास आणि इतिहास यांचा संगम राहिले आहे. एल्फिन्स्टन रोड उड्डाणपुलाच्या पाडकामाच्या प्रक्रियेत अनेक अडचणींचा सामना करावा लागला. अरुंद जागा, उंच इमारतींची जवळीक, गंजलेले लोखंडी भाग आणि शंभर वर्षांहून जुनी रचना यामुळे हे काम अत्यंत धोकादायक आणि आव्हानात्मक ठरले, तरीही प्रशासनाने ते नियोजनपूर्वक पूर्ण केले. सीएसएमटी ते कुर्लादरम्यानचे मस्जिद, हँकॉक, कर्नाक, सायन आणि एल्फिन्स्टन हे पाच पूल टप्प्याटप्प्याने हटवण्यात आले. या जागी नवीन पूल उभारले जात आहेत, जे आधुनिक वाहतुकीच्या गरजांना पूरक ठरतील. १९१३ मध्ये वाढत्या रेल्वे वाहतुकीमुळे लेव्हल क्रॉसिंग्ज अपुरे ठरत असल्यामुळे एल्फिन्स्टन पूल उभारण्यात आला. विशेष म्हणजे हा प्रकल्प पूर्णतः रेल्वेने स्वतःच्या खर्चाने केला होता. या पुलावर त्या काळातील ठेकेदार आणि कंपन्यांची नावे कोरलेली होती. ती आता जतन करून नव्या पुलात समाविष्ट केली जाणार आहेत. हा पूल केवळ वाहतुकीसाठी नव्हता, तर मुंबईच्या गिरणगाव भागाला जोडणारा महत्त्वाचा दुवा होता. परळ आणि प्रभादेवी यांना जोडून या पुलाने अनेक दशकांपासून प्रवाशांची सेवा केली. या पुलांचा अंत म्हणजे एका युगाचा अंत आहे; मात्र या बदलामागे आधुनिकतेची गरज आणि सुरक्षिततेचा विचार आहे. जुने आणि कमकुवत झालेले पूल काढून नवीन, मजबूत आणि सुरक्षित संरचना उभारणे ही काळाची गरज आहे. तथापि, या प्रक्रियेत आपला ऐतिहासिक वारसा जपणेही तितकेच महत्त्वाचे आहे. शहरे सतत बदलत आहेत; पण या बदलात त्यांचा इतिहास जिवंत ठेवणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे. ■

(लेखक अर्थशास्त्राचे अभ्यासक आहेत.)

## वेध

**गिरीश शेरेकर**

# संस्कारित युवा पिढी समाजासाठी वरदान

अलिकडच्या पाच वर्षातल्या युवा पिढीच्या वागणुकीचा अभ्यास केला तर असे लक्षात येईल की, यातील जवळपास ३० टक्के दिशाहीन होत आहेत. समाजमनावर प्रभाव टाकणाऱ्या अनेक घटनांमध्ये त्यांचा सहभाग वारंवार आढळून येत आहे. या घटना शांत डोक्याने समजून त्याचे विश्लेषण केले तर असे लक्षात येते की, संस्कारांचा अभाव त्यासाठी कारणीभूत ठरला आहे. अशी मुले कुटुंबासाठी जितकी धोकादायक असतात तेवढीच ती समाजासाठी घातक असतात. याच्या उलट सांगायचे म्हणजे संस्कारित मुले पालकांचे भाग्य असते आणि हीच पिढी पुढे समाजासाठी वरदान ठरत असते. अनेक मुलांनी नावलौकिक मिळविला तर काहींनी बदनामीतून प्रसिद्धी मिळविली आहे.

मादक प्रदार्थांचे सेवन, ऑनलाईन क्रिकेट सट्टा व लॉटरी, चोरी, गुन्हेगारी, शरीरसुखाच्या आसक्तीत, लफडेबाजीत दिवसागणीक युवा पिढीचा सहभाग वाढतो आहे. महाराष्ट्रातल्या कोणत्याही भागातील उपरोक्त घटना बघा त्यात युवकांचीच संख्या जास्त दिसते. त्यातही सज्ञानाच्या उंबरठ्याजवळ आलेले आणि तो ओलांडलेल्यांची संख्या लक्ष वेधणारी आहे. नुकतीच वयात आलेली ही मुले नेमकं काय करतील याचा अजिबात नेम राहिलेला नाही. शिक्षणाच्या नावावर बाहेरगावी राहणारी म्हणा किंवा घरी राहून पालकांना बेवकूफ बनविणारी मुले संगतगुणानेच बिघडत आहेत. पालकांच्या जेव्हा हे लक्षात येते, तेव्हा खूप उशीर झालेला असतो. तुलनेने यात मुलीची संख्या कमी आहे. पण, ज्या आहेत त्यांनी अटकेपार झेंडे गाडले आहेत. उदाहरण द्यायचे झाल्यास त्या पानटपरीवरून सिगारेट, वाईनशॉपमधून दारू घ्यायलाही मागेपुढे पाहत नाहीत. पब व हॉटेलमध्ये होणाऱ्या पार्ट्यांमध्ये गाजांच्या, एमडीच्या सिगारेट त्या मुलांसोबत सर्रास ओढतात. राज्यभरात अशा पार्ट्यांवर अनेकदा झालेल्या कारवाईतून ते पुढे आले आहे.

हे सर्व सांगायचे कारण की, अमरावती जिल्ह्यातील परतवाडा येथे नुकतेच एक प्रकरण समोर आले. १९ वर्षाच्या अयान अहमद याने जे दिवे लावले आहेत, ते फुंकर मारूनही विझताना दिसत नाहीत. आयुष्य घडविण्याच्या वयात या पठ्ठ्याला मुलींना आपल्या जाळ्यात अडकविण्याचा छंद जडला. खर्चासाठी पैसे जुळविण्याचे फंडेही त्याने आत्मसात केले. यश मिळत गेल्यावर त्याने 'मी इतक्या मुली पटविल्या, तू किती पटविणार', असे सांगत इतरांना सोबत घेत स्पर्धाच सुरू केली. आचरण व स्वभावानुसारच मित्र मिळत असतात. अयानला त्याच्यासारखेच मित्र मिळाले. अयान फक्त मुलींना जाळ्यात अडकवून गप्पाटप्पा करेपर्यंत मर्यादि राहिला नाही. त्यांचे लैंगिक शोषण त्याने केले. पैशांचा वाद झाल्याने उजेर नावाच्या मित्रानेच त्याचा भंडाफोड केला. याचा अर्थ उजेर काही धुतल्या तांदळासारखा नाही. अयानचा तो स्पर्धकच होता. अयानने तर आठ मुलींसोबत गैरवर्तन केले, हे अधिकृतपणे पोलिसांकडे नोंदविले गेले आहे. सर्व मुली समोर आल्यातर अयानला कायमची अद्दल घडविणे पोलिसांसाठी सहज शक्य आहे. पण, आतापर्यंत त्यातल्या एकीनेच तक्रार दिली, हे सगळ्यात मोठे दुर्दैव आहे. मुलींची संख्या कमी-अधिक असू शकते पण अशा घटना सातत्याने सगळीकडे समोर येत आहेत. अनेक घटना ठरवून केलेल्या असतात तर काही वादावादीतून चव्हाट्यावर येतात. ज्या पुढेच येत नाही, त्याची पण संख्या देखील मोठी आहे. अगदी सहजतेने मुली अशा भामट्यांच्या जाळ्यात अडकतात, हेही आश्चर्यच आहे.

सर्वच नाही पण ज्या मुला-मुलींमध्ये असे समाजाला लाजविणारे बदल झाले आहेत किंवा होत आहेत, याचा चिकित्सकपणे अभ्यास होणे आता गरजेचे आहे. सांगायचा मुद्दा इतकाच की, मुला व मुलींना बालपणीच योग्य संस्कार दिले तरच ते नियंत्रणात राहतात. एका विशिष्ट वयापर्यंत मुलांच्या देहबोलीवर व बाहेरच्या घडामोडींवर काळजीपूर्वक लक्ष ठेवणे फारच आवश्यक आहे. ज्यांना जाणीव आहे ते बरोबर दक्षता बाळगतात. पैशाने बिनधास्तपणा आलेले व प्रेमात आंधळे झालेल्या पालकांना मुलांचे अवगुण दिसत नसल्याने त्यांच्यावर पुढे पश्चात्तापाची वेळ येते. वयात येणाऱ्या मुला व मुलींनी काय करावे यापेक्षा काय करू नये हे त्यांना प्राधान्याने शिकविण्याची वेळ आली आहे. चांगले काय आणि वाईट काय यातला फरकही त्यांना समजून सांगायला हवा. ही निरंतर चालणारी प्रक्रिया आहे, हे पालकांनी समजून घेतले पाहिजे. पटकन सगळे काही व्यवस्थित होईल, असे नाही. पण, प्रामाणिक प्रयत्नातून ते शक्य आहे. कृपया पाल्यांना वेळ द्या, त्यांना कुटुंबासाठी व समाजासाठी संस्कारित करा, हीच अपेक्षा. ■

९४२०७२१२२५

## धर्म-संस्कृती

**प्रा. दिलीप जोशी**

# मोक्षदायिनी सप्तनद्या!

आपल्या भारतीय संस्कृतीत नद्यांना मातेचा दर्जा आहे. सकाळी स्नान करताना नद्यांचे स्मरण आपण आवर्जून करतो. त्यांच्या केवळ स्मरणमात्रे त्या नद्या प्रत्यक्षात आपल्या अंघोळीच्या पाण्यात प्रवेश करून सर्वपापे धुऊन टाकतात, आपल्यावर कृपेचा वर्षाव करतात अशी आपली धारणा आहे. या नद्यांचे जल म्हणजे तीर्थ असून पाप, ताप हरण करणाऱ्या या माउली आहेत म्हणूनच कुंभस्नान, कार्तिक स्नान, तीर्थस्नान करण्यासाठी आपण नदीतीर्थावर जातो. नदीचे स्मरण करण्यामागील अजून एक सकारात्मक उद्देश आहे. ''परोपकाराय वहंति नद्यः'' असे आपण म्हणतो म्हणजे नद्या केवळ परोपकारासाठीच वाहतात. त्या ज्या प्रदेशातून जातात तेथे ''सुजलाम सुफलाम'' वातावरण करतात.

निरपेक्ष भावाने वाहताना त्यांच्या वाटेत अडथळे आले तर त्या डोंगर, पहाड, पर्वतांना विनम्रपणे वळसा घालून गंतव्याकडे जातात. कधी कधी संकटांना वळसा घालून पुढे जाता आले पाहिजे हे नद्या आपल्याला शिकवितात. नद्यांचे अजून विशेष म्हणजे समुद्रात मिसळून जाताना स्वतःचे अस्तित्व संपवून सागरात विलीन होतात. हा समर्पण भाव, परोपकार, निःस्वार्थ भाव, निरपेक्ष भाव अंशतः तरी आपल्यात यावा म्हणून नद्यांचे स्मरण आपण नित्य करतो. तसे तर भारतीय संस्कृतीत अनेक नद्यांचा उल्लेख आहे. पण त्यातील सात नद्या मोक्षदायिनी म्हणून प्रमुख स्थानावर आहेत.

**गङ्गे च यमुने चैव गोदावरि सरस्वति ।**
**नर्मदे सिन्धु कावेरि जलेऽस्मिन् सन्निधिं कुरु ॥**

या मंत्राद्वारे आपण नित्य स्नानात सप्तनद्यांचे स्मरण करतो.

यातील पहिलेच नाव गंगा मातेचे आहे. सगरराजाच्या पुत्रांना कपिलमहामुनींनी आपल्या क्रोधाग्नीत भस्म केल्यावर त्यांना मोक्ष मिळावा म्हणून भगीरथ राजांनी तपश्चर्या करून गंगा नदीला स्वर्गातून भूतलावर आणल्याची आपली श्रद्धा आहे. तिची तीव्र धारा पृथ्वी सहन करू शकणार नाही म्हणून प्रत्यक्ष भगवान शंकरांनी स्वर्गीय गंगेला आपल्या मस्तकावर धारण केले. पापनाशिनी गंगा आपला उद्धार करते म्हणून गंगास्नानाचे महत्त्व आहे.

तिचे वर्णन करताना

**सर्वतीर्थमयी स्वर्गे, सुरासुर विवंदिता ।**
**पापं हरतू मे गंगा पुण्या स्वर्गापवर्गदा ॥**

गंगोत्री वरून निघून गंगासागरपर्यंत अनेक नद्यांना स्वतःच्या पदरात घेत अनेकांना मोक्ष देणारी गंगा देवादिकांसह सर्वांना वंदनीय आहे.

या सप्तनद्यांमध्ये श्लोकानुसार दुसऱ्या स्थानावर यमुना नदी आहे.

**कालिंदशैलजा सिद्धी बुद्धी शक्ती प्रदायिनी ।**
**यमुना हरतात् पापं, सर्वदा सर्वमंगला ॥**

भगवान श्रीकृष्णांच्या बाललीलेची साक्षीदार यमुना नदी आहे.

यमुनोत्री स्थानावरून या हिमालयाच्या कुशीतून निघालेली यमुना सूर्याची पुत्री, यमाची बहीण यमी असून प्रवाहित होऊन यमुना झाली. भगवान श्रीकृष्णाने गोकुळाष्टमीला मथुरेत बंदिवासात जन्म घेतल्यावर कंसापासून वाचविण्यासाठी वसुदेव त्यांना गोकुळात नेताना भगवंतांचा पहिला चरणस्पर्श जिला झाला ती म्हणजे यमुना आहे. ज्या कालियाने प्रवाह दूषित केल्यामुळे तिच्यातील अमृतत्व अबाधित ठेवण्यासाठी भगवान श्रीकृष्णांनी कालिया मर्दन करून कृपा केली ती यमुना. भगवंताने जिला आरोग्यवर्धिनी आणि अमृतधारा म्हणून संबोधिले ती यमुना. म्हणूनच आरोग्यासाठी आणि मृत्यू सुकर होण्यासाठी यमुनेचे आपण स्मरण करतो. आपल्याला पूजनीय अजून एक नदी म्हणजे गोदावरी.

**सर्वार्तिनाशिनी नित्यम् आयुरारोग्यवर्धिनी ।**
**गोदावरी च हरतात् पाप्मानं मे शिवप्रदा ॥**

त्र्यंबक क्षेत्री ब्रह्मगिरीतून गौतम ऋषींच्या तपामुळे प्रवाहित होणारी गोदावरी म्हणजे दक्षिण गंगा आहे. चुकून झालेला गोहत्येचा प्रमाद घालविण्यासाठी गौतम ऋषींनी केलेल्या साधनेतून प्रत्यक्ष गंगाच ब्रह्मगिरीतून गोदावरी बनून उगम पावली. या नदीला गौतमी देखील म्हणतात. कुश नावाच्या गवताच्या पात्याने गौतम ऋषींनी गोदावरीसाठी जे कुंड निर्माण केले ते कुशावर्त तीर्थ. जिथे सिंहस्थ कुंभस्नान होते. गोदावरी पातकांचा नाश करते, पितरांची शांती करते म्हणून इथे नारायण नागबळी, त्रिपिंडी करतात. पुढील नदी म्हणजे वेदवती सरस्वती नदी.

**वरप्रदायिनी तीर्थमुख्या संपत्प्रवर्धिनी च ।**
**सरस्वती च हरतू पापं मे शाश्वती सदा ॥**

वेद, उपनिषद, रामायण, महाभारत, पुराणात जिचा उल्लेख ती सरस्वती. हिमालयात उगम पावलेल्या या नदीच्या काठावर ऋषिमुनींनी वेद रचना केली.

वडवानल अग्नी पृथ्वीला भस्मसात करतोय हे पाहून भृगुपुत्र च्यवन ऋषींनी तो अग्नी पोटात घेऊन सागरात सोडण्याची विनंती सरस्वती नदीला केली. तिने तो वडवाग्नी लोकहितासाठी स्वतःच्या पोटात घेऊन पृथ्वीचे रक्षण तर केले पण त्यात तिचे अस्तित्व नष्ट झाले. ती लुप्त झाल्याची कथा आहे. असे असले तरी प्रयाग क्षेत्रापर्यंत ती आजही गुप्त रूपाने प्रवाहित आहे हा आमचा विश्वास त्या क्षेत्राला त्रिवेणी म्हणतो. तिच्या अस्तित्वाच्या खुणा आजही अनेक ठिकाणी आहेत. भारतात सर्वांत उपास्य नदी म्हणजे नर्मदा.

**पीयूषधारया नित्यं, आर्तिनाश तत्परा ।**
**नर्मदा हरतात पापं, पुण्यकर्म फलप्रदा ॥**

अमरकंटक येथून उगम पावलेली नर्मदा इतर नद्यांपेक्षा विपरीत म्हणजे पूर्वेकडून पश्चिमेकडे वाहते. अंधकासुराचा वध करून भगवान शिव अमरकंटकच्या पर्वतावर आराम करीत असताना त्यांच्या शरीरातून उत्सर्जित घामातून उत्पन्न झालेली नर्मदा शिवकन्या आहे. काही कारणवश शोणभद्राशी ठरलेला विवाह होऊ शकला नाही म्हणून आयुष्यभर कुमारिका राहण्याचा निर्णय नर्मदेने घेतला आणि त्याच्यापासून विपरीत दिशेने पश्चिमेकडे प्रवाहित झाली. ज्यिा नदीवरून हिंदू संस्कृती ओळखली जाते ती सिंधू नदी.

**भुवनत्रय कल्याणकारिणी चित्तरंजिनी ।**
**सिंधुर्हरतु पाप्मानं मम क्षिप्रं शिवा वहा ॥**

वैदिक काळापासून जिचा उल्लेख आहे. ती कैलास पर्वताजवळून उगम पावते. वरुण देवतेची कन्या असलेली सिंधू नदी मोक्षदायिनी आहे.

पुढील नदी म्हणजे दक्षिण गंगा म्हणून जिची ख्याती ती कावेरी नदी.

**अगस्त्यकुंभसंभूता पुराणेशू विवर्णिता ।**
**पापं हरतू कावेरी, पुण्यश्लोककरी सदा ॥**

कर्नाटकच्या ब्रह्मगिरीतून तळकावेरी येथे उगम पावणारी कावेरी साक्षात विष्णूंची पुत्री लोपामुद्रा आहे. अगस्ती ऋषींची पत्नी असलेली लोपामुद्रा दक्षिणेत दुष्काळ पडला म्हणून अगस्तींच्या कमंडलूतून नदी स्वरूपात बाहेर पडली. कावेरी विष्णूपुत्री असल्यामुळे ती मोक्षदायिनी आहे. गंगा, यमुना, सरस्वती, गोदावरी, नर्मदा, सिंधू आणि कावेरी या सप्तनद्या भारतीय संस्कृतीच्या जीवनदायिनी, मोक्षदायिनी आणि फलदायिनी आहेत. ■

९८२२२६२७३५

### इराणची खेळी, निर्णय आणि अस्तित्व....

इराण-इस्रायल युद्ध आणि अमेरिकेच्या निर्बंधामुळे इराणच्या अर्थव्यवस्थेवर गंभीर परिणाम झाला असून इराणी रियालचा प्रचंड ऱ्हास झालेला आहे. महागाई व अन्नधान्याचा तुटवडा निर्माण झाला आहे. या युद्धामुळे तेल निर्यात ठप्प झाल्यामुळे आणि पायाभूत सुविधांच्या अभावामुळे बेरोजगारी, निदर्शने यामुळे आर्थिक स्थिरता धोक्यात आली आहे.

तसेच होर्मुझची सामुद्रधुनी बंद झाल्यामुळे तेल निर्यातीला मोठा फटका बसलेला आहे. अमेरिकेच्या निर्बंधामुळे इराणला आंतरराष्ट्रीय बाजारातून तेल विकणे कठीण झाले आहे. यामुळे गुंतवणूक आणि देखभालीअभावी तेल आणि गॅस क्षेत्रात उत्पादकता कमी झाली आहे. अशा या संकटाचा सामना करीत असतानाच इराणने मोठी खेळी खेळण्याचा डाव रचलेला आहे की ज्यामुळे आर्थिक महासत्तेला हादरा होईल. आणि म्हणूनच इराणने सर्व काही गमावल्यानंतरही आजही ताठ उभा आहे. इराणकडे असलेले एक शक्तिशाली शस्त्र (ब्रह्मास्त्र) होर्मुझची सामद्रधुनीचा वापर योग्यवेळी योग्यरीत्या निर्णय घेऊन करावयाचा आहे की ज्यामुळे अमेरिकेला अडचणीत आणून अमेरिकन डॉलरची दादागिरी कमी करण्याचे समाधान मिळेल. आणि म्हणूनच इराणने असा निर्णय घेतलेला आहे की होर्मुझमधून तीच जहाजे जाऊ द्यायची, ज्यांनी चायनीज करन्सी युवानमध्ये तेलाची खरेदी केली आहे. इराणने घेतलेल्या या निर्णयामुळे अमेरिकेच्या पेट्रो-डॉलर इकॉनॉमीला तोडायचं आणि अमेरिकेच्या आर्थिक नाड्या दाबल्या जातील. कारण गेल्या कित्येक दशकापासून संपूर्ण आर्थिक व्यवहार हे डॉलरमध्येच होत असल्याने या अशा निर्णयामुळे एकाधिकारशाहीवर इराण चेक-मेट करण्याचा प्रयत्न करताना दिसून येत आहे. इराणने आखाती देशांवर हल्ले करून त्यांचे सर्व उद्योग बंद पाडले की ज्यामुळे अमेरिकेवर एक प्रकारचा दबाव निर्माण झाला होता, इराणला या पेट्रो डॉलर सिस्टिमवर निर्बंध आणून तेल, गॅसची खरेदी चीन-इराणची मैत्री संबंधामुळे चायनिज करन्सी युवानमध्ये मोठ्या प्रमाणात व्यापारी उलाढाल होईल व डॉलरवर घात केल्यासारखे होईल आणि अजून अमेरिकेवर दबाव निर्माण होईल.

**संजय श्रौती**/९८६०४५१८४०

## वाचक पत्रे

### वाटणीपत्रावरील नोंदणी शुल्कमाफीचा निर्णय स्वागतार्ह!

वडिलोपार्जित शेतजमिनीच्या वाटणीपत्रावर आकारले जाणारे नोंदणी शुल्क राज्य सरकारने माफ करण्याचा घेतलेला निर्णय हा निश्चितच शेतकरी बांधवांसाठी दिलासादायक आणि स्वागतार्ह आहे.

ग्रामीण भागात अनेक कुटुंबांमध्ये जमिनीच्या वाटणीचा प्रश्न वर्षानुवर्षे प्रलंबित राहत असे. यामागील एक प्रमुख कारण म्हणजे वाटणीपत्रासाठी लागणारे नोंदणी शुल्क नेमके कुणी भरायचे? त्यामुळे अनेक वेळा भावकीत तणाव निर्माण होऊन किंवा एकमत होत नसल्यामुळे वाटणीची प्रक्रिया वर्षानुवर्ष पुढे सरकत असे. आता शासनाने नोंदणी शुल्क माफ केल्यामुळे हा मोठा अडसर दूर झाला आहे.

त्यामुळे कुटुंबांतील प्रलंबित वाटण्या सहज आणि जलदगतीने पूर्ण होण्यास मदत होईल असं म्हणावयास हरकत नाही. हा निर्णय केवळ आर्थिक दिलासा देणारा नसून सामाजिक सलोखा टिकवण्यासही उपयुक्त ठरेल.

**विश्वनाथ पंडित**/९५८८४५०४४२

●● ●●

### समस्त महिलांचा अपमान

नारी शक्ती वंदन म्हणजे १३१ घटनादुरुस्ती म्हणजे महिला आरक्षण व मतदार पुनर्रचना संबंधित कायद्याला विरोधी पक्षांनी विरोध करून समस्त स्त्री वर्गाचा अपमान केला. सकाळी उठल्यापासून रात्री झोपेपर्यंत तुम्ही स्त्रीवर अवलंबून असतात.

मध्यंतरी काळात स्त्रियांना दुय्यम वागणूक होती. परंतु स्वा. सावरकरांनी सती प्रथेला प्रथम व नंतर त्याच्यावरील अनेक वाईट प्रथांवरा बंदी आणली. भाजपची सत्ता असलेल्या राज्यांत स्त्री भ्रूणहत्या विरोधी कायदा झाला. मुलींना मोफत शिक्षण, कुटुंबात त्रास असल्यास कोर्टात जाण्याची संमती दिली. त्यांना सन्मानाने जगण्याचा अधिकार दिला. राजमाता जिजाबाई, झाशीची राणी, अहिल्याबाई होळकर यासारख्या कर्तव्यवान स्त्रियांच होत्या. प्रातःकाली उठल्यानंतर स्त्री पुरुष दोघेही अहिल्या, द्रौपदी, सीता, तारा, मंदोदरी या महान स्त्रियांचे स्मरण करतात. त्या स्त्रियांचा अपमान म्हणजे बुडत्याचे पाय डोहाकडे.

विधेयकात काही त्रुटी असल्यास, आरक्षण दिल्याने कोणते नुकसान होणार हे सांगा. निवडणूक जाहीर झाली की प्रचारासाठी महिलांची मदत घेता ना! मत हवे म्हणून ताई, अक्का म्हणता, त्यांना विनंती करता. ज्येष्ठ स्त्रियांच्या पाया पडता. मग आता का विरोध? तुम्ही आमचा अपमान केला आहे. योग्य वेळी महिला याचा बदला घेतील, हे विरोधी पक्षांनी विसरू नये. ■

**निर्मला गांधी**/९११२२७५२८४

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास **९८५०७५३२८१** या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# नागरी समस्यांची दखल घेत पालिका आयुक्तांची ऑन द स्पॉट पाहणी

- सर्व चेंबर दुरुस्त करण्याचे डॉ. ओम्बासे यांचे आदेश
- कामात दिरंगाई करणाऱ्या कर्मचाऱ्यांवर कारवाईचा इशारा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ एप्रिल-**

शहरातील विविध नागरी समस्यांची गांभीर्याने दखल घेत महानगरपालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी आज समाचार चौक ते कन्ना चौक, कन्ना चौक परिसर तसेच जोडबसवन्ना चौकातील जमखंडी पुलाजवळ प्रत्यक्ष पाहणी करून संबंधित विभागांना आवश्यक त्या सूचना दिल्या.

यावेळी प्रभागाचे नगरसेवक प्रवीण दर्गोपाटील, नगरसेविका वाहिदा बानो शेख, मुख्य सफाई अधीक्षक अनिल चराटे, बिपीन धूम्मा, विभागीय अधिकारी प्रकाश सावंत, घनकचरा व्यवस्थापन विभागाचे कनिष्ठ अभियंता अभिजित बिराजदार, कनिष्ठ अभियंता चेतन प्रचंड, कनिष्ठ अभियंता श्रीदेवी गुत्ती, आरोग्य निरीक्षक धनशेट्टी यांच्यासह महानगरपालिकेचे विविध विभागांचे अधिकारी व कर्मचारी



उपस्थित होते.

समाचार चौक ते कन्ना चौक दरम्यान टाकण्यात आलेल्या अंडरग्राउंड लाईट केबलवरील युटिलिटी चेंबरची दुरवस्था लक्षात घेऊन आयुक्तांनी पाहाणी केली. अनेक ठिकाणी चेंबरची झाकणे तुटलेली किंवा योग्यरित्या बसवलेली नसल्याने नागरिकांच्या सुरक्षिततेला धोका निर्माण झाला आहे. याबाबत प्रभागातील नगरसेवक प्रवीण दर्गो पाटील यांनी आयुक्तांचे लक्ष वेधले होते. त्यानंतर आयुक्तांनी संबंधित अधिकाऱ्याना सर्व चेंबर दुरुस्त करण्याचे आदेश दिले. कामात दिरंगाई करणाऱ्या कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्यात येईल तसेच नागरिकांनी तक्रारी थेट महानगरपालिकेच्या ऑनलाइन पोर्टलवर नोंदवाव्यात, असे आवाहन केले आहे. त्यानंतर जोडबसवन्ना चौकातील जमखंडी पुलाजवळील नाल्याची पाहणी करत आयुक्तांनी नाल्यातील खच्चीकरण आणि पावसाळ्यात होणारी तुंबण लक्षात घेऊन पारंपरिक पाईपऐवजी 'बॉक्स कल्व्हर्ट' पद्धतीने नवीन पूल उभारण्याचे निर्देश देण्यात आले. यामुळे पाण्याचा प्रवाह सुरळीत राहून कचरा अडकणार नाही आणि परिसरातील दुर्गंधी व अस्वच्छता कमी होण्यास मदत होईल. या कामासाठी आमदार निधीतून तरतूद उपलब्ध असून निविदा प्रक्रिया तातडीने पूर्ण करून काम सुरू करण्याच्या सूचना देण्यात आल्या. तसेच कामादरम्यान वाहतुकीस अडथळा होणार नाही याची काळजी घेण्याचे आदेश दिले.

### विणकर बाग परिसरातील आकांक्षी शौचालय खुले करण्याचे आदेश

आयुक्तांनी कन्ना चौक, विणकर बाग परिसराची पाहणी केली. येथे नव्याने उभारण्यात आलेले 'आकांक्षी शौचालय' लवकरात लवकर नागरिकांसाठी खुले करण्याचे आदेश देण्यात आले. या शौचालयातील मुतारी सर्वांसाठी मोफत उपलब्ध राहणार असल्याचे आयुक्तांनी स्पष्ट केले. उघड्यावर जाण्याची प्रथा थांबवण्यासाठी ही सुविधा उपयुक्त ठरणार असल्याचे त्यांनी सांगितले. विणकर बागेतील बंद असलेले वाचनालय पुन्हा सुरू करण्याबाबत सकारात्मक निर्देश देत बागेची स्वच्छता आणि देखभाल करण्यास सांगितले. तसेच परिसरात उभ्या असलेल्या घनकचरा विभागाच्या आर.सी. गाड्या लवकरच भंगारात काढून जागा स्वच्छ ठेवण्याचे निर्देश दिले.

## फेर जाहीर लिलाव-२

**लोकमंगल नागरी सहकारी पतसंस्था मर्या., सोलापूर**
९४/२९ मंगल प्लाझा, जोडभावी पेठ, सोलापूर फोन नं ०२१७ २७३५५३७
**परिशिष्ठ -२०**

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १५६ व महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ चे नियम १०७ यास अनुसरून लोकमंगल नागरी सहकारी पतसंस्था मर्या, सोलापूर या पतसंस्थेवे थकबाकीदार श्री हणंमत रामचंद कुलकर्णी रा. माळकवठे ता. दक्षिण सोलापूर जि. सोलापूर यांची खालील नमुद केलेली पतसंस्थेस तारण असलेली स्थावर मालमत्ता त्यांचेकडील थकवाकी वसूलीसाठी विशेष वसूली अधिकारी यांनी दिनांक : ०२.०३.२०२३ रोजीच्या आदेशाने जप्त केलेली आहे. सदर स्थावर मिळकत मा. उपविभागीय अधिकारी दक्षिण सोलापूर यांचे आदेशाने मंडळ अधिकारी निबर्गी यांनी ताब्यात दिलेली मालमत्ता असून खाली नमुद केल्याप्रमाणे सदर मिळकतीचा जाहीर लिलावाने विक्री करण्यात येणार आहे. तरी इच्छूक खरेदीदारांनी सदर लिलावाच्या वेळी हजर राहून लिलाव विकीमध्ये सहभागी व्हावे.

**स्थावर मिळकतीचे वर्णन**

| अ. क्रं. | संस्थेचे नांव | थकबाकीदारांचे नांव व पत्ता | स्थावर मिळकतीचा तपशिल गट नंबर |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| | लोकमंगल नागरी सहकारी पतसंस्था मर्या सोलापूर | श्री हणंमत रामचंद्र कुलकर्णी रा. माळकवठे ता. दक्षिण सोलापूर जि. सोलापूर | मौजे. माळकवठे ता. दक्षिण सोलापूर जि. सोलापूर येथील गट नं २१२/१/अ/२, क्षेत्र २.४४ |

| लिलावाची तारीख | लिलावाची वेळ | लिलावाची ठिकाण | शेरा |
|---|---|---|---|
| ४ | ५ | ६ | ७ |
| वार:- बुधवार दिनांक: ०६.०५.२०२६ | सकाळी ११.०० वाजता | लोकमंगल नागरी सहकारी पतसंस्था मर्या सोलापूर प्रधान कार्यालय | |

टिप - १) लिलावाच्या शर्ती व अटी लिलावाच्या वेळी वाचून दाखविण्यात येईल.
२) लिलाव तारखेपूर्वी कर्जदाराने संपुर्ण व्याजासह रक्कम भरल्यास लिलाव रदद करण्यात यईल.
३) सदर मालमत्ता ''जशी आहे जेथे आहे'' या तत्वावर लिलाव करण्यात येईल.

**ठिकाण - सोलापूर**
**दिनांक - २२.०४.२०२६**

**सही/-**
**विशेष वसूली व विकी अधिकारी**
व्दारा लोकमंगल नागरी सहकारी पतसंस्था मर्या., सोलापूर

## महत्वाचे...



### शहरातील राष्ट्रमाता जिजाऊ यांच्या नियोजित स्मारकास तात्काळ निधी द्या

**सोलापूर, दि. २१ एप्रिल-**

छत्रपती संभाजी महाराज यांच्या पूर्णाकृती पुतळ्याजवळ पुष्पहार अर्पण करण्यासाठी (हायड्रोलिक शिडी) अथवा एल टाईप शिडी उपलब्ध करून देण्यात यावी, अशी मागणी संभाजी ब्रिगेडच्या वतीने उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर यांच्याकडे निवेदनेद्वारे करण्यात आली आहे. महानगरपालिकेच्या वतीने तात्काळ १४ मे छत्रपती संभाजी महाराज जयंतीच्या पूर्वी महाराजांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करण्यासाठी एल टाईप शिडी अथवा हायड्रोलिक शिडी उभारण्यात यावी, अशी मागणी संभाजी ब्रिगेडच्या वतीने खूप महापौर ज्ञानेश्वरी देवकर यांच्याकडे करण्यात आली. यावेळी संभाजी ब्रिगेडचे पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष श्याम कदम, जिल्हाध्यक्ष संभाजी राजे भोसले, महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्ष मीनल दास, जिल्हा कार्याध्यक्ष शेखर भोसले, जिल्हा उपाध्यक्ष फिरोज सय्यद, जिल्हा कार्याध्यक्ष इर्शाद नागोरे, जिल्हा उपाध्यक्ष मनीषा कोळी, शहर कार्याध्यक्ष सोनाली सगर आदी उपस्थित होते.



### रचना ऑफिसर्स सोशल असोसिएशनच्या अध्यक्षपदी संजय धनशेट्टी यांची निवड

**सोलापूर, दि. २१ एप्रिल-**

रचना ऑफिसर्स सोशल असोसिएशनचा कौटुंबिक स्नेह मेळावा आणि नवीन कार्यकारिणी निवड सोहळा सोलापुरात उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. सोलापूरच्या नूतन अध्यक्षपदी निवृत्त कार्यकारी अभियंता संजय धनशेट्टी तर कार्याध्यक्षपदी प्रल्हाद कांबळे यांची निवड करण्यात आली. कार्यक्रमाची सुरुवात संत रोहिदास महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. यावेळी चर्मकार समाजाच्या नगरसेविका श्रीदेवी फुलारे, संगिता जाधव व चाबुकस्वार यांचा सत्कार डॉ. विठ्ठल दांडगे यांच्या हस्ते करण्यात आला.यावेळी संस्थापक अध्यक्ष डॉ. विठ्ठलराव दांडगे, मेट्रो ठाणेचे मुख्य अभियंता सुरेश पाखरे, डॉ. विश्वनाथ शिंदे (धुळे) तसेच सोलापूर कार्यकारिणीचे नवनियुक्त अध्यक्ष संजय धनशेट्टी यांनी संघटनेची कार्यपद्धती, उद्दिष्टे आणि भविष्यातील वाटचाल यावर मार्गदर्शन केले. सूत्रसंचालन शाहीर रमेश खाडे यांनी केले. यावेळी जाहीर केलेली रोसा सोलापूरची नवीन कार्यकारिणी अशी अध्यक्षपदी संजय धनशेट्टी, कार्याध्यक्षपदी प्रल्हाद कांबळे, उपाध्यक्षपदी अशोक कांबळे व प्रा. डॉ. वसंत कोरे, सचिवपदी रमेश खाडे, सहसचिवपदी सुनील राजमाने व चेतन वाघमारे, खजिनदारपदी रविशंकर हत्याळीकर, सहखजिनदारपदी कृष्णा कबाडे यांची निवड करण्यात आली. मार्गदर्शक म्हणून हरीश सपताळे, कार्यकारिणी सदस्य सिध्दाराम सनके, अरुण शिखरे, सिध्दाराम चाबुकस्वार, दत्तात्रय शिंदे, अंगुले, शैलेश खडतरे, महेश रायबान, प्रसिद्धीप्रमुखपदी विश्वनाथ व्हनकोरे यांची निवड करण्यात आली आहे.

## शिवीगाळ केल्याचा जाब विचारल्याने मारहाण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२१ एप्रिल-**

शिवीगाळ केल्याचा जाब विचारल्याने लाकूड, लाथाबुक्क्याने केलेल्या महाराणीत महिला जखमी झाल्याची घटना दक्षिण सोलापूर तालुक्यातील कंदलगाव येथे मंगळवारी सकाळी ८ वाजण्याच्या सुमारास घडली. दिपाली तुकाराम आयगोळे (वय-४०, रा.कंदलगाव) असे जखमीचे नाव आहे. शिवीगाळ केल्याचा जाब विचारण्यासाठी गेले असता मंगळवारी सकाळी ८ वाजेच्या सुमारास त्यांना मल्लिकार्जुन कासे, श्रीमंत कासे आणि एक जणांनी मिळून मारहाण करून ढकलून दिले होते. यात जखमी झाल्याने त्यांना उपचारकरिता शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले.

### सांगोले नगरपरिषद सांगोले जि. सोलापूर

जा.क्र./सांनप/बांध/१९११ | दिनांक: २०/४/२०२६

ई-निविदा प्रसिद्धी सुचना

सांगोले नगरपरिषद, जि. सोलापूर मार्फत विविध शासकीय निधीतील कामांची ई निविदा सार्वजनिक बांधकाम विभागाकडील नोंदणीकृत ठेकेदार यांच्याकडून मागविणेत येत आहे. कामाचा सविस्तर तपशील http://mahatenders.gov.in या संकेत स्थळावर दिनांक २२/०४/२०२६ ते २९/०४/२०२६ रोजी पर्यंत उपलब्ध आहे.

**सही/-**
**(डॉ. सुधीर गवळी)**
मुख्याधिकारी
नगरपरिषद सांगोले

### जाहीर नोटीस

तमाम लोकांना विशेषतः शहर सोलापूर, तालुका उत्तर सोलापूर येथील तसेच आजूबाजूच्या परिसरातील लोकांना आमच्या अशिलांनी दिलेल्या अधिकार व माहिती व कागदपत्रावरून या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

डि.।। व सब डि.।। सोलापूर पैकी शहर सोलापूर महानगरपालिका ग.व.सु. हद्दीतील पेठ- शास्त्री नगर व झोपडपट्टी, वडार गल्ली, सोलापूर या नांवाने ओळखल्या जाणाऱ्या नगरातील झोपडी घर नं. ६१३ ही मिळकत घरजागा असून यांची म.न.पा. मिळकत क्र. १७११०५१ असा आहे. सदरची मिळकत आमचे अशील सौ.मंगल अर्जुन चव्हाण यांचे वडिल कै.व्यंकप्पा हणमंतु दाते यांचे नांवावर असून त्यांचे दि.२१/०५/२०१२ रोजी सोलापूर येथे मृत्यु झालेला आहे व तसेच आमचे अशिलाचे आई कै.तुळसाबाई व्यंकप्पा दाते यांचेही दि.१५/१२/२०१४ रोजी सोलापूर येथे मृत्यु झालेला आहे.

सदर ठिकाणी आमचे अशिलाचे वडिल कै.व्यंकप्पा हणमंतु दाते यांचे नांवे घर नं.६१३ शास्त्रीनगर, ब वडार गल्ली, सोलापूर येथे एकूण पाच खोल्या आहेत याचे क्षेत्र १० × १० फुटाचे दोन खोल्या, १० × ८ फुटाचे दोन खोल्या व १० × १२ फुटाची तीन खोल्या असे एकूण पाच खोल्या आहेत. सदरच्या खोल्या वीट बांधकाम केलेले आहेत.सदरहू घरजागेत आमचे अशील सौ.मंगल अर्जुन चव्हाण हे त्यांचे कुटुंबासह कायमस्वरूपी त्यांचे वडिलांचे हयातीपासून राहणेस आहेत. सदरहू घर नं. ६१३ शास्त्रीनगर व झोपडपट्टी या मिळकतीवरील आमचे अशिलाचे वडील कै.व्यंकप्पा हणमंतु दाते यांचे नांव कमी करून आमचे अशील सौ.मंगल अर्जुन चव्हाण यांचे नांवाची वारस नोंद करणेकामी सो.म.पा.चे कर आकारणी ग.व.सु. विभागाचे दप्तरी वारस नोंद होऊन त्यांचे नांवे कर पावती मिळावे याकरिता आमचे अशील म.न.पा.कडे अर्ज दाखल करणार आहेत. यास आमचे अशिलांचे अन्य वारस १) अंबादास व्यंकप्पा दाते (भाऊ), २) अंजनाबाई तिम्मा चव्हाण (बहिण), ३) शांता विठ्ठल विटकर (बहिण) या वारसांनी देखील आमचे अशील सौ.मंगल अर्जुन चव्हाण यांचे एकटीच्याच नांवे वारस नोंद होण्याकरिता संमती दिलेली आहे.

तरी सदरहू घरजागेवर आमचे अशिला व्यतिरिक्त इतर अन्य कोणाचाहि कुठल्याही प्रकारचे हक्क व अधिकार असेल अथवा इतर कोणाचाहि कसल्याही प्रकारचा हक्क व हितसंबंध, गहाण, दान, बक्षिस, लीज, करार, मदार, टाच, जप्ती, बोजा, पोटगी, बक्षिसपत्र, खरेदीखत अगर इतर हक्क व हितसंबंध असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ दिवसाचे आंत हक्काचे व अधिकाराचे लेखी कागदोपत्री पुराव्यानिशी खालील पत्त्यावर लेखी हरकत नोंदवावी. मुदतीत कोणाचेही कसलेही हरकत व तक्रार न आल्यास ही घरजागा निर्वेध, निजोखमी आहे असे समजून आमचे अशील त्यांचे नांवाची वारस नोंद सो.म.पा. चे कर आकारणी विभाग, ग.व.सु. विभागाचे दप्तरी त्याचे नांवाची वारस नोंद करून घेतील व त्यानंतर कोणाचेही व कसल्याही प्रकारचे तक्रार व हरकतीचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

ही जाहीर नोटीस दिली तारीख-- २१/०४/२०२६

**सही/-**
**अशिल**

**सही/-**
**ढेकणे एस.एम.**
ॲडव्होकेट
रा. १२६-अ वाणी गल्ली बाळे,
ता. उत्तर सोलापूर, जि. सोलापूर
अशिलातर्फे ॲडव्होकेट

### खरेदीपुर्व जाहीर नोटीस

तमाम लोकांस विशेषतः नागोबाचीवाडी, ता.बार्शी, जि.सोलापूर येथील व आसपासचे परिसरातील लोकांना कळविण्यात येते की, मिळकतीचे वर्णन : (अ) डि. सोलापूर सब डि. व ता. बार्शी पैकी मौजे नागोबाचीवाडी हद्दीतील शेतजमीन तिचा तपशील पुढील प्रमाणे: गट नं. २७५ क्षेत्र २ हे. ७५ आर, आकार २ रू. ७५ पैसे यापैकी उत्तरेकडील बाजूची जमीन तिचे क्षेत्र ०० हे. ८० आर, आकार ०० रू. ८० पैसे यासी चतु:सिमा : पुर्वेस - रस्ता, पश्चिमेस - व्हनकळस यांची जमीन, दक्षिणेस - गट नं. २७५ पैकी उर्वरीत जमीन उत्तरेस - गाडेगांव - नागोबाचीवाडी शिव आहे, येणेप्रमाणे चतु:सिमापुर्वक जमीन आतील दगडमाती, झाडझुडपे वगैरे सर्व तदंगभुत वस्तुसह व वहिवाटीचे हक्कासह शेतजमीन.

उपरोक्त वर्णन केलेली शेतजमीन ही श्री. अरुण लक्ष्मण शितोळे यांची स्वतंत्रखरेदी मालकी व कब्जेवहिवाटीची होती व आहे. विद्यमान मालकांनी सदरची शेतजमीन त्यांचे प्रापंचिक अडचणीसाठी, दुसरी सोयीस्कर मिळकत खरेदी करणेसाठी विक्रीस काढलेली आहे व आमचे अशिलाबरोबर विक्री करणेकामी दिनांक ०७/०४/२०२६ रोजी इसारपावतीचा दस्त हा लिहून देवून नोटरी समोर नोंदविलेला आहे. सदर शेतजमीन मिळकत निर्वेध, निजोखमी, बिनबोजाची खरेदी देण्याची ग्वाही व भरवसा मालकांनी आमच्या अशिलास दिलेला आहे.

तरी वर नमुद शेतजमीनीवरती कोणाचा हक्क अधिकार, हितसंबंध असल्यास सदर शेतजमीन संदर्भात कोणी साठेखत, खरेदीखत, गहाणखत, बँक बोजा, वाटणीपत्र, मृत्यूपत्र, कोर्ट केसेस, बँक केसेस किंवा तत्सम स्वरुपाचा दस्त केला असल्यास किंवा सदर शेत जमीनवर कोणाचा बोजा हक्क, हितसंबंध असल्यास तसेच मोजणी संबंधी काही तक्रारी, हरकती असल्यास काही वाद असल्यास सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ८ दिवसाच्या आत लेखी स्वरुपात हरकत खालील पत्त्यावर कळवावी. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर शेतजमीन ही निर्वेध निजोखमी, बिनबोजाची आहे असे समजून आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील. मुदतीनंतर कोणाचीही तक्रार, हरकत आल्यास ती आमचे अशिलाचे खरेदीहक्कावर बंधनकारक राहणार नाही. कोणाचीही फसवणुक होवू नये म्हणून ही खरेदी पुर्व जाहीर नोटीस दिली असे.

ता. २१/०४/२०२६

(शिक्का)

**सही/-**
**श्री. लक्ष्मीकांत सिध्देश्वर झाडे**
ॲडव्होकेट
२२०९/३८, सिध्देश्वर निवास,
गणेश नगर, माढा रोड,
वैराग, ता. बार्शी, जि. सोलापूर
अशिलातर्फे ॲडव्होकेट

### जाहीर प्रसिध्दीकरण

दि. कि. अर्ज नं. १३८/२०२५
नि. नं. ५

**बार्शी येथील मे. सि. ज. ज्यु. डि. साहेब यांचे कोर्टात**

**हर्षदा महादेव दळवी,** वय - १६ वर्षे
धंदा - शिक्षण, रा. खांडवी,
ता. बार्शी, जि. सोलापूर, अ.पा.क. मामा -- **अर्जदार**
**सहदेव यशवंत साबळे,** वय - ४३ वर्षे,
धंदा - शेती, रा. पिंपरी (शि.) पाडोळी,
ता. कळंब जि. धाराशिव

**विरुद्ध**

**निरंक (कोणीही नाही)** -- **सामनेवाला**

**ज्याअर्थी,**

यातील अर्जदार हर्षदा महादेव दळवी ही अज्ञान असून तिचे वतीने तिचा मामा सहदेव यशवंत साबळे याने सदरचा अर्ज बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट अन्वये हेअरशिप/वारस दाखला मिळणेसाठी दाखल केलेला आहे. अज्ञान अर्जदार हर्षदा महादेव दळवी हिचे वडिल महादेव विश्वनाथ दळवी हे दि. ०१/१०/२०१० रोजी मौजे खांडवी, ता. बार्शी, जि. सोलापूर येथे मयत झालेले आहेत. तसेच अर्जदाराची आई योगीता महादेव दळवी ही देखील दि. २८/०८/२०१६ रोजी लातूर, ता. जि. लातूर येथे मयत झालेली आहे. अर्जदारा व्यतिरीक्त मयत महादेव विश्वनाथ दळवी व मयत योगीता महादेव दळवी यांना इतर कोणीही वारस नाहीत. मयत महादेव विश्वनाथ दळवी व मयत योगीता महादेव दळवी यांना यातील अर्जदार ही एकमेव कायदेशीर वारस असल्याने मयताचे पश्चात अज्ञान अर्जदार हर्षदा महादेव दळवी हिस मिळणारे शासकीय लाभ घेण्यासाठी तसेच वारसा हक्काने स्थावर मिळकतीस नोंदी घेण्यासाठी हेअरशिप / वारस प्रमाणपत्र मिळणेकामी यातील अज्ञान अर्जदार हर्षदा महादेव दळवी हिचे वतीने तिचे मामा सहदेव यशवंत साबळे यांनी सदरचा अर्ज मे. कोर्टात दाखल केलेला आहे.

**त्याअर्थी,**

मयत महादेव विश्वनाथ दळवी व मयत योगीता महादेव दळवी यांना यातील अज्ञान अर्जदार हर्षदा महादेव दळवी ही एकमेव कायदेशीर वारस असल्याने मयताचे पश्चात अज्ञान अर्जदार हर्षदा महादेव दळवी हिस हेअरशिप/ वारस प्रमाणपत्र मिळणेकामी कोणाची काही हरकत, तक्रार असल्यास सदरची नोटीस प्रसिद्ध झालेपासून एक महिन्याचे आत अथवा मे. कोर्टानी नेमलेली ता. ०४/०५/२०२६ रोजी स्वतः अगर माहितगार ॲडव्होकेटमार्फत हजर होवून हरकत, तक्रार नोंदवावी. अन्यथा मुदतीत कोणाचे म्हणणे, तक्रार, हरकत न आलेस मे. कोर्ट पुढील योग्य ते आदेश पारीत करतील.

कळावे, हे जाहीर प्रसिद्धीकरण मे. कोर्टाचे सहीशिक्यानिशी दिले असे.

ता. २०/०४/२०२६

(शिक्का)

**सही/-**
**सहा. अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय क. स्तर, बार्शी**

### दि न्यू इंडिया एयश्योरनस कं. लि.

**पुणे क्षेत्रिय कार्यालय, (१५००००)**
**दूसरा मजला, शारदा सेंटर. नळस्टॉप जवळ, कर्वे रोड.**
**पुणे ४११००४. फोन: ०२०-२५४३९९०२, २५४६३८५२,**
**वेबसाईट**-newindia.co.in, **ई-मेल** : nia.150000@newindia.co.in

**नोटीस**

कंपनीचे विमा पॉलिसी धारक व तमाम जनतेस कळविण्यात येते की कंपनीच्या व्यवस्थापनाने कंपनीचे कुर्डूवाडी (१५१३०७), बोरामणीकर कॉम्प्लेक्स, वासले हॉस्पिटल जवळ, माढा रोड, ४१३२०८, वरील ऑफिस दि. ०१/०४/२०२६ पासून बंद करण्याचा निर्णय घेतलेला आहे. सदर मायक्रो ऑफिसचे कामकाज बंद होईल. दाव्याचा लाभ घेणारे आपल्या पुढील कार्यालयात सर्व सेवा प्राप्त करू शकतील.

**द न्यू इंडिया एयश्योरनस कं. लि.**
(दि न्यू इंडिया एयश्योरनस कं. लि.) सोलापूर शाखा कार्यालय
(१५१३००) हुतात्मा स्मृती मंदिर कॉम्प्लेक्स, पार्क चौक, सोलापूर ४१३००१.

**सही/-**
**उप महा व्यवस्थापक**
**दि न्यू इंडिया एयश्योरनस कं. लि.**
**पुणे क्षेत्रिय कार्यालय**

### मे. उपनिबंधक, सहकारी संस्था, शहर सोलापूरा, सोलापूर यांचे समोर सोलापूर जिल्हा महसूल कर्मचारी सहकारी पतसंस्था नियमित सोलापूर

सिटी सर्व्हे नं. ८४१३ दुसरा मजला, जुने जिल्हाधिकारी आवार, सोलापूर ४१३००३

जा. क्र./उप/ २०२६

श्री महादेव नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, सोलापूर — अर्जदार
विरूध्द
(खालील तपशिलातील नमुद केलेले थकबाकीदार सभासद) — जाब देणार

| अ. क्र. | | दावा रक्कम | प्रतिवादी नंबर | प्रतिवादीचे नांव व पत्ता |
|---|---|---|---|---|
| १ | ८७२/२०२६ | ५६५४२/- | २ | १. श्री. सिध्देश्वर नागप्पा वाले रा. ९०,९१ सिध्दारामेश्वर नगर सत्यव्वा मंदीर सोलापुर जि सोलापूर २. श्री. शिवशंकर प्रभुलिंग बबलेश्वर रा. ४६ अंबिका नगर सोलापुर जि सोलापूर |
| २ | ८६७/२०२६ | १५९६८९/- | | १. श्री. बसवराज सातप्पा शटगार रा. सलगर ता अक्कलकोट जि सोलापूर २. श्री. राजशेखर चन्नप्पा शटगार रा. सलगर ता अक्कलकोट जि सोलापूर ३. श्री. विष्णु विठ्ठल सलगर रा. ३३, ३४ न्यु पाच्छा पेठ सोलापुर जि. सोलापूर |
| ३ | ८७०/२०२६ | ९४०१२/- | | १. सौ. गिताबाई राजकुमार पवार रा. २९९ अ राजेश्वर हौसींग सोसायटी विजापुर रोड सोलापुर जि सोलापूर २. श्री. सुभाष विठ्ठल गायकवाड रा. श्रध्दा निवास सेंटलमेंन्ट कॉलनी १ सोलापुर जि सोलापूर |
| ४ | ८७३/२०२६ | ८७६७९/- | | १. श्री. गणेश अतुल वाघमोडे रा. प्लॉट नं ४ डीसीसी बँक कॉलनी विजापुर रोड सोलापुर जि सोलापूर ३. श्री. पाडु श्रीकांत दोडमनी रा. रामवाडी धोंडीबा वस्ती सोलापुर जि. सोलापूर |
| ५ | ८७१/२०२६ | ८१०४७/- | | ३. श्री. रियाज नबीरसुल शेख रा. १९६ भवानी पेठ सोलापुर जि. सोलापूर |
| ६ | ८७५/२०२६ | ५७०४३/- | | ३. श्री. आनंद सिद्राम तेलगांवकर रा. ५०.१ मोदीखाना सोलापुर जि. सोलापूर |
| ७ | ८७४/२०२६ | ८०८०५/- | | ३. श्री. सागर कांतीलाल हंबीरराव रा. ८७ लक्ष्मी पेठ सोलापुर जि. सोलापूर |
| ८ | ८६९/२०२६ | ७९४०१/- | | ३. श्री. अंबादास सुर्यकांत सुरडे रा. ९७.४५ ॲग्रो इंडस्ट्रिज रविवार पेठ सोलापुर जि. सोलापूर |
| ९ | ८६६/२०२६ | १८,०६,४६०/- | | १. श्री. लक्ष्मण अंबादास पुकाळे रा. वॉलचंद कॉलेजजवळ अ. १८५ एकता नगर वॉलचंद कॉलेजच्या पाठीमागे सोलापूर ३. श्री. श्रीनिवास लक्ष्मण पुकाळे रा. अ १८५ एकता नगर वॉलचंद कॉलेजच्या पाठीमागे सोलापुर जि. सोलापूर |
| १० | ८६५/२०२६ | ७२५६१/- | | १. श्री. म सिराज नजीर अहमद शेख रा. १. ३. अ अंत्रोळीकर नगर सोलापूर जि. सोलापूर २. श्री. म. गौस कादर शेख रा. १.५९ भवानी पेठ घोंगडे वस्ती सोलापुर जि. सोलापूर ३. श्री. प्रथमेश रामलिंग कांबळे रा. भवानी पेठ सोलापुर जि. सोलापूर |
| ११ | ८६८/२०२६ | ८२४११/- | | १. श्री. लक्ष्मीनारायण मार्कंडेय वल्पदास रा. ३९.४० विणकर हौसींग सोसायटी द सदर बाजार सोलापूर जि. सोलापूर २. श्री. वेगुगोपाल परमेश्वर कोंडम रा.१९ राजेश कोटे नगर विडीघरकुल सोलापुर जि. सोलापूर ३. श्री. लक्ष्मीकांत नरेश चिलवेरी रा. डी ८१९ जुना विडी घरकुल हैद्राबाद रोड सोलापुर जि. सोलापूर |

यात वादी पतसंस्था यांनी दाखल केलेल्या अर्जातील वर नमूद केलेल्या पतिवादी यांच पते उपलब्ध होत नसल्यामुळे/पत्तावर आढळुन येत नसल्याने /अपुरा पत्ता असल्याने सदरचे जाहीर समन्स देणेत येत आहे-

प्रतिवादी यांना जाहीर समन्सद्वारे कळविणे येते की, उपनिर्दिष्ट अर्जासंबंधी आपले म्हणणे मांडणेसाठी स्वताः जातीने अथवा वकिलामार्फत दिनांक- ०५/०५/२०२६ रोजी दुपारी १२.०० वा. कागदपत्रासह या कार्यालयात हजर रहावे.

प्रतिवादी यांनी तारखेस वेळेवर हजर न राहिल्यास त्यांच्या गैरहजेरीत अर्जाची सुनावणी घेण्यात येईल व पुढील योग्य तो निर्णय केला जाईल -

आज दि. २१/०४/२०२६ रोजी माझी सही व कार्यालयाचे मुढेसह हे जाहीर समन्स दिले आहे.

**स्थळ - सोलापुर**
**दि - २१/०४/२०२६**

(शिक्का)

**सही/-**
**डॉ. प्र. अ. बागल**
उपनिबंधक
सहकारी संस्था, सोलापुर शहर.
सोलापुर

## ग्रंथ दिनानिमित्त उद्या व्याख्यान व सत्कार कार्यक्रम

**सोलापूर, दि. २१ एप्रिल-**

श्री हिराचंद नेमचंद वाचनालय यांच्या वतीने जागतिक ग्रंथ दिनानिमित्त व्याख्यान व सत्कार कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. हा कार्यक्रम गुरुवार, दि. २३ एप्रिल रोजी सायंकाळी ६ वाजता लोकमान्य टिळक सभागृह येथे होणार आहे. या कार्यक्रमात नाट्यलेखक शिरीष देखणे विल्यम शेक्सपिअरच्या नाटकांची वैशिष्ट्ये या विषयावर बोलतील . तसेच ज्येष्ठ साहित्यिक डॉ. गीता नरेंद्र जोशी यांच्या डोकं शाबूत आहे. या कादंबरीसाठी आणि प्रा. डॉ. अर्जुन व्हटकर यांच्या मुक्या जंगलाची गर्जना या कथासंग्रहासाठी मध्यप्रदेश संस्कृती मराठी परिषद, भोपाळ यांच्यातर्फे प्रदान करण्यात आलेल्या कविवर्य भास्कर रामचंद्र तांबे पुरस्काराबद्दल त्यांचा सत्कार करण्यात येणार असून याप्रसंगी ते मनोगत व्यक्त करतील. कार्यक्रमासाठी उपस्थित राहण्याचे आवाहन संयोजकांनी केले आहे.

### बँक ऑफ महाराष्ट्र/ Bank of Maharashtra

**प्रधान कार्यालय/ Head Office**
**लोकमंगल, 1501, शिवाजीनगर, पुणे-5 / Lokmangal, 150,.Shivajinagar, Pune-5**
**आंचलिक कार्यालय, सोलापुर / Zonal office, Solapur**
आंचलिक कार्यालय, अगरवाल पैलेस, पहिला मजला, डी मार्ट – भारती विद्यापीठ रोड, जुले सोलापुर, सोलापुर - 413004
फोन /Phone - (0217) 2733870 / 71 ई-मेल /E-mail: legal_sol@mahabank.co.in

**नियम - ८ (१)**
**ताबा सूचना**

याद्वारे, बँक ऑफ महाराष्ट्राचा अधिकृत अधिकारी, सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल असेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट क्ट, २००२ अंतर्गत, आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) नियम, २००२ च्या नियम ३ सह वाचलेल्या कलम १३ च्या उप-कलम (१२) अंतर्गत प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून, १६/०२/२०२६ रोजी मागणी सूचना जारी केली होती, ज्यामध्ये खाली नमूद केलेल्या कर्जदार आणि जामीनदारांना सदर सूचना मिळाल्याच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत संपूर्ण देय रक्कम परत करण्याची सूचना देण्यात आली होती.

कर्जदार रक्कम परत करण्यात अयशस्वी झाल्यामुळे, या सूचनाद्वारे कर्जदार, जामीनदार आणि सर्वसामान्य जनतेला सूचित करण्यात येते की, मी, सदर कायद्याच्या कलम १३ च्या उप-कलम (४) आणि सिक्युरिटी इंटरेस्ट एन्फोर्समेंट नियम, २००२ च्या नियम ८ अंतर्गत मला प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून, १८/०४/२०२६ रोजी खाली वर्णन केलेल्या मालमत्तेचा प्रतिकात्मक ताबा घेतला आहे.

विशेषतः कर्जदार आणि सर्वसामान्य जनतेला या मालमत्तांशी कोणताही व्यवहार न करण्याची ताकीद देण्यात येत आहे आणि या मालमत्तांशी केलेला कोणताही व्यवहार वर नमूद केलेल्या रकमेसाठी बँक ऑफ महाराष्ट्रच्या भाराच्या अधीन असेल.

सुरक्षित मालमत्ता सोडवण्यासाठी उपलब्ध असलेल्या वेळेच्या संदर्भात, कर्जदाराचे लक्ष कायद्याच्या कलम १३ च्या उप-कलम (८) च्या तरतुदींकडे वेधले जाते.

| अ.क्र. | शाखा, कर्जदार आणि जामीनदार यांचे नाव | गहाण ठेवलेल्या मालमत्तेचा तपशील | डिमांड नोटिसची तारीख आणि एकूण थकबाकी |
|---|---|---|---|
| 1 | **शाखा- वळसंग** **कर्जदार -** **१. मे. गुलनाझ स्टील अँड सिमेंट एजन्सी** **मालक: श्रीमती सबिहा रोमन शेख** पत्ता- इंगळगी, ता.- दक्षिण सोलापूर, जि.- सोलापूर-४१३००२. **जामीनदार: -** **२. श्री. रोमन इलाही शेख** पत्ता- इंगळगी, ता.- दक्षिण सोलापूर, जि.- सोलापूर-४१३००२. | **सुरक्षा :-** **गहाण ठेवलेल्या मालमत्तेचे वर्णन** **सर्व भाग व तुकडे -** गट क्रमांक १४८/४/१५२/२/१ए२ प्लॉट क्रमांक ९३, पोस्ट- वळसंग, तालुका- दक्षिण सोलापूर, जिल्हा- सोलापूर, महाराष्ट्र येथील मालमत्तेचे समन्यायी गहाण. मालक: श्री. रोमन इलाही शेख. सीमा: - पूर्व - रस्ता पश्चिम-गट क्रमांक १५२/२/२ (२+२ए/बी) दक्षिण - प्लॉट क्रमांक ९४ उत्तर - प्लॉट क्रमांक ९२ CERSI - २०००७२९२१८५९. **२. माल आणि साठ्यावरील कर्जाचे तारण.** CERSI -२०००७२९२१९०५ | **खात्यातील शिल्लक :** रु. १६,३७,७०१.२६/- + **लागू न केलेले व्याज** रु. ७४,९८४.००/- **एकूण** = रु. १७,१२,६८५.२६/- (सतरा लाख बारा हजार सहाशे पंच्याऐंशी रुपये आणि सव्वीस पैसे फक्त) **प्रतिकात्मक ताबा** **दिनांक :** १८/०४/२०२६ |

**ठिकाण - सोलापूर**
**दिनांक - 21/04/2026**

**सही/-**
**मुख्य व्यवस्थापक आणि प्राधिकृत अधिकारी, सोलापूर झोन.**

## Classifieds

**विकणे आहे**

'मारुती अपार्टमेंट' रुबी नगर सिध्देश्वर ज्वेलर्स समोर बॉम्बे पार्क रोड, जुळे सोलापूर येथील दुसऱ्या मजल्यावरील २ बीएचके प्लॅट लमसम रकमेवर भाडेवर अथवा योग्य किंमतीस विकणे आहे.
मो. ९६७३१६१६९०/ ८१८०८६१०३८/ ९२२५७४९०४०

**दै. सोलापूर तरुण भारत मध्ये प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातींमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्या नुसारच प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही मजकुराच्या सत्यतेबाबत दै. सोलापूर तरुण भारत हमी घेऊ शकत नाही, याची वाचकांनी नोंद घ्यावी.**




# लखनौविरुद्ध राजस्थान करणार विजयासाठी धडपड

♦ **लखनौ, २१ एप्रिल**

गेल्या दोन सामन्यांमध्ये पराभव झाल्यामुळे निराशेच्या गर्तेत असलेला राजस्थान रॉयल्स संघ येथे उद्या बुधवारी लखनौ सुपर जायंट्सविरुद्धच्या सामन्यात यश संपादन करून पुन्हा एकदा विजयाच्या मार्गावर परतण्याचा प्रयत्न करणार आहे. पराजयाची मालिका खंडित करण्यासाठी राजस्थानच्या संघाला विजयासाठी धडपड करावी लागणार आहे.

आतापर्यंत झालेल्या सहा साखळी सामन्यांपैकी चार सामने जिंकून राजस्थानचा संघ आठ गुणांसह गुणतालिकेत तिसऱ्या स्थानी आहे. मात्र, नंतरच्या सलग दोन सामन्यांत या संघाला पराभवाचा सामना करावा लागला होता. २००८ च्या विजेत्या या संघाने स्पर्धेतील पहिले सलग चार सामने जिंकून यंदा चांगली सुरुवात केली होती. नंतरच्या दोन पराभवामुळे हा संघ काही प्रमाणात का होईना पण निराश झाला आहे. त्यामुळे लखनौसारख्या संघाविरुद्ध विजय प्राप्त करण्याचा हा संघ उद्याच्या सामन्यात प्रयत्न करणार आहे. आधीच्या सामन्यात सनरायझर्स हैदराबाद संघाकडून राजस्थान संघाला ५७ धावांनी मात खावी लागली होती. या सामन्यात हैदराबादच्या वेगवान गोलंदाजीपुढे राजस्थान संघाच्या फलंदाजीची आघाडीची फळी गळपटली होती. त्यांना अवघ्या नऊ धावांमध्ये पाच फलंदाज गमवावे लागले होते. अन्य एका सामन्यात कोलकाता नाईट रायडर्सविरुद्ध खेळताना राजस्थान संघाची स्थिती एकवेळ चांगली होती. मात्र, त्याचा त्यांना फायदा घेता आला नाही. कोलकात्याचा आक्रमक फलंदाज रिंकू सिंह याने उत्कृष्ट फलंदाजीचे प्रदर्शन करीत सामन्याचे चित्र बदलवून टाकले होते. गचाळ क्षेत्ररक्षणही राजस्थान संघासाठी डोकेदुखी ठरू पाहात आहे. कोलकाता संघाचा रिंकू सिंह आठ धावांवर असताना नांद्रे बर्गर याने त्याचा झेल सोडला होता आणि तोच क्षण राजस्थान संघासाठी महाग पडला होता. रिंकूने अनुकूल रॉयसोबत खेळताना शेवटच्या षटकांमध्ये सामना कोलकाता संघाच्या बाजूने झुकविला होता. राजस्थान संघाला फलंदाजीतील सातत्य अजूनही कायम राखता आलेले नाही. सनरायझर्सविरुद्ध राजस्थानचा डाव गडगडला होता, तर सलामीचे फलंदाज वैभव सूर्यवंशी व यशस्वी जयस्वाल यांनी चांगली सुरुवात करून दिल्यानंतरही राजस्थान संघाच्या मधल्या व खालच्या फळीतील फलंदाजांना कोलकाता विरुद्धच्या सामन्यात त्याचा फायदा घेता आला नाही. वैभव व यशस्वी जोडीने पहिल्या गड्यासाठी ८१ धावा जोडल्या होत्या. गेल्या दोन सामन्यांमध्ये पराभव झाला असला तरी राजस्थानचा संघ लखनौविरुद्ध मजबूत स्थितीत दिसतो आहे.

लखनौ संघाला सलग तीन पराभव पचवावे लागल्यामुळे हा संघ सहा सामन्यांत दोन विजय व चार गुणांसह नवव्या स्थानी आहे. राजस्थान संघाला या सामन्यात आपल्या फलंदाजीत मजबुती दाखवावी लागणार आहे. मात्र, लखनौ संघाच्या गोलंदाजांची अलिकडच्या सामन्यांतील कामगिरी पाहता राजस्थानच्या फलंदाजांना थोड्या आशा आहेत. कारण, पंजाब किंग्जविरुद्धच्या आधीच्या सामन्यात लखनौच्या गोलंदाजांना सूर गवसला नव्हता.

परिणामस्वरूप प्रियांश आर्य आणि कूपर कॉनॉली यांच्या उत्कृष्ट फलंदाजीच्या जोरावर पंजाब किंग्ज संघाने सात गडी राखून २५४ धावा केल्या होत्या आणि लखनौला ५४ धावांनी पराभूत केले होते. प्रिंस यादववगळता या सामन्यात लखनौच्या उर्वरित एकाही गोलंदाजाला प्रभावी गोलंदाजी करता आली नव्हती. प्रिंसने चार षटकांत २५ धावा देत दोन फलंदाज बाद केले होते. आवेश खान, मोहम्मद शमी व मणिकरण सिद्धार्थ चांगली गोलंदाजी करू शकले नव्हते. असे असले तरी लखनौचा संघ राजस्थानच्या मधल्या फळीतील फलंदाजांना लक्ष्य करण्याची शक्यता आहे.

राजस्थान संघासमोरही हा एक चिंतेचा विषय आहे. राजस्थानप्रमाणेच लखनौ संघाला आपल्या फलंदाजांच्या कामगिरीची चिंता वाटत आहे. फलंदाजीच्या क्रमाचे प्रयोग करूनही या संघाला अजून पाहिजे तसे यश मिळालेले नाही. राजस्थानविरुद्ध जर यश खेचून आणायचे असेल तर लखनौ संघाला फलंदाजी आणि गोलंदाजी या दोन्ही क्षेत्रात चांगली कामगिरी बजवावी लागणार आहे.

◂(वृत्तसंस्था)

**आजचा सामना**

**लखनौ सुपर जायंट्स विरुद्ध राजस्थान रॉयल्स**
**स्थळ** : एकाना क्रिकेट स्टेडियम, लखनौ
**वेळ** : सायंकाळी ७.३० वाजतापासून
**थेट प्रसारण** : स्टार स्पोर्ट्सवर



टेनिसपटू नोवाक जोकोविच स्पेनच्या माद्रिद शहरात आयोजित एका जागतिक क्रीडा पुरस्कार समारंभात सहभागी होण्यासाठी आला असता त्याने अशी पोझ दिली

## महत्त्वाचे

### आशियाड प्रसारणाचे हक्क सोनीला

**नवी दिल्ली** : सोनी पिक्चर्स नेटवर्क इंडियाने १९ सप्टेंबर ते ४ ऑक्टोबरदरम्यान जपानच्या आईची-नागोया येथे होणाऱ्या २० व्या आशियाड क्रीडा स्पर्धेच्या प्रसारणाचे विशेष हक्क प्राप्त केले आहेत. प्रसारणाचे हक्क प्राप्त करण्यासाठी करण्यात आलेल्या करारानुसार, आशिया महाखंडातील देशांमध्ये होणाऱ्या या क्रीडा स्पर्धेच्या सामन्यांचे प्रसारण सोनी स्पोर्ट्स नेटवर्क वाहिनीवर केले जाईल. हे प्रसारण भारतासह आशिया महाखंडात सोनी लिववर स्ट्रिम केले जाईल. भारताने गेल्या आशियाड स्पर्धेत विक्रमी १०७ पदके प्राप्त केली होती. यंदाच्या स्पर्धेतही भारतीय पथक आणखी चांगली कामगिरी बजावण्याची शक्यता आहे. ऑलिम्पिक स्पर्धेत सहभागी ३२ खेळांसह एकूण ४१ खेळांचे खेळाडू या आशियाड स्पर्धेत आपले भाग्य आजमावणार आहेत. यंदाच्या या स्पर्धेत मिश्र मार्शल आर्ट आणि सर्फिंगसारख्या नवीन खेळांचा समावेश करण्यात आला आहे. याशिवाय क्रिकेट, टेनिस, ई-स्पोर्ट्स, कबड्डी, सेपक टकरा आणि कुराशसारखे खेळही राहणार आहेत. क्रिकेट भारतीय प्रेक्षकांसाठी एक विशेष आकर्षण राहणार आहे. हा खेळ पुरुष आणि महिला अशा दोन्ही विभागांत खेळला जाणार आहे. ■

### मुख्यमंत्री मान यांचे हॉकीपटू बोवलँडरला निमंत्रण



**चंदीगड** : पंजाबचे मुख्यमंत्री भगवंत सिंह मान यांनी नेदरलॅण्डच्या आपल्या दौऱ्यात दिग्गज हॉकीपटू फ्लोरिस यान बोवलँडरची भेट घेऊन त्यांना राज्यातील हॉकीला आणखी मजबूत करण्यासाठी तसेच प्रतिष्ठेच्या आशिया अजिंक्यपद चषक स्पर्धेसंदर्भात त्याच्या अनुभवाचा फायदा घेण्यासाठी पंजाबला येण्याचे निमंत्रण दिले आहे. मान एका बैठकीत हॉकी आणि इतर खेळांच्या गतिविधींसंदर्भात बोलताना म्हणाले की, राज्य सरकार राष्ट्रीय खेळ असलेल्या हॉकीला पुन्हा चांगले दिवस दाखविण्यासाठी कटिबद्ध आहे. मान यांनी ६० वर्षीय बोवलँडरचे कौशल्य आणि हॉकीमधील त्यांच्या योगदानाचे कौतुक करताना म्हटले आहे की, त्यांची ही कारकीर्द आजही जगभरातील युवा खेळाडूंसाठी प्रेरणादायी आहे.

### तुषार, मन्नतला संयुक्त आघाडी

**लुबुम्बाशी (कांगो)** : युवा गोल्फपटू तुषार पन्नू आणि मन्नत बरार यांनी एएम ग्रीन कायजीपीएल आमंत्रित कांगो गोल्फ स्पर्धेत पहिल्या दिवशी सहा अंडर ६७ चा समसमान स्कोअर करीत संयुक्त आघाडी घेतली आहे. गेल्या वर्षी व्यावसायिक झालेल्या २१ वर्षीय पन्नूने पाच बर्डी, एक ईगल आणि एक बोगी केली, तर अलिकडेच महिला गोल्फ संघटनेची व्यावसायिक खेळाडू झालेल्या १९ वर्षीय बरारने पहिल्या फेरीत एकही बोगी केली नाही. या दोघांपाठोपाठ सुखमन सिंह याने पाच अंडर ६८ चा स्कोअर केला. तो एकटा तिसऱ्या स्थानी आहे. तसेच अमन राज व हरेंद्र गुप्ता संयुक्तरीत्या तिसऱ्या स्थानी आहे. या दोघांचा चार अंडर ६९ स्कोअर आहे. उदयन माने, मानव शाह आणि सय्यद साकिब अहमद हे तीन अंडर ७० च्या स्कोअरसह संयुक्तरीत्या सहाव्या स्थानी आहेत.

### रग्बी : गतविजेत्या पश्चिम बंगालची विजयी सलामी

**राजगीर (बिहार)** : गतविजेत्या पश्चिम बंगाल संघाने चंदीगड आणि छत्तीसगड संघांचा एकतर्फी पराभव करीत येथे आयोजित सीनियर राष्ट्रीय रग्बी सेव्हन्स अजिंक्यपद स्पर्धेतील पुरुष विभागात विजयी सलामी दिली. पश्चिम बंगाल संघाने सलामीच्या सामन्यात चंदीगडचा ४९-७, त्यानंतर छत्तीसगडचा ६६-० असा लिलया पराभव केला. अनेकदा राष्ट्रीय विजेतेपद मिळविणाऱ्या हरयाणानेही यंदाच्या स्पर्धेत सुरुवात चांगली केली. त्यांनी आधी उत्तर प्रदेशला २९-०, नंतर मध्य प्रदेशला ४७-० असे सहज नमविले. महाराष्ट्राने स्पर्धेच्या पहिल्या दिवशी मोठ्या विजयाची नोंद करीत अंदमान-निकोबार संघावर ९२-० अशी मोठ्या फरकाने मात दिली. ओडिशा, बिहार आणि राजस्थान संघांनीही विजयी शुभारंभ केला. गट एकमध्ये दिल्ली आणि कर्नाटक यांचाच सहभाग असून आधी दिल्लीने पहिला सामना १०-० असा जिंकला नंतर मात्र कर्नाटकने रिव्हर्स सामन्यात २१-१४ असा विजय खेचून आणला. अन्य सामन्यांमध्ये छत्तीसगडने चंदीगडला ७-५ असे तर उत्तराखंडने पंजाबला १०-५ असे पराभूत केले. ■

# पहिल्या डावातील पिछाडी सोलापूरला नडली, ‘आर्यन्स’कडून पराभव

**१६ वर्षांखालील क्रिकेट: ययाती देवकतेची झुंजार अर्धशतके व्यर्थ**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ एप्रिल-**

महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनच्या १६ वर्षांखालील मुलांच्या दोन दिवसीय क्रिकेट सामन्यात सोलापूर संघाला पहिल्या डावातील नामुष्कीजनक पिछाडीमुळे आर्यन्स संघाकडून पराभवाचा सामना करावा लागला.

आर्यन्स संघाने पहिल्या डावात उभारलेला धावांचा डोंगर आणि त्यानंतर घेतलेली २१४ धावांची मोठी आघाडी सोलापूरच्या पराभवास निर्णायक ठरली.

नक्ष गोमारेचे १७७ धावांचे वादळ प्रथम फलंदाजी करताना आर्यन्स संघाने ७ बाद ३८१ धावांवर आपला पहिला डाव घोषित केला.



या डावाचे मुख्य आकर्षण ठरला तो म्हणजे नक्ष गोमारे, ज्याने सोलापूरच्या गोलंदाजांचा समाचार घेत १७७ धावांची खेळी केली. सोलापूरकडून गोलंदाजी करताना आदित्य डी. माने याने ६० धावांच्या मोबदल्यात ४ बळी टिपून आर्यान्सला रोखण्याचा प्रयत्न केला, मात्र इतर गोलंदाजांकडून अपेक्षित साथ मिळाली नाही.

सोलापूरची घसरगुंडी आणि ययातीची झुंज प्रत्युत्तरादाखल मैदानात उतरलेल्या सोलापूरचा पहिला डाव आधान प्रसादच्या भेदक गोलंदाजीसमोर (४ बळी) अवघ्या १६७ धावांत कोसळला. या डावात सोलापूरचा फलंदाज ययाती देवकते याने ११३ चेंडूंत १३ चौकारांसह ६१ धावांची एकाकी झुंज दिली. पहिल्या डावातील या खराब कामगिरीमुळे सोलापूरवर 'फॉलो-ऑन'ची वेळ आली. दुसऱ्या डावात फलंदाजीला आलेल्या सोलापूरने खेळ संपेपर्यंत १ बाद १३८ धावा करून आपली कामगिरी सुधारली. यात पुन्हा एकदा ययाती देवकातेने ८९ चेंडूत १२ चौकार आणि १ षटकार खेचत नाबाद ७१ धावांची स्फोटक खेळी केली. मात्र, पहिल्या डावातील २१४ धावांची मोठी तफावत भरून काढणे सोलापूरला शक्य झाले नाही. परिणामी, पहिल्या डावातील आघाडीच्या जोरावर आर्यन्स संघाने या सामन्यात विजयाची नोंद केली. ययातीची दोन्ही डावातील अर्धशतके आणि आदित्यचे ४ बळी सोलापूरसाठी वैयक्तिक यशाचे मुद्दे ठरले असले तरी, संघाला पराभवाचा सामना करावा लागला.

# मलेशिया ओपन कराटे स्पर्धेत आर्या यादवला कास्यंपदक

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ एप्रिल -**

कौलालंपूर येथे नुकत्याच झालेल्या पंधराव्या सायलेंट नाईट मलेशिया ओपन इंटरनॅशनल कराटे चँपियनशीप मधे आर्या साईनाथ यादव हिने ज्युनिअर मुलींच्या गटात कुमिते प्रकारात कास्य पदक जिंकले.

शिवस्मारक येथील रुद्र अकादमी ऑफ मार्शल आर्ट्स व योग संस्थेची कराटे ॲथलिट आणि संगमेश्वर महाविद्यालयाची विद्यार्थिनी असलेल्या आर्या यादव हिला वर्ल्ड टॉप हंड्रेड रँकर व एशियन मेडलिस्ट भुवनेश्वरी तसेच




वर्ल्ड रेफ्री मिहिर सुरेश जाधव यांचेकडून प्रशिक्षण मिळाले असून नॅशनल कराटे टीम हेड कोच कीर्तन कोंडू तसेच रेन्शी संगीता सुरेश जाधव यांचे मार्गदर्शन लाभले आहे. आर्या सध्या हैद्राबाद येथे माय डोजो या राष्ट्रीय स्पोर्ट्स कराटे सेंटरमधे अक्षिता अभिजित कुलकर्णी सह वर्ल्ड यूथ लिगसाठी सराव करीत आहे.

# वाफळे येथे २७ एप्रिलला जिल्हा किशोर-किशोरी खो-खो स्पर्धा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ एप्रिल-**

महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५व्या जयंतीचे औचित्य साधून भीमशक्ती तरुण मंडळ, वाफळे (ता. मोहोळ) यांच्या वतीने जिल्हा किशोर-किशोरी खो-खो स्पर्धांचे आयोजन सोमवार, दिनांक २७ एप्रिल रोजी करण्यात आले आहे.

सोलापूर म्युचर खो-खो असोसिएशनच्या मान्यतेने या स्पर्धा १४ वर्षांखालील वयोगटासाठी असून, सहभागी खेळाडूचा जन्म १ जानेवारी २०१२ किंवा त्यानंतरचा असणे अनिवार्य आहे. स्पर्धेतील विजेत्या किशोर व किशोरी दोन्ही गटांसाठी ११हजार १३५ रुपये आणि द्वितीय क्रमांकासाठी ६ हजार १३५ रुपये व आकर्षक ट्रॉफी असे पारितोषिकाचे स्वरूप आहे. याशिवाय, प्रत्येक सामन्यातील उत्कृष्ट खेळाडूस ५०१ रुपये रोख आणि प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात येणार आहे.



खेळाडूंचे मूल्यांकन २१५ निश्चित करण्यात आले आहे.

स्पर्धेत सहभागी होऊ इच्छिणाऱ्या जिल्ह्यातील संघांनी २५ एप्रिल २०२६ पर्यंत आपली नोंदणी सागर जवंजाळ (९२०९३२४२६३) किंवा श्रीरंग बनसोडे (९६९९१७५७९८) यांच्याकडे करावी. स्पर्धेच्या दिवशी सर्व खेळाडूंच्या भोजनाची स्वतंत्र व्यवस्था आयोजकांमार्फत करण्यात आली आहे. सोलापूर जिल्ह्यातील जास्तीत जास्त संघांनी सहभाग नोंदवावा, असे आवाहन सोलापूर खो-खो असोसिएशनचे अध्यक्ष महेश गादेकर व सचिव उमाकांत गायकवाड यांनी केले आहे.



# साऊथ सोलापूर आपटे ग्रुपची विजयी सलामी

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर चषक क्रिकेट स्पर्धेचे दिमाखदार उद्घाटन**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ एप्रिल -**

भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीचे औचित्य साधून, साऊथ सोलापूर आपटे ग्रुप क्रिकेट क्लबच्या वतीने १२ वर्षांखालील मुलांच्या जिल्हास्तरीय क्रिकेट स्पर्धेस सुरुवात झाली.

दयानंद कॉलेजच्या मैदानावर सुरु झालेल्या उद्घाटनाच्या सामन्यात यजमान साऊथ सोलापूर आपटे ग्रुप क्रिकेट क्लबने युनायटेड क्रिकेट क्लबवर १३६ धावांनी दणदणीत विजय मिळवत स्पर्धेत विजयी श्रीगणेशा केला. या स्पर्धेत सोलापूर जिल्ह्यातील ८ संघानी भाग घेतला आहे. साखळी पद्धतीने हे सामने खेळवले जाणार आहेत.

साऊथ सोलापूर आपटे ग्रुपने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. निर्धारित ४५ षटकांत त्यांनी ६ बाद २६३ धावांचा डोंगर उभा केला. यामध्ये नील याने ६७ धावांची तडाखेबंद खेळी केली, तर तन्मय वाघमोडे याने ५८ धावांचे मोलाचे योगदान दिले. युनायटेड क्लबकडून सम्राट बोबडे याने ३८ धावांत २ बळी घेतले. २६४ धावांच्या आव्हानाचा पाठलाग करताना युनायटेड क्रिकेट क्लबचा डाव साऊथ सोलापूरच्या भेदक गोलंदाजीसमोर गडगडला. संपूर्ण संघ २८.१ षटकांत अवघ्या १२७ धावांवर तंबूत परतला. युनायटेडकडून सम्राट बोबडे याने सर्वाधिक ३३ धावा केल्या. साऊथ सोलापूरच्या समर्थ देशेट्टी याने अवघ्या २६ धावांत ५ बळी टिपत प्रतिस्पर्धी संघाचे कंबरडे मोडले.

**निवड चाचणीसाठी स्पर्धा महत्त्वाची: विक्रांत पवार**

स्पर्धेचे उद्घाटन सोलापूर जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे निवड समिती सदस्य विक्रांत पवार यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी प्रशांत बाबर, प्रवीण देशेट्टी, प्रशांत गायकवाड, सुरज जमादार आदी मान्यवर उपस्थित होते. विक्रांत पवार म्हणाले की, पुढील दोन महिन्यांत सोलापूर जिल्ह्याचा १४ वर्षांखालील संघ निवडला जाणार आहे. या स्पर्धेतील खेळाडूंची कामगिरी निवड चाचणीसाठी ग्राह्य धरली जाणार असल्याने, प्रत्येकाने उत्कृष्ट वैयक्तिक कामगिरीवर लक्ष केंद्रित करावे.

# सोलापूरच्या कणसे व वाल्मिकीची दक्षिण विभागाकडून चमकदार कामगिरी

**कणसेचे शतक तर वाल्मिकीचे सात बळी**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ एप्रिल-**

महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनच्या १६ वर्षांखालील मुलांच्या दोन दिवसीय क्रिकेट सामन्यात दक्षिण विभागाकडून खेळताना सोलापूरच्या दोन उदयोन्मुख खेळाडूंनी आपल्या अष्टपैलू खेळाने क्रिकेटच्या मैदानावर सोलापूरचा डंका वाजवला.

मेट्रो संघाविरुद्ध झालेल्या अटीतटीच्या सामन्यात पृथ्वीराज कणसे याने ठोकलेले शानदार शतक आणि



**पृथ्वीराज कणसे**



**अनुज वाल्मिकी**

गोलंदाज अनुज वाल्मिकी याने घेतलेले ७ बळी यांच्या जोरावर दक्षिण विभागाने वर्चस्व प्रस्थापित केले. मैदानावर उतरल्यापासूनच कणसे याने मेट्रो संघाच्या गोलंदाजांचा समाचार घेण्यास सुरुवात केली. संयम आणि आक्रमकता यांचा सुरेख संगम साधत त्याने मैदानावर चौफेर फटकेबाजी केली. आपल्या खेळीत त्याने अनेक प्रेक्षणीय फटके मारत आपले शतक पूर्ण केले. त्याच्या या शतकी खेळीमुळे दक्षिण विभागाला मोठी धावसंख्या उभारता आली. कणसेच्या फलंदाजीनंतर गोलंदाजीमध्ये अनुज वाल्मिकीने आपली जादू दाखवली. आपल्या धारदार आणि अचूक टप्प्यावरील गोलंदाजीने त्याने मेट्रो संघाच्या फलंदाजांना अक्षरशः जेरीस आणले. अनुजने एकामागून एक तब्बल ७ गडी बाद करत प्रतिस्पर्धी संघाचे कंबरडे मोडले. त्याच्या या भेदक स्पेलमुळे मेट्रो संघाचा डाव स्वस्तात आटोपला.

# शहर कराटे निवड चाचणी २८ एप्रिलला सोलापुरात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ एप्रिल-**

कराटे असोसिएशन ऑफ महाराष्ट्र - काम यांचे वतीने कराटे इंडिया ऑर्गनायझेशन - किओ यांच्यातर्फे जून मधे डेहराडून येथे होणाऱ्या सब ज्युनिअर, कॅडेट व ज्युनिअर नॅशनल्स साठी महाराष्ट्र स्टेट सिलेक्शन्स ८ ते १० मे दरम्यान नाशिक येथे होणार आहेत. तत्पूर्वी २८ एप्रिल मंगळवार रोजी शिवस्मारक येथे ट्रेडिशनल व स्पोर्ट्स कराटे असोसिएशन द्वारे कॅडेट व ज्युनिअर गटाची शहर निवड चाचणी होईल. इच्छुकांनी नोंदणी साठी मिहिर सुरेश जाधव यांचेशी ९१६८३८५३३३ या क्रमांकावर अथवा शिवस्मारक, जनता बँकेजवळ, नवी पेठ येथे २५ एप्रिल पर्यंत राष्ट्रीय संस्था किओ चे स्टाईल/ क्लब सदस्यत्व प्रमाणपत्र, राज्य संघटना - 'काम' च्या सदस्यत्वाची पावती व सहभागींची वजन गट निहाय आधार कार्ड सहित यादी घेऊन सायंकाळी ७ ते ८ दरम्यान संपर्क करावा.

## महत्वाचे...

### नई जिंदगीत पेट्रोल ओतून पेटवून दिलेल्या पत्नीचा अखेर मृत्यू

**सोलापूर, दि. २१ एप्रिल-**



सासर्‍याच्या घरात घुसून अंगावर पेट्रोल ओतून पेटवून दिलेल्या पत्नीचा उपचारादरम्यान येथील शासकीय रुग्णालयात आज मंगळवारी दीड वाजता मृत्यू झाला. नर्गिस फैजान शेख (वय ३२ वर्ष रा. लोकमान्य नगर नई जिंदगी, सोलापूर) असे मयत विवाहितेचे नाव आहे. तिच्या पतीने तिला १५ एप्रिल रोजी रात्रीच्या सुमारास हुंड्याच्या कारणावरून अंगावर पेट्रोल ओतून पेटवून दिले होते. सासरी छळ केला जात असल्यामुळे नर्गीसही कांही दिवसापूर्वी लोकमान्य नगर येथे माहेरी राहण्यात आली होती. बुधवार दि.१५ एप्रिल रोजी रात्री १० वाजेच्या सुमारास तिचा पती फैजान जावेद शेख (रा.होटगी रोड मगदूम हॉल जवळ) हा नर्गिसला भेटण्यासाठी सासरी गेला होता.आणि तिच्या आई आणि बहिणीला मला नर्गिस सोबत बोलायचे आहे असे म्हणून त्यांना बाहेर पाठवले. आणि आतून दरवाजा बंद करून सोबत आणलेल्या बाटलीत पेट्रोल अंगावर ओतून पत्नी नर्गिसला लायटरने आग लावली होती. त्यानंतर तो पळून गेला होता. भाजलेल्या गंभीर अवस्थेत नर्गिस हिला येथील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. दवाखान्यात नर्गिसने दिलेल्या फिर्यादीवरून पती फैजान शेख, (सासरे) जावेद शेख, (सासू) शमशाद शेख, (दीर) फुरकान शेख (सर्व रा. मगदूम हॉल, मुलतानी बेकरी जवळ होटगी रोड, सोलापूर) यांच्यासह ८ जणांविरुद्ध गुन्हा दाखल करून मुख्य आरोपी फैजान याला अटक करण्यात आली होती. दरम्यान ५० टक्क्यावर भाजलेल्या नर्गिसचा उपचारादरम्यान आज मंगळवारी दुपारी मृत्यू झाला .



### घरगुती गॅस पुरवठ्यात अनियमिततेचा आरोप; युवक काँग्रेसचे तहसीलदारांना निवेदन

**जेऊर दि. २१ एप्रिल-**

केंद्र सरकारने घरगुती गॅस पंचेचाळीस दिवसात बुकिंग केलेल्या गॅस धारकास देण्यात येईल असे सांगितले आहे. या विलंबामुळे सामान्य नागरिकांना त्याचा खुप त्रास होतो लोकांना चूल पेटवून जेवण बनवावे लागते आहे. यामुळे काही घरात उपासमारीची वेळ आली आहे. अशातच करमाळा शहरातील गॅस वितरण कर्मचारी व एजन्सी खासगी हॉटेल व्यावसायिक काळ्या बाजारात चढ्या दराने १५०० रुपये किमतीने विक्री करत असल्याचा आरोप करमाळा युवक काँग्रेसने केला आहे. करमाळा तहसीलदार यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, मनमानी गॅस वितरकांचा परवाना रद्द करावा अन्यथा येत्या दहा दिवसात युवक काँग्रेसच्या वतीने करमाळा तहसील कार्यालयासमोर तीव्र आंदोलन करून उपोषण करण्याचा इशारा दिला आहे. यावेळी साहेबराव वाघमारे, प्रहार संघटना तालुकाध्यक्ष संदीप तळेकर युवक काँग्रेसचे शहराध्यक्ष सुजय जगताप, शहर अध्यक्ष शुभम ढाणे, सामाजिक न्याय अध्यक्ष. चंद्रकांत साळवे, शिवाजी शिंदे, जय कांबळे, दादासाहेब आरणे, याकुब बागवान, युवराज भोसले, कार्यकर्ते पदाधिकाऱ्यांनी निवेदनावर सह्या केल्या. निवेदन पुरवठा अधिकारी शत्रुघ्न चव्हाण यांनी स्विकारले.

### घरात घुसून २८ वर्षीय विवाहितेस मारहाण

**सोलापूर, दि.२१ एप्रिल-**

तु माझ्यासोबत रहा असे म्हणून एका तरुणाने घरात घुसून एका विवाहितेस मारहाण केल्याची घटना खासबाग (ता.अक्कलकोट) येथे सोमवारी सायंकाळच्या सुमारास घडली. सदर विवाहिता घरात असताना नितीन जाधव नावाचा इसम घरात घुसून तिला तु माझ्यासोबत रहा, असे म्हणत लाथाबुक्याने मारहाण केली. यात मुका मारू लागल्याने सदर महिलेला अक्कलकोट येथे प्राथमिक उपचार करून येथील शासकीय रुग्णालयात पतीने दाखल केले.

# बार्शीत शिव-बसव जयंतीत पारंपारिक वाद्यांच्या गजर

### अघोरी पथकाच्या कलाविष्काराने वेधले लक्ष

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २१ एप्रिल-**

बार्शी येथे महात्मा बसवेश्वर महाराज व छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त मध्यवर्ती शिव-बसव जयंती उत्सव समितीच्यावतीने भव्य मिरवणुकीचे आयोजन करण्यात आले. सोमवारी सायंकाळी सतरावा पुट्टा गणेश मंदिर येथे माजी आमदार राजेंद्र राऊत व बार्शी शिक्षण प्रसारक मंडळाच्या खजिनदार वर्षा ठोंबरे यांच्या हस्ते आरती करुन कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. त्यानंतर महात्मा बसवेश्वर यांच्या पुतळ्याला तसेच छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करुन मिरवणुकीला प्रारंभ झाला.

यावेळी जिल्हा परिषद अध्यक्ष दीपक वैद्य, नगराध्यक्ष तेजस्विनी कथले,







बाजार समितीचे सभापती विजय गरड, पंचायत समितीच्या सभापती मीनाक्षी रोंगे, शिवसेना नेते भाऊसाहेब आंधळकर, ॲड प्रशांत शेटे, नागेश नान्नजकर, महेश यादव, संतोष जाधवर, गणेश नान्नजकर, अमोल वायचळ, रावसाहेब घोंगडे, अमोल हिंगमिरे, राम डोंबे आदी उपस्थित होते. शिव-बसव जयंती मध्यवर्ती उत्सव मंडळाच्यावतीने आयोजित या मिरवणुकीत रणगंधर्व झांज-ढोल पथक, लेझीम पथकांनी उत्साहपूर्ण सादरीकरण केले. लेझीम पथकात मुलींचाही सहभाग होता. मिरवणुकीचे विशेष आकर्षण म्हणजे कांतारा व केरळमधील प्रसिद्ध पारंपरिक नृत्यप्रकार, अघोरी नृत्य होते. हा कलाविष्कार पाहण्यासाठी नागरिकांनी गर्दी केली होती. ढोल-ताशांच्या गजरात आणि जल्लोषपूर्ण वातावरणात सादर झालेल्या या नृत्यप्रकारांनी नागरिकांचे लक्ष वेधून घेतले. शहरातील विविध भागातून मार्गक्रमण करत ही मिरवणूक उत्साहात पार पडली. मिरवणुकीत छत्रपती शिवाजी महाराज आणि महात्मा बसवेश्वर यांच्या पुतळ्यांची आकर्षक सजावट करण्यात आली होती.

## बार्शीत वीटभट्टी व्यावसायिकावर जीवघेणा हल्ला; खंडणी न दिल्याचा राग

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २१ एप्रिल-**

बार्शी शहरात खंडणी न दिल्याच्या कारणावरून एका विटभट्टी व्यावसायिकावर जीवघेणा हल्ला झाल्याची घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी चार जणांविरुद्ध बार्शी शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सचिनकुमार मिरगणे (वय ३९, रा. सुभाषनगर, बार्शी) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून, ते ताडसौंदाणे रोड परिसरात विटभट्टी व्यवसाय करतात. त्यांच्या कुटुंबाची उपजीविका या व्यवसायावरच अवलंबून आहे. गेल्या काही महिन्यांपासून ते बाहेरगावी असल्याने विटभट्टीकडे त्यांचे कमी लक्ष होते. दि. १७ एप्रिल रोजी रात्री मुलगी आजारी असल्याची माहिती मिळाल्याने ते बार्शी येथे घरी परतले. त्यानंतर रात्री सुमारे ११-४५ वाजता ते विटभट्टीवर गेले. दि. १८ एप्रिल रोजी मध्यरात्री १२-१५ वाजण्याच्या सुमारास तेथे बसले असताना, त्यांच्या ओळखीचे चारजण ऑटोरिक्षाने तेथे आले. आरोपींनी दरमहा १० हजार रुपयांची खंडणी मागितली. तसेच, हप्ता न दिल्यास जिवंत सोडणार नाही, अशी धमकी दिली. यावर मिरगणे यांनी ठाम नकार दिल्यानंतर आरोपींनी संतापून लोखंडी कोयता व गजाने त्यांच्यावर हल्ला केला.

या हल्लयात त्यांच्या डोक्यावर गंभीर मार लागला असून डाव्या हाताला फ्रॅक्चर झाले आहे. तसेच पाठीवरही गंभीर दुखापत झाली आहे. जखमी अवस्थेत त्यांना तात्काळ बार्शी येथील जगदाळे मामा हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.

दरम्यान, मिरगणे यांच्या ओरडण्याचा आवाज ऐकून विटभट्टीवरील कामगार मदतीसाठी धावून आले. त्यामुळे आरोपींनी घटनास्थळावरून पळ काढला. या प्रकरणी विशाल रणदिवे, विक्रम पारडे, बाबा खंडागळे (सर्व रा. टिळक चौक, बार्शी) रोहित देवकर (रा. मंगळवार पेठ, स्मशानभूमीजवळ, बार्शी) यांच्याविरुद्ध खंडणी, जीवघेणा हल्ला व धमकी दिल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेचा पोलिसांकडून पुढील तपास सुरू आहे.

## आगळगावांत हॉटेलमध्ये मोठी चोरी

### भिंत फोडून चोरट्यांचा प्रवेश

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २१ एप्रिल-**

बार्शी तालुक्यातील आगळगाव येथे एका बिअर बार व परमिट रुमची भिंत फोडून अज्ञात चोरट्यांनी मोठी चोरी केल्याची घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणात सुमारे २ लाख ३९ हजार रुपयांच्या मुद्देमालावर चोरट्यांनी हात साफ केला आहे.



योगेश अनिल डमरे (वय ४५, रा. आगळगाव, ता. बार्शी) यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, आगळगाव ते बेलगाव रोडलगत असलेल्या त्यांच्या हॉटेल योगेश बिअर बार परमिट रुम व बिअर शॉपीमध्ये ही घटना घडली. सदर व्यवसाय त्यांच्या आई सुनिता अनिल डमरे यांच्या नावावर असून ते स्वतः हा व्यवसाय चालवितात.

दि. १९ एप्रिल रोजी रात्री ११ वाजण्याच्या सुमारास हॉटेल नियमितप्रमाणे बंद करुन ते घरी गेले होते. त्यानंतर दि. २० एप्रिल रोजी सकाळी ९-१५ वाजता हॉटेल उघडले असता, आतमध्ये सर्व सामान अस्ताव्यस्त पडलेले दिसून आले. तसेच किचनची भिंत फोडलेली आणि गोडाऊनचा दरवाजा उघडा असल्याचे निदर्शनास आले.

पुढील पाहणीत गोडाऊनमधील विदेशी दारु, बिअर व वाईनचा मोठा साठा गायब असल्याचे आढळले. तसेच काउंटरमधील रोख रक्कम आणि सीसीटीव्हीचा डीव्हीआर रेकॉर्डिंग मशीनही चोरीस गेले असल्याचे समोर आले.

चोरीस गेलेल्या मुद्देमालामध्ये विविध कंपन्यांच्या व्हिस्कीचे बॉक्स, वोडका, वाईन, बिअर तसेच सुमारे ३५ हजार ५३० रुपये रोख रक्कम आणि सुमारे २० हजार रुपये किंमतीचे डीव्हीआर मशीन असा एकूण २,३९,१३० रुपयांचा ऐवज आहे. चोरट्यांनी हॉटेलच्या किचनची भिंत फोडून आत प्रवेश करुन ही चोरी केल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त केला जात आहे. विशेष म्हणजे, हॉटेलमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे असतानाही चोरट्यांनी डीव्हीआर मशीनच चोरुन नेल्यामुळे तपासात अडचणी निर्माण होण्याची शक्यता आहे. या प्रकरणी अज्ञात चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून, पोलिसांकडून पुढील तपास सुरु आहे.

## बार्शीत मध्यरात्री संशयितास अटक

### चोरीच्या तयारीत दबा धरून बसलेला इसम जेरबंद

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि. २१ एप्रिल -**

बार्शी शहरातील तेलगिरणी चौक परिसरात चोरीच्या उद्देशाने अंधारात दबा धरून बसलेल्या एका संशयित इसमाला बार्शी शहर पोलिसांनी मध्यरात्रीच्या सुमारास अटक केली. मंगळवार दि. २१ एप्रिल रोजी ही कारवाई करण्यात आली.

मिळालेल्या माहितीनुसार, बार्शी शहर पोलीस ठाण्याच्या गुन्हे प्रकटीकरण शाखेचे कर्मचारी पो.कॉ. अजीज मनसुब शेख, पो.ना. मुळे व पो.कॉ. पांढरे हे शहरात नियमित पेट्रोलिंग करत होते. दरम्यान, मध्यरात्री १२-३५ वाजण्याच्या सुमारास पथक तेलगिरणी चौक परिसरात आले असता, मिरगणे कॉम्प्लेक्सजवळ अंधारात एक व्यक्ती संशयास्पदरीत्या चेहरा लपवून बसलेली आढळून आली. संशय अधिक बळावल्याने पोलिसांनी तत्काळ कारवाई करत त्या इसमाला ताब्यात घेतले. सुरुवातीला त्याने आपली ओळख सांगण्यास टाळाटाळ केली, मात्र पोलिसांनी विश्वासात घेऊन चौकशी केली असता त्याने आपले नाव विकास नारायण भाकरे (वय ३०, रा. उंबरविरा, ता. पाटोदा, जि. बीड) असे असल्याचे सांगितले. प्राथमिक चौकशीत सदर इसम चोरी करण्याच्या उद्देशाने त्या ठिकाणी दबा धरून बसल्याचे निष्पन्न झाले. याप्रकरणी पोलीस कॉन्स्टेबल अजीज शेख यांच्या फिर्यादीवरून आरोपी विकास भाकरे याच्याविरुद्ध महाराष्ट्र पोलीस अधिनियम, १९५१ चे कलम १२२ (सी) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## जादा दराने खतविक्री केल्या प्रकरणी गुन्हा दाखल

### कारवाईमुळे खत दुकानदारांमध्ये उडाली खळबळ

**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा दि. २१ एप्रिल-**

हुन्नूर येथील गोवर्धन कृषी सेवा केंद्रात शेतकऱ्याना ज्यादा दराने खत विक्री केल्या प्रकरणी कृषी केंद्र चालक गोवर्धन एकनाथ होळकर यांच्या विरुध्द मंगळवेढा पोलीसात गुन्हा दाखल झाला आहे. दरम्यान या कारवाई मुळे शेतकर्यांना योग्यरित्या न्याय मिळाल्याच्या भावना व्यक्त होत आहेत.



फिर्यादी हरिदास भिमराव बोंगे (वय ३२ रा.कुरुल) हे मंगळवेढ्यातील कृषी अधिकारी कार्यालयात गुणनियंत्रण तथा खतनिरीक्षक या पदावर १९ जून २०२५ पासून कार्यरत आहेत. खत उत्पादन स्थळ तपासणी करणे,केंद्र तपासणी करणे,अभिलेख तपासणी करणे,खताचे नमुने घेणे,विश्लेषणासाठी ते प्रयोग शाळेत पाठविणे आदी कामे असून दि.१४ जानेवारी रोजी फिर्यादीने हुन्नूर येथील गोवर्धन सेवा केंद्रास भेट देवून तपासणी केली असता त्यामध्ये साठा रजिस्टर पाहणी केली. त्यावेळी फिर्यादीस ई पॉस वरील व प्रत्यक्ष साठा जुळत नव्हता. तसेच साठा पुस्तक अद्यावत नव्हते, या रासायनिक खताची ज्यादा दराने विक्री केल्याबाबतची बिले तपासणी मध्ये आढळून आली आहेत. दुकान तपासणीत दुकानदाराने अधिकार्याला तपासणीत असहकार्य केल्याचाही मुद्दा पुढे आला होता. त्या अनुषंगाने हे प्रकरण सुनावणीसाठी सोलापूर जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी यांच्याकडे सुनावणीसाठी ठेवले होते. दि.६ मार्च २०२६ रोजी त्याची सुनावणी ठेवली होती. सदर खत दुकानदार तथा आरोपी सुनावणीसाठी अनुपस्थित राहिले.तद्नंतरही आरोपीला दुसरी संधी दि.१५ एप्रिल २०२६ रोजी सुनावणी ठेवून देण्यात आली होती. त्यावेळी आरोपी अनुपस्थित राहिल्याने अखेर जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी यांच्या आदेशाने संबंधीत खत दुकानदारावर जिवनाश्यक वस्तू अधिनियम १९५५ कलम ३ (२) सी व कलम ७ (१) (ए) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याचा अधिक तपास पोलीस करीत आहेत. दरम्यान मंगळवेढा शहरात व ग्रामीण भागात शेतकर्यांना खत विक्री करताना लिकींगची सक्ती केली जात असल्याच्या तक्रारी आहेत. काही दुकानदार शेतकर्यांना खताच्या पावत्या न देता मोघम किंमती लावून पैसे घेण्याचा प्रकारही घडत असून कृषी अधिकार्याने यावर जातीने लक्ष ठेवून वारंवार तपासण्या करुन अशा वाढत्या वाईट प्रवृत्तीला आळा घालावा अशी मागणी जोर धरत आहे.

शहरात व ग्रामीण भागात खत बि बीयाणे दुकानदाराकडे दुकानात ग्राहकांच्या माहितीसाठी दर पत्रक लावणे बंधनकारक असताना कुठल्याही दुकानात दरपत्रक लावले जात नसल्याचे शेतकर्यांच्या निदर्शनास येत असून यावरही कारवाई होणे तितकेच गरजेचे आहे.

## निधन वृत्त...

### भागुबाई सोलनकर



**सोलापूर, दि. २१ एप्रिल-**

तिल्हेहाळ येथील श्रीमती भागुबाई गोविंद सोलनकर (वय ८५) यांचे दि. २१ एप्रिल रोजी वृद्धापकाळाने निधन झाले आहे. त्यांच्या पश्चात चार मुले, तीन मुली, नातवंडे असा परिवार आहे. त्यांची अंत्यविधी आज (बुधवार ) सकाळी ९ वाजता यांच्या शेतात होणार आहे. पुळी महाविद्यालय येथील प्राध्यापक कुमार सोलनकर यांच्या त्या मातोश्री होत.

### चंद्रकांत मासुळे



**टेंभुर्णी, दि. २१ एप्रिल -**

टेंभुर्णी येथील ज्येष्ठ नागरिक चंद्रकांत गणपत मासुळे (वय ७५) यांचे शनिवार, दिनांक १८ एप्रिल २०२६ रोजी सायंकाळी ७.३० वाजता सोलापूर येथील सीएनएस हॉस्पिटलमध्ये अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले. ते टेंभुर्णी येथील पत्रकार श्रीकांत मासुळे यांचे वडील होते. त्यांच्या निधनाने टेंभूर्णी परिसरात हळहळ व्यक्त करण्यात येत आहे. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, दोन मुली, सुन आणि नातवंडे असा मोठा परिवार आहे

### दीपक सलवदे



**सोलापूर, दि. २१ एप्रिल-**

दीपक बलभीम सलवदे (वय ६० रा. बक्षीहिप्परगे ता. दक्षिण सोलापूर) यांचे मंगळवार, दि. २१ एप्रिल रोजी दुपारी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, दोन मुली, सून, नातवंडे असा परिवार आहे. ते सेवानिवृत्त शिक्षक होते. त्यांची अंत्ययात्रा बुधवार २२ एप्रिल रोजी सकाळी १० वाजता बक्षीहिप्परगे येथील त्यांच्या राहत्या घरापासून निघणार आहे.

## टेंभुर्णीत जातीवाचक शिवीगाळ करत तरुणासह तिघांना लाकडी दांडक्याने मारहाण

### दोघांविरुद्ध गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा,**
**टेंभुर्णी, दि. २१ एप्रिल -**

इंदिरानगर परिसरात जुन्या भांडणाचा राग मनात धरून एका १९ वर्षीय तरुणासह त्याच्या नातेवाईकांना जातीवाचक शिवीगाळ करत लाकडी दांडक्याने मारहाण केल्याची धक्कादायक घटना रविवारी दुपारी टेंभुर्णीत घडली. या प्रकरणी आदित्य आप्पा जगताप (वय १९, व्यवसाय गॅरेज काम, रा. इंदिरानगर, टेंभुर्णी) यांनी टेंभुर्णी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली असून प्रज्वल अनिल माने आणि योगेश तुकाराम धोत्रे या दोघांविरुद्ध गुन्हा नोंद करण्यात आला आहे. या घटनेत आदित्य जगताप, प्रथमेश यशवंत जगताप आणि मंडाबाई महादेव जगताप हे तिघे जखमी झाले आहेत.



पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार, रविवारी दुपारी सुमारे १२ वाजण्याच्या सुमारास फिर्यादी आदित्य जगताप हे आरोपी प्रज्वल माने यांच्या घराजवळून जात असताना त्यांना जातीवाचक शब्दांत शिवीगाळ करण्यात आली. त्यानंतर प्रज्वल माने याने हातातील लाकडी दांडक्याने त्यांना मारहाण केल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. या घटनेनंतर दुपारी १ वाजण्याच्या सुमारास बेंबळे रोडवरील समाधान स्क्रॅप सेंटरसमोर पुन्हा दोन्ही आरोपी आले आणि त्यांनी प्रथमेश जगताप यांच्यावर हल्ला चढवला.

यावेळी आरोपींनी प्रथमेश जगताप यांना जातीवाचक अपमानास्पद शब्द वापरत लाकडी दांडक्याने डोक्यात, पाठीवर व हातावर मारहाण केली. मध्ये पडलेल्या मंडाबाई जगताप यांनाही धक्काबुक्की करून मारहाण करण्यात आली. तसेच आमच्या नादी लागलात तर सोडणार नाही, अशी धमकी देण्यात आल्याचेही फिर्यादीत म्हटले आहे. या घटनेमुळे परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. या प्रकरणी टेंभुर्णी पोलीस ठाण्यात गु.र.नं. २७६/२०२६ नुसार भारतीय न्याय संहिता कलम ११८(१), १३१, ३५१(२), ३५२, ३(५) तसेच अनुसूचित जाती व जमाती (अत्याचार प्रतिबंध) अधिनियम १९८९ मधील कलम ३(१)(r), ३(१)(s) आणि ३(२)(va) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. करमाळा उपविभागीय पोलीस अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस हवालदार एन. जे. काशीद हे करीत आहेत.

### तू आमच्या गल्लीतला दिसत नाही असे म्हणत मारहाण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२१ एप्रिल-**



तू आमच्या गल्लीतला दिसत नाही. असे म्हणून रात्रीच्या अंधारात दगड आणि लाथाबुक्क्याने केलेल्या मारहाणीत चौघे तरुण जखमी झाले. ही घटना जुना कारंबा नाका परिसरातील घाण पाण्याच्या ओढ्याजवळ सोमवारी रात्री १० वाजण्याच्या सुमारास घडली. अजिंक्य शशिकांत जानराव (वय १९), रोहित श्रावण माने (वय २७), फयाज अजिज मुलानी (वय १९) आणि वैभव सुनील शेंडगे (वय १६ सर्व रा. सम्राट चौक सोलापूर) अशी जखमींची नावे आहेत. ते चौघेजण सोमवारी रात्री दहा वाजेच्या सुमारास कारंबा नाका परिसरातून निघाले होते. त्यावेळी अनोळखी ५ ते ६ जणांनी मिळून त्यांना मारहाण केली. त्यात जखमी झाल्याने त्यांना उपचारासाठी येथील शासकीय रुग्णालयात आज मंगळवारी पहाटे दाखल करण्यात आले.



## महात्मा बसवेश्वरांच्या मिरवणुकीस प्रारंभ

### खासदार ज्योती वाघमारे यांच्या हस्ते करण्यात आले पूजन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ एप्रिल-**

बाराव्या शतकातील क्रांतिकारी समाजसुधारक, वचनकार जगतज्योती महात्मा बसवेश्वर महाराज यांच्या जयंतीचा सोहळा मंगळवारी सोलापूर शहरात अत्यंत उत्साह आणि भक्तिभावाच्या वातावरणात साजरा झाला. जगतज्योती महात्मा बसवेश्वर महाराज जन्मोत्सव मध्यवर्ती मंडळाच्या वतीने आयोजित भव्य पालखी मिरवणुकीने शहरातील प्रमुख मार्ग जणू भक्तिरसात न्हाऊन निघाले.

छत्रपती शिवाजी महाराज पुतळा चौकातून महात्मा बसवेश्वर महाराज यांची प्रतिमा पालखीत विराजमान करून मिरवणुकीचा शुभारंभ करण्यात आला. राज्यसभेच्या खासदार प्राध्यापक ज्योती वाघमारे तसेच शहर उत्तरचे विद्यमान आमदार विजयकुमार देशमुख यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज चौकातील अश्वारूढ पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून तसेच पालखीतील महात्मा बसवेश्वरांच्या मूर्तीची विधिवत पूजा संपन्न झाली आणि त्यानंतर पारंपरिक वाद्यांच्या जल्लोषात मिरवणुकीने मार्गक्रमण सुरू केले. बाळवेस, टिळक चौक, मधला मारुती मार्ग या प्रमुख रस्त्यांवरून जात ही दिमाखदार पालखी मिरवणूक कोणतम चौकातील महात्मा बसवेश्वर महाराज यांच्या अश्वारूढ पुतळ्यापाशी येऊन विसर्जित झाली. ढोल-ताशांच्या गजरात, पारंपरिक वाद्यांच्या निनादात आणि भक्तांच्या जयघोषात संपूर्ण मार्ग दुमदुमून गेला. या ऐतिहासिक मिरवणुकीत आमदार विजयकुमार देशमुख, मध्यवर्ती महामंडळाचे विश्वस्त अध्यक्ष प्रवीण दर्गोपाटील, उत्सव अध्यक्ष प्रसाद झुंजे यांनी सहभाग नोंदवला. त्यांच्यासमवेत पालिकेचे विरोधी पक्षनेते अमोल शिंदे, चेतन नरोटे, नगरसेवक डॉ. किरण देशमुख, चंद्रकांत वानकर, सुधीर थोबडे, राजशेखर हिरेहब्बु, नगरसेवक शिवानंद पाटील, नगरसेविका ऐश्वर्या गणेश साखरे, सिद्धेश थोबडेसह मान्यवरांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला.

# पंढरपूर विकास आराखड्याच्या कामास गती देण्याचे मुख्यमंत्र्यांचे निर्देश

## वारकरी भाविकांना अडचणी येऊ नयेत याची दक्षता घ्यावी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ एप्रिल-**

आषाढी वारी काळात निघणाऱ्या श्री संत ज्ञानेश्वर महाराज पालखी मार्ग व श्री संत तुकाराम महाराज पालखी सोहळ्यातील वारकऱ्यांना चांगल्या सुविधा मिळण्यासाठी दोन्ही पालखी मार्गावरील पालखीतळे अधिक चांगली व सुविधायुक्त करण्यात यावीत, वारकरी भाविकांना अडचणी येऊ नयेत याची दक्षता घ्यावी, पंढरपुरात येणाऱ्या भाविकांना व स्थानिक नागरिकांना पायाभूत सुविधा मिळाव्यात यासाठी पंढरपूर विकास आराखड्याच्या कामास गती द्यावी, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

पालखी मार्गांवरील विश्रामस्थळ सुविधा निर्मिती संदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली सह्याद्री अतिथीगृहात बैठक झाली. यावेळी ग्राम विकास मंत्री जयकुमार गोरे, मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांची उपस्थिती होती. पुणे विभागीय आयुक्त डॉ.पुलकुंडवार यांनी सादरीकरणाद्वारे श्री संत ज्ञानेश्वर महाराज पालखी मार्ग, श्री संत तुकाराम महाराज





पालखी मार्गातील विकास कामांची माहिती दिली. श्री संत ज्ञानेश्वर महाराज पालखी मार्ग व श्री संत तुकाराम महाराज पालखी मार्गातील विविध विकास कामांसाठी सुमारे १३०३ कोटी रुपयांचा आराखडा तयार करण्यात आला होता. त्यापैकी ९६४ कोटी रुपये मंजूर झाले असून, त्यातील ९५९ कोटी रुपये खर्च झाले आहेत.

या आराखड्यांतर्गत दोन्ही पालखी मार्गातील पालखीतळांच्या ठिकाणी स्वच्छतागृहांसाठी सेफ्टी टँक, कमानीचे बांधकाम करणे, जमीन सपाटीकरण करणे, हायमास्ट पोल उभारणे, संरक्षक भिंतीचे बांधकाम करणे, रस्त्यांची दुरुस्ती, पालखी कट्टा तयार करणे आदी कामांपैकी बहुतांश कामे पूर्ण झाली असल्याचे यावेळी सांगण्यात आले. पालखी मार्गावरील विकास कामे पूर्ण करण्यात येत असून, यावर्षी वारकऱ्यांना कोणत्याही अडचणी येणार नाहीत, याची दक्षता घेतली आहे.

गेल्या वर्षी दोन्ही पालखी मार्गावर ३७०० मोबाईल शौचालये पुरविण्यात आली होती. यंदा ५ हजार मोबाईल शौचालये पुरविण्याचे नियोजन आहे. राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या वतीने दोन्ही पालखी मार्गावरील महामार्गाची कामे जवळपास पूर्ण होत आली आहेत. दिवेघाट ते हडपसर आणि बारामती ते इंदापूर मार्गांची कामे सुरू आहेत, अशी माहिती देण्यात आली.

यावेळी नगरविकास विभागाचे अपर मुख्य सचिव डॉ.के.एच. गोविंदराज, पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाचे प्रधान सचिव पराग जैन, सार्वजनिक आरोग्य विभागाचे सचिव ई.रवींद्रन, सोलापूरचे जिल्हाधिकारी कार्तिकेयन एस., मुख्यमंत्री कार्यालयाचे प्रधान सचिव श्रीकर परदेशी, उपमुख्यमंत्री महोदय यांचे सचिव राजेश देशमुख, राष्ट्रीय महामार्ग विभागाचे प्रकल्प संचालक संजय कदम आदी उपस्थित होते.

### पालखी तळावर यंदा अतिरिक्त हँगरची व्यवस्था

मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले की, यंदा २५ जुलै रोजी आषाढी एकादशी आहे. श्री संत ज्ञानेश्वर महाराज पालखीचे प्रस्थान ८ जुलै रोजी तर श्री संत तुकाराम महाराज पालखीचे प्रस्थान ७ जुलै रोजी होणार आहे. दोन्ही पालखी मार्गावर वारकरी भाविकांना कोणत्याही अडचणी येऊ नयेत याची दक्षता घ्यावी. पालखी सोहळ्याच्या विश्वस्तांशी चर्चा करून त्यांना आणखी कोणत्या सुविधा हव्यात त्या करून द्याव्यात. पालखी तळावर कायमस्वरुपी पायाभूत सुविधांची कामे करावीत. पालखी तळावर वारकऱ्यांसाठी गेल्या वर्षी हँगरची व्यवस्था करण्यात आली होती, त्या प्रमाणे यंदाही अतिरिक्त हँगरची व्यवस्था करावी. पालखी मार्गावरील महामार्गांची अपूर्ण कामे तातडीने पूर्ण करावीत.

# शिवसेना 'उबाठा'च्या संपर्कप्रमुख सुषमा अंधारेंनी केला औपचारिक दौरा

## माजी जिल्हाप्रमुख प्रा. अजय दासरी यांनी केला शाब्दिक हल्ला

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२१ एप्रिल-**

शिवसेना 'उबाठा'च्या संपर्क प्रमुख सुषमा अंधारे यांनी नुकताच केलेला दौरा हा औपचारिक स्वरुपाचा होता. या दौऱ्याप्रसंगी त्यांनी निष्ठावंत शिवसैनिकांकडून मते अजमावून न घेता पक्षविरोधी कारवाया केलेल्यांची पदाधिकारी म्हणून नियुक्त्या केल्या आहेत, असा शाब्दिक हल्ला माजी जिल्हाप्रमुख प्रा.डॉ.अजय दासरी यांनी माध्यमांशी बोलताना केला.

गेल्या काही महिन्यांपासून सोलापूर जिल्ह्यात सुरू असलेल्या पक्षांतर्गत हालचालींमुळे तळागाळातील कार्यकर्त्यांमध्ये संभ्रम आणि अस्वस्थता निर्माण झाला आहे. दि.२१ जानेवारी २०२६ रोजी सुषमा अंधारे यांनी केलेल्या पदाधिकारी नियुक्तीबाबत विरोधाभासी माहिती समोर आल्याने शिवसैनिकांमध्ये संभ्रम निर्माण झाले आहे. दि.२५ जानेवारी २०२६ रोजी सोलापुरात झालेल्या बैठकीत महापालिका



निवडणुकीतील पराभवाची कारणे मांडण्यात आली होती.

विशेष म्हणजे, पक्षविरोधी काम करणाऱ्यांवर कारवाई करण्याचे सुषमा अंधारे यांनी आश्वासन दिले होते. मात्र, अद्याप कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही. २४ फेब्रुवारी २०२६ रोजी आयोजित दौऱ्यात ११ विधानसभा व ११ तालुक्यांचा आढावा एका दिवसात घेण्यात आला. या बैठका शहरापुरताच मर्यादित राहिल्या.

पदनियुक्ती प्रक्रियेत मुलाखत पध्दतीचा अवलंब करण्यात आल्यावरही प्रश्न उपस्थित करण्यात आले. पुणे येथे झालेल्या या प्रक्रियेबाबत अनेक कार्यकर्त्यांना माहिती देण्यात आलेली नाही. शिवसेनेच्या पारंपरिक कार्यपद्धतीत अशा प्रकारची पध्दत नाही. १७ मार्च व ७ एप्रिल रोजी जाहीर करण्यात आलेल्या नियुक्त्यांमध्ये निष्ठावंत कार्यकर्त्यांना डावलून काही वादग्रस्त व्यक्तींना संधी देण्यात आली, असेही त्यांनी सांगितले.

यावेळी दादासाहेब पवार, देवा दिंडोरे, शिवाजी नीळ, रवी घंटे, शशिकांत बिराजदार, आनंदकुमार थोरात, नाना मोरे, पद्मा म्हंता, रवी म्हेत्रे, सुमित भांडेकर, अजय बादगुडे, सोमनाथ तोडकरी, अथर्व सुपाते, दत्ता रुचनभैरे, जगदीश कलकेरी, अमित भांडेकर, सुरेश शिंदे, इब्राहिम पिरजादे, युवराज बादगुडे पाटील, राजू क्षीरसागर, रमेश शिखरे, अशोक बोकेवाले, महानंदा बनसोडे उपस्थित होते.



सोलापूर : मंगळवारी सायंकाळी महात्मा बसवेश्वर जन्मोत्सवनिमित्त मंडळांनी उत्साही वातावरणात भव्य मिरवणूक काढली. त्याप्रसंगी जल्लोष करताना टिपलेले छायाचित्र.

# शहरात निघाली महात्मा बसवेश्वर जयंतीची भव्य मिरवणूक

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२१ एप्रिल-**

क्रांतिकारी समाजसुधारक, वचनकार जगद्ज्योती महात्मा बसवेश्वर जयंती सोहळा मंगळवारी सोलापूर शहरात अत्यंत उत्साह आणि भक्तिभावाच्या वातावरणात साजरा झाला. जगद्ज्योती महात्मा बसवेश्वर महाराज जन्मोत्सव मध्यवर्ती मंडळाच्या वतीने आयोजित भव्य पालखी मिरवणुकीने शहरातील प्रमुख मार्ग जणू भक्तिरसात न्हाऊन निघाले.

राज्यसभेच्या खासदार प्राध्यापक ज्योती वाघमारे, शहर उत्तरचे विद्यमान आमदार विजयकुमार देशमुख यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज चौकातील अश्वारूढ पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून तसेच पालखीतील महात्मा बसवेश्वरांच्या मूर्तीची विधिवत पूजा संपन्न झाली आणि त्यानंतर पारंपरिक वाद्यांच्या जल्लोषात मिरवणुकीने मार्गक्रमण सुरू केले. बाळीवेस, टिळक चौक, मधला मारुती मार्ग या प्रमुख मार्गावरुन ही दिमाखदार पालखी मिरवणूक कोंतम चौकातील महात्मा बसवेश्वर महाराज यांच्या अश्वारूढ पुतळ्यापाशी येऊन विसर्जित झाली. ढोल-ताशांच्या गजरात, पारंपरिक वाद्यांच्या निनादात आणि भक्तांच्या जयघोषात संपूर्ण मार्ग दुमदुमून गेला.

या मिरवणुकीत प्रवीण दर्गोपाटील, प्रसाद झुंजे, अमोल शिंदे, चेतन नरोटे, डॉ.किरण देशमुख, चंद्रकांत वानकर, सुधीर थोबडे, राजशेखर हिरेहब्बु, शिवानंद पाटील, ऐश्वर्या साखरे, सिद्धेश थोबडे यांच्यासह बसवेश्वर भक्त मोठ्या संख्येने सामील झाले होते. या मिरवणुकीच्या निमित्ताने समता, बंधुता आणि कायकवे कैलास या तत्त्वांचा वारसा जोपासण्याचा प्रयत्न केला गेला.



# नवविवाहितेचा छळ; तिघांविरुध्द गुन्हा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२१ एप्रिल-**

माहेरुन बर्गमॅन दुचाकी, मोबाईल, सोन्याची लॉकेट यांसह ५ लाख रुपये आण म्हणून नवविवाहितेचा छळ केल्याप्रकरणी पतीसह तिघा जणांविरुध्द एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

पती समीर शेख, सासू रिजसाना शेख, सासरे चांदसाब शेख (सर्वजण रा.शांती नगर, मजरेवाडी, सोलापूर) अशी गुन्हा दाखल करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत. याबाबत जीनत समीर शेख (रा.गणेश नगर, बाळे, सोलापूर) यांनी फिर्याद दिली आहे. यातील फिर्यादी २६ जानेवारी ते २३ मार्च २०२६ दरम्यान सासरी नांदत असताना वरील आरोपींनी मिळुन फिर्यादीस लग्नात मानपान केला नाही, सोने हुंडा दिला नाही असे घालुन पाडुन बोलून अपमान करुन फिर्यादीच्या चारित्र्यावर संशय घेतले, असेही फिर्यादीत नमूद आहे.

# 'भाजपा'कडून ७४ जिल्हा प्रभारींची नियुक्ती

## ● सोलापूरसाठी टिळेकर-पडळकर-जगताप ● राम सातपुते अहिल्यानगरचे प्रभारी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२१ एप्रिल-**

आगामी लोकसभा निवडणुका २०२९ डोळ्यासमोर ठेवत भारतीय जनता पार्टीने राज्यभर मोठी संघटनात्मक फेररचना करत तब्बल ७४ 'जिल्हा प्रभारी' नियुक्त केल्याची घोषणा केली आहे. सोलापूर शहरासाठी योगेश टिळेकर, सोलापूर पूर्वसाठी आमदार गोपीचंद पडळकर आणि माढा (सोलापूर पश्चिम) साठी संजय जगताप यांची निवड करण्यात आली आहे. माळशिरसचे माजी आमदार राम सातपुते यांच्यावर अहिल्यानगर जिल्हा प्रभारी पदाची जबाबदारी सोपवण्यात आली आहे.

प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या स्वाक्षरीने प्रसिद्ध करण्यात आलेल्या पत्रकानुसार, कोकण, पश्चिम महाराष्ट्र, उत्तर महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भ या सर्व विभागांमध्ये ही नियुक्ती करण्यात आली आहे. जिल्हा पातळीवर पक्षाचा विस्तार, कार्यकर्त्यांशी समन्वय आणि निवडणूकपूर्व तयारी मजबूत करणे हे या प्रभाऱ्यांचे प्रमुख उद्दिष्ट असणार आहे. भाजपने एवढ्या मोठ्या प्रमाणावर जिल्हा प्रभारी नेमल्यामुळे आगामी निवडणुकांसाठी पक्षाने संघटनात्मक पातळीवर जोरदार मोर्चेबांधणी सुरू केल्याचे स्पष्ट झाले आहे.

विभाग व जिल्हानिहाय नियुक्त्या पुढीलप्रमाणे याप्रमाणे; कोकण व मुंबई : सिंधुदुर्ग - योगेश सागर । रत्नागिरी उत्तर - प्रशांत ठाकूर । रत्नागिरी दक्षिण - निरंजन डावखे । रायगड उत्तर - अतुल काळसेकर । रायगड दक्षिण - नितेश राणे । ठाणे शहर - विक्रांत पाटील । ठाणे ग्रामीण - केशव उपाध्ये । भिवंडी - ॲड. माधवी नाईक । मीरा-भाईंदर - संतोष जनाटे । वसई-विरार - हेमंत सावर । नवी मुंबई - शशिकांत कांबळे । कल्याण - जयप्रकाश ठाकूर । उल्हासनगर - नाना सूर्यवंशी.

उत्तर महाराष्ट्र : पालघर - राणी दिवेदी । नंदुरबार - बबनराव चौधरी । धुळे शहर - भारती पवार । धुळे ग्रामीण - रविंद्र अनासपूरे । मालेगाव - इद्रिस मुलतानी । नाशिक शहर - मंगेश चव्हाण । नाशिक उत्तर - अमोल जावळे । नाशिक दक्षिण - सुजय विखे पाटील । जळगाव शहर - रोहिणी नायडू । जळगाव पूर्व (रावेर) - अनुप अग्रवाल । जळगाव पश्चिम - प्रदीप पेशकार । अहिल्यानगर उत्तर - लक्ष्मण सावजी । अहिल्यानगर दक्षिण - राम सातपुते । अहिल्यानगर शहर - भैरवी वाघ.

मराठवाडा : बीड - सुनिल राणे । लातूर शहर - भागवत कराड । लातूर ग्रामीण - मनोज पांगारकर । धाराशिव - अर्चना पाटील चाकूरकर । नांदेड शहर - संभाजी पाटील निलंगेकर । नांदेड उत्तर - किरण पाटील । नांदेड दक्षिण - रेखा कुलकर्णी । परभणी शहर - प्रवीण घुगे । परभणी ग्रामीण - संजय केनेकर । हिंगोली - संजय कौडगे । जालना महानगर - अजित गोपछडे । जालना ग्रामीण - रावराव वडकुते । छ. संभाजीनगर शहर - चैतन्याबापू देशमुख । छ. संभाजीनगर उत्तर - राहुल लोणीकर । छ. संभाजीनगर पश्चिम - प्रीतम मुंडे.

विदर्भ : बुलढाणा - जयंता ढेहनकर । खामगाव - निवेदिता चौधरी । अकोला शहर - नितीन भुतडा । अकोला ग्रामीण - प्रविण पोटे । वाशिम - रणधीर सावरकर । अमरावती शहर - संजय कुटे । अमरावती ग्रामीण (मोर्शी) - अविनाश देव । अमरावती ग्रामीण (मेळघाट) - विजयराज जाधव । यवतमाळ - सुमित वानखेडे । पुसद - दिनेश सूर्यवंशी । वर्धा - संजय भेंडे । नागपूर शहर - परिणय फुके । नागपूर ग्रामीण (रामटेक) - राजीव पोटदार । नागपूर ग्रामीण (काटोल) - सुधाकर कोहळे । भंडारा - रामदास तडस । गोंदिया - प्रवीण दटके । गडचिरोली - कीर्तिकुमार (बंटी) भांगडिया । चंद्रपूर शहर - अर्चना डेहनकर । चंद्रपूर ग्रामीण - चेनसुख संचेती

| पश्चिम महाराष्ट्र | |
|---|---|
| पुणे शहर | शेखर इनामदार |
| पुणे उत्तर (मावळ) | रणजितसिंह नाईक निंबाळकर |
| पुणे दक्षिण(बारामती) | सदाशिव खाडे |
| पिंपरी-चिंचवड | भरत पाटील |
| सातारा | राजेश पांडे |
| सोलापूर शहर | योगेश टिळेकर |
| सोलापूर पूर्व | गोपीचंद पडळकर |
| सोलापूर पश्चिम (माढा) | संजय जगताप |
| कोल्हापूर शहर | विक्रम पावसकर |
| कोल्हापूर पूर्व (हातकणंगले) | रामकृष्ण वेताळ |
| कोल्हापूर पश्चिम (करवीर) | पृथ्वीराज पाटील |
| सांगली शहर | धनंजय महाडिक |
| सांगली ग्रामीण | वर्षा डहाळे. |

# २०२६-२७ या आर्थिक वर्षाची 'पु.ना.गाडगीळ आणि सन्स समुहा'ने केली दमदार सुरुवात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ एप्रिल-**

पु.ना. गाडगीळ आणि सन्स समूहाच्या १९०+ वर्षांच्या परंपरेचा वारसा लाभलेल्या रेवा डायमंड या नैसर्गिक डायमंड ज्वेलरी ब्रँडने, यंदाच्या अक्षय्य तृतीयानिमित्त उत्कृष्ट विक्री कामगिरी नोंदवत आर्थिक वर्ष २०२६-२७ ची सुरुवात केली आहे.

रेवा डायमंड ने नुकत्याच झालेल्या गुढी पाडवा (२३ मार्च २०२६) दरम्यानही भक्कम धेध महसूल वाढ नोंदवली होती. त्यानंतर Q4 FY२६ (६ एप्रिल २०२६) मध्ये ९६.९% धेध महसूल वाढ साध्य करत कंपनीने सातत्यपूर्ण प्रगती कायम ठेवली. याच सकारात्मक गतीने नवीन आर्थिक वर्षाची सुरुवात होत असून, प्रमाणित नैसर्गिक डायमंड ज्वेलरीकडे ग्राहकांचा वाढता कल स्पष्ट दिसून येत आहे.

अक्षय्य तृतीये निमित्त कंपनीने FY २०२६-२७ मध्ये १२७.२७ दशलक्ष

P. N. GADGIL & SONS 1832 Gold | Silver | Diamonds

इतका महसूल नोंदवला, जो FY २०२५-२६ मधील याच दिवशीच्या ३४.६३ दशलक्ष महसुलाच्या तुलनेत तब्बल २.६७ पट (२६७.४९%) वाढ दर्शवतो.

पारंपरिकरित्या सोन्याच्या खरेदीसाठी ओळखल्या जाणाऱ्या या सणात डायमंड ज्वेलरीकडे वाढणारा ग्राहकांचा कल या यशातून अधोरेखित होतो. कंपनीच्या रिटेल विस्तार धोरणालाही याचा मोठा फायदा झाला आहे. नुकत्याच सुरू झालेल्या दोन एक्सक्लुझिव्ह ब्रँड आउटलेट्स - वाकड, पुणे (४ सप्टेंबर २०२५) आणि पौड रोड, पुणे (१५ मार्च २०२६) - यांनी आपली पहिली अक्षय्य तृतीया साजरी करत एकत्रित ६.८७ दशलक्ष महसूल नोंदवला, ज्यातून स्थानिक बाजारपेठेत ब्रँडला मिळणारा सकारात्मक प्रतिसाद दिसून येतो.

सध्या पु.ना.गाडगीळ आणि सन्स समूहाकडून सुरु करण्यात आलेल्या रेवा डायमंड्स या संस्थेने एकूण ३६ स्टोअर्सचे जाळे विस्तारले आहे, ज्यामध्ये २ एक्सक्लुझिव्ह ब्रँड आउटलेट्स आणि ३४ शॉप-इन-शॉप स्टोअर्सचा समावेश आहे, ज्यामुळे प्रमुख बाजारपेठांमध्ये ब्रँडची पोहोच अधिक मजबूत झाली आहे.

या कामगिरीबद्दल प्रतिक्रिया देताना, PNGS Reva Diamond Jewellery Limited चे CEO आणि Whole-Time Director अमित मोडक म्हणाले, यंदाच्या अक्षय्य तृतीयेच्या दिवशी मिळालेला उत्कृष्ट प्रतिसाद हा ग्राहकांच्या बदलत्या विचारसरणीचे द्योतक आहे. प्रमाणित नैसर्गिक हिऱ्यांचे दागिने हे केवळ आकर्षक खरेदी नसून दीर्घकालीन मूल्य असलेली गुंतवणूक म्हणूनही पाहिले जात आहेत. आमचा सातत्यपूर्ण वाढीचा प्रवास, वाढते रिटेल नेटवर्क आणि लक्ष केंद्रीत प्रॉडक्ट ऑफरिंग्ज यामुळे येत्या वर्षासाठी आम्ही सकारात्मक आहोत. ग्राहकांचा विश्वास आणि मूल्य अधिक बळकट करण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत.

FY २०२६-२७ च्या या दमदार सुरुवातीमुळे पु ना गाडगीळ आणि सन्सच्या विश्वसनीय परंपरेतून सादर करण्यात आलेल्या रेवा डायमंड्स चा रिटेल विस्तार, ग्राहकांशी अधिक सखोल नाते निर्माण करणे आणि प्रमाणित नैसर्गिक डायमंड ज्वेलरी या श्रेणीतील वाढीवर लक्ष केंद्रित करण्याचा निर्धार अधिक दृढ झाला आहे.

# सोलापूर जिल्हा गणित अध्यापक मंडळाचे शुक्रवारी अधिवेशन

**तभा वृतसेवा,**
**सोलापूर, दि.२१ एप्रिल-**

महाराष्ट्र गणित अध्यापक महामंडळाशी संलग्न असलेल्या सोलापूर जिल्हा गणित अध्यापक मंडळाचे १५ वे वार्षिक अधिवेशन शुक्रवारी, २४ एप्रिल २०२६ रोजी मुरारजी पेठ सुशील रसिक सभागृहात आयोजित करण्यात आली आहे.

अधिवेशनाचे उद्घाटन सकाळी ११ वाजता आमदार दत्तात्रय सावंत यांच्या हस्ते होणार आहे. अध्यक्षस्थान प्राथमिक शिक्षणाधिकारी कादर शेख भूषवणार आहेत. यावेळी डॉ.सूर्यप्रकाश कोठे, उपशिक्षणाधिकारी विठ्ठल ढेपे, प्रकाश नांगरे यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. प्रकाश नागनाथ कामाळे हे 'गणितीय अध्यापनात जिओजेब्राचा वापर' या विषयावर मार्गदर्शन करतील. डॉ.दिपक मधुकर शेटे हे 'गणितीय प्रयोगशाळा' या विषयावर विचार मांडतील. दुपारच्या सत्रात आमदार देवेंद्र कोठे, आमदार जयंत आसगांवकर, शिक्षणाधिकारी सचिन जगताप यांच्या प्रमुख उपस्थितीत जीवन गौरव व गुणवंत शिक्षक पुरस्कार वितरण होणार आहे.





**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तरुण भारत कार्यालय, स्वेतसागर निवास, राजमाता जिजामाता महाविद्यालयजवळ, पत्रकार रोड, शिवनगर, जि. लातूर - ४१३५१२. कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. दूरध्वनी : ८८८८८४७२३९ ● मुख्य समुह संपादक : **दिलीप यशवंत पेठे.** ● मुख्य संपादक : **प्रशांत वसंतराव माने** (पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे) दैनिक सोलापूर तरुण भारत. **RNI No. MAHMAR/2023/86477. E-mail starunbharatgmail.com.** ● **Websate:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही.

**Owned by, SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LTD. Printed by, Published by** DILIP SHIVMURTI DULANGE **Printed at** SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LT. 19,20 INDUSTRIAL ESTATE, HOTGI ROAD, SOLAPUR, Dist. SOLAPUR, 413003. **Publised at** TARUN BHARAT OFFICE, SwetSagar Niwas, Near Rajmata Jijamata College, Patrakar Road, Shivnagar, Dist. Latur Pin 413512, **RNI No. MAHMAR/2023/86477**
● **CHIEF GROUP EDITOR :** DILIP YASHWANT PETHE ● **CHIEF EDITOR :** PRASHANT VASANTRAO MANE

CMYK

लातूर
# दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## –स्मार्ट कार्ड नसले तरी एसटी प्रवासाची सवलत पूर्वीप्रमाणेच सुरूलातूर विभाग नियंत्रकांचे अफवांवर विश्वास न ठेवण्याचे आवाहन

तभा वृत्तसेवा
लातूर, दि. २१ :राज्य परिवहन महामंडळाच्या एनसीएमसीस्मार्ट कार्ड प्रवास योजनेअंतर्गत ज्या पात्र लाभार्थ्यांनी अद्याप नोंदणी केलेली नाही,अशा सर्व प्रवाशांना सवलतीचा प्रवास पूर्वीप्रमाणेच सुरू राहणार असल्याचे स्पष्टीकरण लातूर विभागाचे विभाग नियंत्रक विलास राठोड यांनी दिले आहे.महामंडळामार्फत ६५ ते ७५ वर्षांपर्यंतचे ज्येष्ठ नागरिक,७५ वर्षांवरील अमृत ज्येष्ठ नागरिक,दिव्यांग आणि महिला प्रवाशांसह इतर विविध घटकांना सवलती दिल्या जातात आणि मोठ्या प्रमाणात प्रवासी या योजनांचा लाभ घेत आहेत. मात्र,स्मार्ट कार्ड उपलब्ध नसल्यास सवलत मिळणार नाही अशी चुकीची अफवा काही ठिकाणी पसरली आहे. या पार्श्वभूमीवर,ज्यांच्याकडे सध्या स्मार्ट कार्ड नाही अशा पात्र लाभार्थ्यांना नियमानुसार सवलतीचा लाभ दिला जात असून तो यापुढेही सुरूच राहील,असे विभागाने स्पष्ट केले आहे. स्मार्ट कार्ड नोंदणीची कार्यप्रणाली सध्या राबविली जात असून पात्र प्रवाशांनी अधिकृत संस्थेद्वारे लवकरात लवकर आपले कार्ड काढून घ्यावे आणि कोणत्याही अफवांवर विश्र्वास ठेवू नये,असे आवाहनही राठोड यांनी केले आहे.



## विविध वृत्त...

### विद्यार्थी सहायक मंडळाच्या अध्यक्षपदी डॉ. नागोराव कुंभार

तभा वृत्तसेवा
**लातूर, दि. २१ एप्रिल :** लातूर येथील विद्यार्थी सहाय्यक मंडळाचे अध्यक्ष डॉ. जनार्दन वाघमारे यांच्या निधनामुळे रिक्त झालेल्या अध्यक्षपदी ज्येष्ठ विचारवंत डॉ. नागोराव कुंभार यांची तर कार्याध्यक्षपदी ज्येष्ठ साहित्यिक प्रा. फ. ग. शहाजिंदे यांची बिनविरोध एकमताने निवड करण्यात आली. विद्यार्थी सहाय्यक मंडळाची शिवनगर येथील डॉ. नागोराव कुंभार यांच्या आई निवासस्थानी वार्षिक सर्वसाधारण सभा खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली. यावेळी विद्यार्थी सहाय्यक मंडळाची २०२६ ते २०३१ या पाच वर्षांसाठी कार्यकारिणी निवडण्यात आली. बात अध्यक्ष डॉ. नागोराव कुंभार, कार्याध्यक्ष प्रा.फ.म.शहाजिंदे, सचिव डॉ. नागनाथ मोटे, कोषाध्यक्ष प्रा. बी.एस. पळसकर, उपाध्यक्ष डॉ. कुसुमताई गोरे, विक्रम कदम, डॉ. मन्मथ भातांब्रे, पांडुरंग अडसुळे, प्रा. डॉ. सुनीता गिरवलकर, प्रा. सुधीर साळुंके, प्रा. ओमप्रकाश होळीकर, प्रा. सूचेता वाघमारे, ॲड. इरफान शेख यांची एकमताने निवड करण्यात आली.

### लग्नाचे आमिष दाखवून विद्यार्थिनीवर अत्याचार

तभा वृत्तसेवा
**लातूर, दि. २१ एप्रिल :** लग्नाचे आमिष दाखवून आरोपीने एका अल्पवयीन विद्यार्थिनीवर सलग एक वर्ष लॉजमध्ये नेऊन बलात्कार केल्याची घटना उघडकीस आली आहे.
आरोपी दीपक ज्ञानोबा जाधव (रा. राणी सावरगाव, ता. गंगाखेड, जि. परभणी) याने लातूर येथे शिक्षण घेणाऱ्या एका अल्पवयीन पीडित विद्यार्थिनीसोबत ओळख वाढविली. तिला लग्नाचे आमिष दाखवून तिच्यासोबत लातूरजवळील हॉलिडे इन लॉजवर नेऊन बलात्कार केला. नग्न फोटो नातेवाईकांना पाठवून देण्याची धमकी देत आरोपीने पीडितेसोबत दि.२० एप्रिल २०२५ ते २१ मार्च २०२६ या एक वर्षाच्या कालावधीत लॉजवर नेऊन बलात्कार केले. याप्रकरणी पीडितेच्या फिर्यादीवरून आरोपीविरूध्द एमआयडीसी पोलीस ठाण्यात पोक्सोचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### मातंग समाजाचात्या' कृतीला विरोधच

तभा वृत्तसेवा
**लातूर, दि. २१ एप्रिल :** आरक्षण उपवर्गीकरणाचा विरोध केलेल्या कॉंग्रेस नेते नाना पटोले यांच्या निषेधार्थ केलेल्या आंदोलनात काहींनी माजीमंत्री आ. अमित देशमुख यांच्या प्रतिमेला जोडे मारून त्यांचा अवमान केला. या कृतीला मातंग समाजाचा तीव्र विरोध आहे. काही कार्यकर्त्यांनी जाणीवपूर्वक आ. देशमुख यांची प्रतिमा मलिन करण्यासाठी केलेला हा स्टंट होता. या कृतीचा मातंग समाजाच्यावतीने सोमवारी अण्णाभाऊ साठे चौकात निषेध करण्यात आला. या आंदोलनात माजीमंत्री आ. अमित देशमुख यांचा कोणताही संबंध नसताना, काही कार्यकर्त्यांनी जाणीवपूर्वक चुकीचे आरोप करीत त्यांच्याविरोधात फोटो काढून घोषणाबाजी केली. ही कृती संपूर्ण मातंग समाजाची भूमिका नाही. एखाद्या लोकप्रतिनिधीची प्रतिमा मलिन करण्याच्या उद्देशाने करण्यात आलेले अत्यंत दुर्दैवी कृत्य आहे. या घटनेचा समाज बांधवांच्या वतीने निषेध करण्यात आला. अशा प्रकारच्या गैरजबाबदार कृतींना समाज कधीही पाठिंबा देणार नाही, असे स्पष्ट करण्यात आले. यावेळी समाजातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. नगरसेवक विकास कांबळे, डॉ. शिवाजी जवळेकर, सुनील बसपुरे, माजी नगरसेवक जी. ए. गायकवाड, दिनेश कांबळे, ॲड. अंगद सूर्यवंशी, अंगद वाघमारे, ॲड. अंगद गायकवाड, पिराजी साठे, दत्ताभाऊ भुरे, काशिनाथ वाघमारे, काका कांबळे, संजय गव्हाणे, राजू गायकवाड, लक्ष्मण गव्हाणे, राम जाधव उपस्थित होते.

### चर्मकार महासंघातर्फे डॉ. सुनीता वाघमारे यांचा सत्कार

तभा वृत्तसेवा
**लातूर, दि. २१ एप्रिल :** येथील राष्ट्रीय चर्मकार महासंघाच्या वतीने निलंगा पंचायत समितीच्या नूतन सभापती डॉ. सुनिता संतोष वाघमारे यांचा सत्कार राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे राष्ट्रीय उपाध्यक्ष – सी. के. मुरळीकर यांच्या हस्ते करण्यात आला.यावेळी बोलताना मुरळीकर म्हणाले, आपल्या पदाचा उपयोग करून सर्वसामान्यांच्या अडचणी दूर करण्याचे प्रयत्न करावेत आणि समाजाचा नावलौकिक वाढवावा. डॉ. सुनिता वाघमारे या आपल्या समाजातील पहिल्या महिला सभापती आहेत, याचा समाजाला सार्थ अभिमान आहे. यावेळी रवी कुरील व डॉ. वाघमारे यांनी मनोगत व्यक्त केले.

# माजी खासदार डॉ. गोपाळराव पाटील यांचे निधन

तभा वृत्तसेवा
**लातूर, दि. २१ एप्रिल :** येथील शिव छत्रपती शिक्षण संस्थेचे अध्यक्ष, माजी खासदार डॉ. गोपाळराव पाटील यांचे मंगळवारी सकाळी वृद्धापकाळाने निधन झाले. मृत्युसमयी त्यांचे वय ९५ वर्षे होते. डॉ. गोपाळराव पाटील एक अजातशत्रू व्यक्तिमत्वाचे धनी होते. त्यांच्या निधनाबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शोक व्यक्त करुन निःस्पृह सेवावृत्ती काळाच्या पडद्याआड गेल्याची भावना व्यक्त केली आहे. अनेक नेत्यांनी त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली आहे.डॉ. गोपाळराव पाटील हे सन १९८५ पासून आजतागायत लातूरच्या शिव छत्रपती शिक्षण संस्थेचे अध्यक्ष होते. चार दशकाहून अधिक काळ त्यांनी संस्थेची धुरा समर्थपणे सांभाळली. निस्पृह, प्रामाणिक, पारदर्शक कारभाराचा आदर्श त्यांनी घालून दिला. गुणवत्तेवर कर्मचारी भरती प्रक्रिया, प्रवेश प्रक्रिया राबविण्यासाठी त्यांनी



पाठबळ दिले. त्यांच्या अथक परिश्रमाने आणि दिशादर्शक मार्गदर्शनामुळे संस्थेने नावलौकिक मिळविला. ते प्रख्यात बालरोग तज्ज्ञ होते. त्याचबरोबर त्यांचा शिक्षण साहित्य, राजकारण, समाजकारण या विषयांमध्ये व्यासंग होता. शिक्षण, राजकारण, समाजकारण अशा विविध क्षेत्रात त्यांनी कार्य केले. लॉयन्स क्लबच्या माध्यमातूनहीत्यांनी उल्लेखनिय कार्य केले आहे. कॉंग्रेसचे दिवंगत ज्येष्ठ नेते शिवराज पाटील चाकूरकर यांना त्यांनी १९९८ च्या लोकसभा निवडणुकीत दिलेली कडवी लढत लातूरकर कधीच विसरू शकत नाहीत. या निवडणुकीत चाकूरकरांना३ लाख २२ हजार २६५ मते मिळाली होती तर त्यांचे प्रतिस्पर्धी असणाऱ्या डॉ. गोपाळराव पाटील यांना ३ लाख १८ हजार ९३८ मते मिळाली होती. त्या निवडणुकीत चाकूरकर केवळ ३ हजार ३२७ मतांनी विजयी झाले होते. निवडणुकीपुरतेराजकारणकरणाऱ्या नेत्यातडॉ. गोपाळराव पाटील यांचा क्रमांक अग्रभागी होता, हे वेगळे सांगण्याची आवश्यकता नाही.

**शाळा महाविद्यालयांना सुट्टी...**
डॉ. गोपाळराव पाटील यांच्या निधनाची वार्ता कळल्यानंतर शिव छत्रपती शिक्षण संस्थेच्या अंतर्गत येणाऱ्या राजर्षी शाहू महाविद्यालयासह सर्व शाळांना मंगळवार दि. २१ एप्रिल २०२६ रोजी सुट्टी जाहीर करण्यात आली. संस्थेचे सचिव बी.बी. ठोंबरे उपाध्यक्ष डॉ. अजय जाधव, सहसचिव डॉ शिवाजीराव सूर्यवंशी, उद्धवराव पाटील यांनी शोकभावना व्यक्त करून संस्थांतर्गत आठ ८ दिवसांचा दुःखवटा जाहीर केला. शैक्षणिक व इतर सर्व कार्यक्रम स्थगित करण्यात आहेत. डॉ. गोपाळराव पाटील यांच्या त्यांच्या पश्र्चात पत्नी शांताबाई, मुलगा, सच्चिदानंद पाटील, सून स्नेहल पाटील, कन्या स्नेहलता देशमुख, डॉ. गीतांजली पाटील, तारका शिंदे, जावई, नातवंडे असा मोठा परिवार आहे.माजीखासदार डॉ. गोपाळराव पाटील यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त करताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी निःस्पृह सेवावृत्ती काळाच्या पडद्याआड गेल्याची भावना व्यक्त केली. त्यांच्या निधनाने राज्याच्या वैद्यकीय सेवा, शिक्षण क्षेत्र व सामाजिक क्षेत्राची अपरिमित हानी झाल्याचे मुख्यमंत्र्यांनी बोलून दाखविले आहे; पालकमंत्री शिवेंद्रराजे भोसले यांनी आपल्या भावना व्यक्त करताना लातूरच्या शैक्षणिक क्रांतीचा महामेरू हरपल्याची बोलून दाखवले. सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी डॉ. गोपाळराव पाटील यांच्या निधनाने सामाजिक व शैक्षणिक हानी झाल्याची भवन व्यक्त केली. माजी मंत्री दिलीपराव देशमुख,आ. रमेशप्पाकराड, आ. अमित देशमुख, आ. संभाजी पाटील निलंगेकर , आ. संजय बनसोडे, आ. विक्रम काळे यांसह अनेक मान्यवरांनी त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली.

## प्राथमिक शाळांतील शिक्षकांचे समायोजन ३० एप्रिलला

तभा वृत्तसेवा
**लातूर, दि. २१ एप्रिल :** खाजगी आणि जिल्हा परिषद शाळांतील अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन ३० एप्रिलपर्यंत होईल, अशी माहिती जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शिक्षण विभागातून देण्यात आली.
अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन प्रथम तालुकास्तरावर व नंतर जिल्हास्तरावर अशा दोन टप्प्यांत होणार आहे. प्राथमिक शिक्षण विभाग प्रक्रिया पूर्ण करण्याची तयारी करीत असून, खाजगी शाळांतील सव्वादोनशे ते अडीचशे तर जिल्हा परिषद प्राथमिक शाळांतील सुमारे शंभरच्या आसपास अतिरिक्तांची संख्या आहे. माध्यमिक शिक्षण विभागाने गेल्या सात एप्रिल रोजीच अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन केले. आता प्राथमिक शिक्षण विभाग अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन करणार असून, त्याची प्रक्रिया सध्या सुरू आहे. येत्या ३० एप्रिल २०२६ पर्यंत खाजगी व जिल्हा परिषद प्राथमिक शाळांतील अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन होईल. सध्या शिक्षकांत अतिरिक्त शिक्षकांच्या समायोजनावरून बरीच चर्चा सुरू आहे. समायोजन करावे, अशी शिक्षकांची मागणी आहे.

# विहिरीत उडी घेऊन आईची २ चिमुकल्यांसह आत्महत्या

तभा वृत्तसेवा
**लातूर, दि. २१ एप्रिल :** औसा तालुक्यातील खरोसा येथे कौटुंबिक वादातून किरकोळ कारणावरून एका २२ वर्षीय विवाहितेने आपल्या २ चिमुकल्यांसह विहिरी उडी घेऊन आत्महत्या केल्याची हृदय घटना घडली.रविवारी रात्री मयत निकिता दीपक भुरे (२२, रा. खरोसा) हिने किरकोळ कौटुंबिक वादातून डोक्याला मनस्ताप करून टोकाचे पाऊल उचलले व आपले दोन चिमुकले १ मुलगा व १ मुलगी यांना सोबत घेऊन गावाजवळील विहिरीत उडी मारून आत्महत्या केली. कौटुंबिक वादातून विवाहितेने टोकाचे पाऊल उचलल्याने हळहळ व्यक्त केली जात आहे. फिर्यादी मनोज भरत भुरे यांनी दिलेल्या अर्जावरून किल्लारी पोलिस ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली. तिच्या २



चिमुकल्याची नावे शिवानी आणि शिवांश अशी आहेत. विवाहितेने चिमुकल्यांसह आत्महत्या केल्याने दोन्ही चिमुकल्या बहीण-भावाचा दुर्दैवी मृत्यू झाला. प्राथमिक माहितीनुसार कौटुंबिक वादातून हे टोकाचे पाऊल उचलण्यात आल्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. ही घटना खरोसा येथील घराच्या शेजारील विहिरीत घडली असल्याचे समोर आले. घटनेची माहिती मिळताच किल्लारी पोलिस घटनास्थळी दाखल झाले असून पंचनामा करण्याचे काम सुरू केले. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. विहिरीतून मृतांना बाहेर काढून लामजना येथील रुग्णालयात शवविच्छेदन करण्यात आले. अंन्त्यविधीसाठी नातेवाईकांना प्रेत देण्यात आले.

# न्या.बद्दर अहवालाचे प्रतिकात्मक सामुहिक दहन

तभा वृत्तसेवा
**लातूर, दि. २१ एप्रिल :** अनुसूचित जातींच्या आरक्षणातील उपवर्गीकरणाच्या विरोधात दि. २० एप्रिल रोजी सकाळी शहरातील महात्मा गांधी चौकात मोठ्या प्रमाणावर तीव्र आंदोलन करण्यात आले असून या आंदोलनाने जिल्ह्यातील सामाजिक व राजकीय वातावरण ढवळून निघाले आहे. यावेळी न्या.बद्दर अहवालाचे प्रतिकात्मक सामुहिक दहन करून शासनाच्या भूमिकेचा जाहीर निषेध नोंदविण्यात आला.या आंदोलनाच्या पार्श्र्वभूमीवर महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना जिल्हाधिकारीमार्फत सविस्तर निवेदन सादर करण्यात आले.या निवेदनात नमूद करण्यात आले की, न्या. बद्दर आयोगाचा अहवाल राज्यातील जनतेसमोर सादर न करता ऑनलाईन पद्धतीने हरकती मागविणे ही प्रक्रिया लोकशाही मूल्यांना धरून नसून पूर्णपणे बेकायदेशीर आहे. अहवालाचा संपूर्ण मजकूर,निष्कर्ष आणि शिफारसी सर्वसामान्य नागरिकांसाठी खुल्या केल्याशिवाय कोणतीही हरकत नोंदविणे शक्य नाही, त्यामुळे शासनाने प्रथम पारदर्शकता ठेवून अहवाल सार्वजनिक करावा, अशी ठाम भूमिका आंदोलनकर्त्यांनी मांडली. भिक्खू पथ्यानंद थेरो यांनी यावेळी मार्गदर्शन करताना सांगितले की, अनुसूचित जाती प्रवर्गातील कोणत्याही जाती समूहाचा अद्याप सर्वांगीण विकास झालेला नाही. शासनाने अनेक वर्षे आरक्षणाची पूर्ण अंमलबजावणी न करता केवळ धोरणात्मक घोषणा केल्या आहेत. राज्यात अनुसूचित जातींसाठी असलेले १३ टक्के आरक्षणही प्रत्यक्षात पूर्ण क्षमतेने लागू झालेले नाही. अशा परिस्थितीत उपवर्गीकरणाचा निर्णय घेणे हे वास्तवापासून दूर जाणारे असून समाजात फूट पाडणारे ठरू शकते. ते पुढे म्हणाले की, काही जाती समूहांना आरक्षणाचा अपेक्षित लाभमिळाला नसला तरी त्यासाठी त्या समाजघटकांना जबाबदार धरणे चुकीचे आहे. शिक्षणाचा अभाव, विशेषतः उच्च शिक्षणाच्या संधींची कमतरता, ही या समस्येची मुख्य कारणे आहेत. त्यामुळे शासनाने उपवर्गीकरणावर भर न देता शिक्षण, कौशल्यविकास आणि आर्थिक सक्षमीकरण यावर लक्ष केंद्रित करणे गरजेचे आहे. 'अ, ब, क, ड', असे उपवर्गीकरण केल्यानेही शिक्षण नसेल तर लाभ कोण घेणार? असा सवाल त्यांनी उपस्थित केला. आंदोलनादरम्यान समितीच्या वतीने शासनाकडे पुढील प्रमुख मागण्या करण्यात आल्या न्या. बदर आयोग व त्याचा अहवाल तात्काळ रद्द करावा, अनुसूचित जातींची जातीनिहाय जनगणना करावी, क्रिमीलेयरची अट पूर्णपणे रद्द करावी, अ, ब, क, ड उपवर्गीकरणाची प्रक्रिया तात्काळ थांबवावी, तसेच संविधानात कोणत्याही प्रकारची छेडछाड करू नये. याशिवाय, अहवाल प्रथम जनतेसमोर खुला करून त्यानंतरच हरकती मागविणे आवश्यक असल्याचेही स्पष्ट करण्यात आले. यावेळी आंदोलनकर्त्यांनी ठामपणे नमूद केले की, शासनाकडे उपवर्गीकरण करण्याचा कोणताही घटनात्मक अधिकार नसताना ही प्रक्रिया राबविणे असंवैधानिक आहे. या निर्णयामुळे अनुसूचित जाती प्रवर्गामध्ये मतभेद आणि तणाव निर्माण होत असून, यासाठी शासन जबाबदार राहील, असा इशाराही देण्यात आला. तसेच, अनुसूचित जाती प्रवर्गातील सुमारे ५८ जाती समूहांनी या उपवर्गीकरणाला तीव्र विरोध दर्शविल्याचे सांगण्यात आले. यावेळी मोठ्या संख्येने समाजबांधव, कार्यकर्ते, युवक व महिलांनी सहभाग नोंदवत घोषणाबाजी करत शासनाविरोधात रोष व्यक्त केला. दिसून आले. शेवटी आंदोलनकर्त्यांनी शासनाला कडक इशारा देत म्हटले की, जर त्यांच्या मागण्या तात्काळ मान्य करण्यात आल्या नाहीत, तर राज्यभर व्यापक आणि तीव्र आंदोलन छेडले जाईल. लातूरमधील या आंदोलनामुळे उपवर्गीकरणाचा मुद्दा पुन्हा एकदा ऐरणीवर आला असून, येत्या काळात या विषयावर सामाजिक आणि राजकीय पातळीवर मोठी चर्चा होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. यावेळी चंद्रकांत चिकटे, प्रा. अनंत लांडगे, मोहन माने, प्रा. कल्याण कांबळे, गोविंद कांबळे, संदीपान सूर्यवंशी, व्यंकट कीर्तने, सोपान डुमने, भारत गडेराव, त्र्यंबक कवठेकर, सुभाष चव्हाण, गौतम चिकाटे, सूर्यभान कांबळे, सविता चिकाटे, यांच्यासह मोठ्या संख्येने आंदोलकांची उपस्थिती होती.

# लातूर जिल्हा वकील मंडळाच्या संयुक्त विद्यमानान न्यायालय परिसरात पक्ष्यांना पिण्याच्या पाण्याची सोय

तभा वृत्तसेवा
**लातूर, दि. २१ एप्रिल :** प्रभुराज प्रतिष्ठाण व लातूर जिल्हा वकील मंडळच्या संयुक्त विद्यमाने पक्षांना पाणी पिण्याची सोय करण्यासाठी जिल्हा न्यायालय परीसरात प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश संजय भरूका यांच्याहस्ते झाडांना येळणी बांधून पक्षांना पाण्याची सोय करण्यात आली.



पाण्याचा अपव्यय टाळून पक्षांसाठी पाणी वाचून त्यांची तहान भागवावी, उन्हाळ्याच्या दिवसात चारा पाण्याविना पक्षाची भटकंती होत आहे. पाण्याच्या शोधात वणवण भटकत असल्याचे दिसून येत असल्याने त्यांची भटकंती कमी करण्यासाठी प्रभुराज प्रतिष्ठाणच्या वतीने वृक्षांना येळण्या बांधण्यात आल्या आहेत. लातूर जिल्हा जिल्हा न्यायालय येथे पक्षांसाठी येळनी बांधून पक्षांसाठी पाण्याची सोय करण्यात आली आहे.
प्रत्येक सुजाण नागरिकांनी आपल्या छतावर व अंगणात असलेल्या झाडाला पक्षांसाठी पिण्याच्या पाणीची सोय करावी, जेणे करून एक सामाजिक उपक्रम आपल्या साह्याने राबविला जाईल. उन्हाच्या तीव्रतेमुळे पशुपक्ष्यांचे हाल होत आहे आणि चारा पाण्याचा प्रश्र्न निर्माण होतो. तो अडचण दूर करण्यासाठी हा उपक्रम राबविला जात आहे.
यावेळी जिल्हा न्यायाधीश नं. १ आर. आर. भोसले, जिल्हा वकील मंडळाचे अध्यक्ष शिवकुमार जाधव, प्रभुराज प्रतिष्ठाणचे ॲड. अजय कलशेट्टी, विशेष जिल्हा सरकारी वकील संतोष देशपांडे, प्रबंधक बालाजी राऊत, ॲड. सुरेश सलगरे, ॲड. सतीश दिवान, वकील मंडळाचे उपाध्यक्ष लहू चामे, सचिव गुरुप्रसाद येरटे, ॲड. मीरा कुलकर्णी, ॲड. सविता मोतीपवळे, ॲड. शिरीष धहिवाल, ॲड. एस. के. जोशी, ॲड. संजय जगदाळे, ॲड. सादिक शेख, ॲड. मंगेश महिंद्रकर, ॲड. सुनंदा इंगळे, ॲड. अमोल पोतदार, ॲड. विजयकुमार खाणापुरे, ॲड. सतीश साळुंके, ॲड. दयानंद मिटकरी व इतर कर्मचारी वर्ग आदी उपस्थित होते.

## शक्तिपीठ महामार्ग रद्द करावा

तभा वृत्तसेवा
**लातूर, दि. २१ एप्रिल :** प्रस्तावित शक्तिपीठ महामार्ग रद्द करावा, शेतकऱ्यांना संपूर्ण कर्जमाफी द्यावी, ऊस उत्पादक शेतकऱ्यांची थकीत बिले तात्काळ अदा करावीत, सरसकट पीकविमा अदा करावा, जंगली प्राण्यांपासून पिकांचे रक्षण करण्यासाठी शेतकऱ्यांना अनुदान द्यावे, हमीभाव, सिंचन सुविधा, वीज प्रश्र्न तसेच शेतमालाला योग्य दर द्यावा, आदी विविध ठराव महाराष्ट्र राज्य किसान सभेच्या लातूर येथील अधिवेशनात मंजूर करण्यात आले. महाराष्ट्र राज्य किसान सभेचे लातूर जिल्हा अधिवेशन खरोळा येथे पार पडले. या अधिवेशनात शेतकऱ्यांच्या विविध प्रश्र्नांवर चर्चा करून तीव्र लढा उभारण्याचा निर्धार करण्यात आला. यावेळी किसान सभेचे अध्यक्ष उमेश देशमुख, उपाध्यक्ष उद्धव पौळ, सहसचिव अजय बुरांडे, सुधाकर शिंदे, संजय मोरे, प्रेमगीर गिरी, जीवनराव देशमुख, व्यंकटराव राऊतराव, बहादूर शेख आदी उपस्थित होते.
यशस्वीतेसाठी दत्ता राऊतराव, ज्ञानोबा वळींग्रे, सोपान बांडे, कोंडीराम कपाळे, प्रकाश देशमुख, सुधाकर जाधव, गोविंद कांबळे, राजकुमार लोहार, वलिसाब, डी.पी. कांबळे, सुरेश कातळे, विक्रम गिरी, ॲड. सुधीर देशमुख, बापू मांदळे, जालिंदर गिरी, विकास गिरी आदींनी सहकार्य केले.
राज्य शासनाने शेतकऱ्यांचे संपूर्ण कर्ज माफ करावे, वन्यप्राण्यांपासून होणारे पिकांचे नुकसान झाल्यावर अनुदान देण्यात यावे. कृषीमालाला हमीभाव जाहीर करावा, शेतीसाठी लागणाऱ्या विजेचा पुरवठा सुरळीतपणे करावा. शेतकऱ्यांना दिवसा वीज मिळावी, प्रस्तावीत शक्तिपीठ महामार्ग तातडीने रद्द करण्यात यावा, असा ठराव महाराष्ट्र राज्य किसान सभेच्या जिल्हास्तरीय अधिवेशनात मंजूर करण्यात आला.
यावेळी उमेश देशमुख, उद्धव पौळ, अजय बुरांडे, सुधाकर शिंदे यांनी भूमिका मांडली.

**जाहीर प्रगटन**

लातूर जिल्हा परिसरातील तमाम जनतेस या जाहिर प्रगटना द्वारे सुचीत करण्यात येते की, माझे पक्षकार हणमंत ज्ञानोबा चोथवे, रा. खुलगापुर, ता.जि. लातूर यांनी मला दिलेल्या माहिती व कागदपत्रावरून व वकिल म्हणून अधिकृत केले वरुन सर्व जनतेस खालील प्रमाणे जाहिर प्रगटन देत आहे. माझे पक्षकार यांना गजानन राजकुमार वेदपाठक, रा. मंठाळे नगर, लातूर यांनी खरेदीखत दस्त क्रं. लतर १ ९९९५, दि.१७/१०/२०२५ अन्वये खरेदी मालकीचा व कब्जेवहिवाटीचा मौजे. महाराणा प्रताप नगर, लातूर येथील जमीन सर्वे नंबर ७/३/२ पैकीचा याचा एन.ए झालेला एन.ए नंबर २०१२/जेएमबी/लातूर/सीआर १६२, दि.२२/०२/२०१३ ईसवी अन्वये मे. सब डिव्हीजनल ऑफिस, लातूर यांनी मंजूर केलेल्या पैकीचा प्लॉट याचा लेआऊट नंबर सिडको लातूर /सिडको/प्लॅनिंग/एलटीआर/२०१२/५६९, दि.२४/१२/२०१२ ईसवी अन्वये मे. सिडको ऑफिस, लातूर यांनी मंजूर केलेल्या पकीचा प्लॉट असून याची लांबी पूर्व पश्र्चिम १७.६५ मी. व रुंदी दक्षिण उत्तर ९ मी. असून याचे एकूण क्षेत्रफळ १५८.८५ चौ.मी. (१७०९.२२ चौ. फुट) आहे. याची चतुः सीमा खालील प्रमाणे :- पुर्वेसप्लॉटनंबर४६,पश्र्चिमेस१२मी.रुंदीचारस्ता,दक्षिणेसप्लॉटनंबर४०,उत्तरेसप्लॉटनंबर३८. येणे प्रमाणे वरील चतुःसीमेच्या आतील प्लॉट विद्यमान मालकाकडुन लेखी करार करुन घेऊण, इस्सारापोटी काही रक्कम माझे पक्षकाराकडुन स्विकारुन सदरची मिळकत ही निर्विवाद क निर्जोखीम असल्याची हमी माझे पक्षकारास दिली आहे. तरी सदर मिळकती बाबत जर कोणाचा उजर, आक्षेप, हितसंबंध, हक्कसंबंध, कर्जबोजा, गहाणखत, बक्षीसपत्र, कोर्ट डिग्री, मृत्युपत्र, तारण, लीज, शेजाऱ्याचा वाद, शासकिय अथवा निमशासकिय कर्ज, न्यायालयीन वाद असतील तर त्यांनी सदरचे प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून सात (०७) दिवसाच्या आत माझे खालील कार्यालयीन पत्यावर योग्य त्या कागदपत्रांसह लेखी उजर / आक्षेप नोंदवावा मुदतीत जर कोणाचा उजर/आक्षेप नाही आल्यास सदरची मिळकत ही निर्विवाद व निजॉख्रीम आहे असे गृहीत धरुन माझे पक्षकार सदर मिळकतीचे नोंदणीकृत खरेदीखत मूळ मालकाकडून आपल्या हक्कात करुन घेतील व त्यानंतर येणारे आक्षेप माहो पक्षकारावर बंधणकारक राहणार नाहीत याची सर्व जनतेने नोंद घ्यावी.दिनांक – २१/०४/२०२६

तर्फे
**ॲड. अशोक ज्ञा. लोखंडे**
नोटरी भारत सरकार.
शाह चौक, लातूर
मो नं.९४२१९ ८६४९५

जाहीर प्रगटन देणार
**हणमंत ज्ञानोबा चोथवे**
रा. खुलगापुर, ता.जि.लातूर
मो. नं.९७६४९७७४३८/८०८७८७०६०१

धाराशिव
# जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## उमरगा शहरातील दुकानातून १.९० लाखांची रोकड चोरी

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.२१ एप्रिल -**
येथील मलंग कॉम्प्लेक्स परिसरातील कपड्यांच्या दुकानातून १ लाख ९० हजार रुपयांची रोकड असलेली बॅग अज्ञात चोरट्याने लंपास केल्याची घटना घडली आहे. या प्रकरणी उमरगा पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

याबाबत फिर्यादी प्रविण दिनेश गेहलोत (वय २४, रा. नेहरू नगर, कुर्ला (पूर्व), मुंबई) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, दि.१७ एप्रिल रोजी दुपारी १.३० ते २.०० वाजण्याच्या सुमारास मलंग कॉम्प्लेक्स येथील त्यांच्या भावाच्या कपड्यांच्या दुकानात ही घटना घडली.

फिर्यादीचे भाऊ दुकानातील काउंटर टेबलखाली १ लाख ९० हजार रुपये असलेली काळ्या रंगाची बॅग ठेवून जेवणासाठी गेले असता, अज्ञात व्यक्ती ग्राहक असल्याचे भासवून दुकानात आली. संधी साधून संबंधिताने काउंटरखालील रोकड असलेली बॅग चोरून नेली.

या घटनेप्रकरणी फिर्यादीने दि.१९ एप्रिल रोजी दिलेल्या तक्रारीवरून उमरगा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस करीत आहेत.

## एनएच ६५ मृत्यूचा सापळा! जेकेकुर पुलावर भीषण भेगा

**आकाश पोतदार**
**उमरगा, दि.२१ एप्रिल -**
नॅशनल हायवे ६५ वरील जेकेकुर येथील पुलाची अवस्था अत्यंत धोकादायक बनली असून, प्रवाशांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. कोट्यवधी रुपये खर्चून उभारण्यात आलेल्या या पुलावर सध्या मोठमोठ्या भेगा पडलेल्या दिसून येत आहेत. काही ठिकाणी तर या भेगांमधून थेट खालील भाग स्पष्ट दिसत असल्याने वाहनचालकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

**निकृष्ट कामामुळे प्रवाशांच्या जीवाशी खेळ**

स्थानिक नागरिकांच्या मते, हा पूल आता सोयीचा मार्ग न राहता अक्षरशः मृत्यूचा सापळा ठरत आहे. विशेष म्हणजे, काही वर्षांपूर्वीच बांधण्यात आलेल्या या पुलाची एवढ्या कमी कालावधीत झालेली दुरवस्था कामाच्या गुणवत्तेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण करत आहे.

नागरिकांचे म्हणणे आहे की, दिवसेंदिवस पुलावरील भेगा वाढत असून, आगामी पावसाळ्यात परिस्थिती आणखी बिकट होण्याची शक्यता आहे. वेळेत दुरुस्ती न झाल्यास मोठ्या दुर्घटनेची भीती व्यक्त केली जात आहे.

दरम्यान, या मार्गावरून दररोज हजारो लहान-मोठी तसेच अवजड वाहने प्रवास करतात. सततच्या जड वाहतुकीमुळे पुलावर ताण वाढत असून, त्याची सुरक्षितता धोक्यात आली आहे. तरीही संबंधित प्रशासनाकडून दुर्लक्ष होत असल्याचा आरोप नागरिक करत आहेत. मोठा अपघात झाल्यानंतरच प्रशासन जागे होणार का? असा संतप्त सवाल स्थानिकांकडून उपस्थित केला जात आहे. यासोबतच संबंधित कंत्राटदार, अभियंते आणि जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई करून पुलाची उच्चस्तरीय चौकशी करावी, अशी जोरदार मागणी होत आहे. या घटनेमुळे शासनाच्या विकासकामांच्या दर्जावरही प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, निकृष्ट बांधकामामुळे नागरिकांच्या जीवाशी खेळ होत असल्याचा आरोप केला जात आहे.

तातडीने दुरुस्ती व सुरक्षा उपाययोजना राबवण्यात याव्यात, अन्यथा मोठी दुर्घटना घडण्याची शक्यता नाकारता येत नाही.



## संक्षिप्त वृत्त...



### उमरग्यात महात्मा बसवेश्वर जयंती उत्साहात साजरी

**उमरगा, दि.२१ एप्रिल -**
शहरातील अंतूबळी पतंगे सभागृह व नियोजित महात्मा बसवेश्वर पुतळा परिसरात जयंती सोहळा भक्तिभावाने व उत्साहात साजरा करण्यात आला. महात्मा बसवेश्वरांच्या प्रतिमेला श्रीफळ व पुष्पहार अर्पण करून पूजन करण्यात आले. यावेळी लिंगायत समाज संस्थेचे अध्यक्ष डॉ. मल्लिनाथ मलंग, सभापती विशाल काणेकर, नगरसेवक विजय दळगडे, बाबा मस्के, एम.ओ. पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती. दरवर्षीप्रमाणे याही वर्षी जयंती सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. कार्यक्रमासाठी प्रवीण माशाळकर, राजशेखर आरबळे, अर्जुन बिराजदार, बाबा औटी, करण पाटील, बालाजी कुडूबले, प्रदीप गिरीबा, शिवकांत पतगे आदींसह शिव-बसव प्रतिष्ठानच्या कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.



### तेरखेड्यात महात्मा बसवेश्वर यांना अभिवादन

**वाशी, दि.२१ एप्रिल -**
महान समाजसुधारक महात्मा बसवेश्वर यांच्या जयंतीनिमित्त तालुक्यातील तेरखेडा येथे उत्साहात कार्यक्रम पार पडला. गावातील मुख्य चौकात आकर्षक सजावट करून प्रतिमापूजन करण्यात आले. या प्रसंगी जि.प. सदस्य विकी चव्हाण, उपसरपंच कलाम पठाण, चेअरमन परशुराम घुले यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते. गावकऱ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून जयंती उत्सवाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.



### कळंब येथे 'बी.आर. आंबेडकर चषक २०२६' क्रिकेट स्पर्धा संपन्न

**कळंब, दि.२१ एप्रिल -**
भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त युनिक क्रिकेट असोसिएशन संचालित व कळंब स्पोर्ट्स अॅकॅडमी आयोजित 'बी.आर. आंबेडकर चषक २०२६' लेदर बॉल ट्वेंटी क्रिकेट स्पर्धा उत्साहात पार पडली. स्पर्धेत लातूर, बार्शी, अंबाजोगाई, बीड व कळंब येथील एकूण ६ संघांनी सहभाग नोंदवला. यात डीसीसी लातूर संघाने प्रथम क्रमांक पटकावला, तर कळंब स्पोर्ट्स अॅकॅडमी संघ उपविजेता ठरला. स्पर्धेत प्रथम बक्षीस ११,१३५ रूपये व ट्रॉफी, द्वितीय बक्षीस ७,१३५ रूपये व ट्रॉफी, तसेच तृतीय बक्षीस ५,१३५ रूपये व ट्रॉफी देण्यात आले. मालिकावीर, उत्कृष्ट फलंदाज, उत्कृष्ट गोलंदाज व सामनावीर यांनाही रोख पारितोषिक देण्यात आले. बक्षीस वितरण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी सतपाल बनसोडे, तुषार शिंदे, अनिल हजारे, घनश्याम खंदारे, दत्ता कवडे, विशाल वाघमारे यांच्यासह क्रीडाप्रेमी उपस्थित होते.



### स्वामी विवेकानंद विद्यामंदिर व बसवेश्वर विद्यालयात जयंती उत्साहात

**उमरगा, दि.२१ एप्रिल -**
श्री राष्ट्रीय शिक्षण प्रसारक संस्था संचलित स्वामी विवेकानंद प्राथमिक विद्यामंदिर व महात्मा बसवेश्वर माध्यमिक विद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने महात्मा बसवेश्वर यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमात प्रमुख वक्ते सुनील बडगिरे यांनी मार्गदर्शन करताना बसवेश्वरांच्या जीवनकार्याचा व समाजसुधारणेतील योगदानाचा आढावा घेतला. कर्मकांडापेक्षा सत्कमाला महत्त्व देण्याचा त्यांचा संदेश आजही प्रेरणादायी असल्याचे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी दाजीबा बिराजदार होते. यावेळी मुख्याध्यापिका सविता लोहार, गोपाळ आष्टे, संजय कोथळीकर उपस्थित होते. प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते प्रतिमापूजन करण्यात आले. सूत्रसंचालन महेश कुलकर्णी यांनी केले तर आभार सनी सगर यांनी मानले. कार्यक्रमास शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.

### वाहनधारकांकडून १.२६ लाख दंड वसूल

**धाराशिव, दि.२१ एप्रिल -**
शहर वाहतूक शाखा व संबंधित पोलीस ठाण्यांनी १९ एप्रिल रोजी प्रमुख रस्त्यांवर मोटार वाहन कायदा उल्लंघन करणाऱ्यांविरुद्ध विशेष मोहीम राबवली. या कारवाईत एकूण १५० प्रकरणांवर कारवाई करत १ लाख २६ हजार २५० रूपये इतके तडजोड शुल्क वसूल करण्यात आले. सदरील कारवाई धाराशिव शहर वाहतुक शाखेच्या अंतर्गत करण्यात आली.

## यमाई देवी मंदिरात चोरी; चांदीचा मुकुट व १.२१ लाखांचा मुद्देमाल लंपास

**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.२१ एप्रिल -**
तालुक्यातील टाकळी येथील यमाई देवी मंदिरात अज्ञात चोरट्यांनी कुलूप तोडून प्रवेश करत चांदीचा मुकुट, सोन्याचे दागिने व दानपेटीतील रोकड असा एकूण १ लाख २१ हजार रुपयांचा मुद्देमाल लंपास केल्याची घटना घडली आहे. या प्रकरणी परंडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत फिर्यादी रत्नमाला आशोक काळे (वय ५५, व्यवसाय सेवेकरी पुजारी, रा. टाकळी, ता. परंडा, जि. धाराशिव) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, दि.१७ एप्रिल रोजी सायंकाळी ७ ते दि.१८ एप्रिल रोजी सकाळी ७.३० वाजण्याच्या दरम्यान ही घटना घडली. अज्ञात व्यक्तीने मंदिराच्या गेटचे कुलूप तोडून आत प्रवेश केला. त्यानंतर देवीचा सुमारे दीड किलो वजनाचा चांदीचा मुकुट, ३ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने तसेच दानपेटीतील सुमारे १ हजार रुपये रोख रक्कम असा एकूण १,२१,००० रुपयांचा माल चोरून नेला.




या प्रकरणी फिर्यादीने दि.१८ एप्रिल रोजी दिलेल्या तक्रारीवरून परंडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस करीत आहेत.

## अणदूर येथे गावठी दारूसह एक जण ताब्यात

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.२१ एप्रिल -**
पोलीस ठाण्याच्या हद्दीत अणदूर येथील वत्सलानगर परिसरात अवैध गावठी दारू विक्रीप्रकरणी कारवाई करण्यात आली.

बाबु लोका राठोड (वय ६०, रा. वत्सलानगर, अणदूर, ता. तुळजापूर) याच्याकडून सुमारे ३४ लिटर गावठी दारू, किंमत अंदाजे ३,६०० रूपयांची जप्त करण्यात आली.

ही कारवाई १९ एप्रिल रोजी सायंकाळी करण्यात आली असून, आरोपीविरुद्ध महाराष्ट्र मद्य मनाई कायदा कलम ६५(ई) अन्वये नळदुर्ग पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला असून पुढील तपास पोलिस करीत आहेत.

## शासकीय कर्मचाऱ्यास मारहाण; कामात अडथळा निर्माण केल्याप्रकरणी गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.२१ एप्रिल -**
पंचायत समिती कार्यालयाजवळ शासकीय कामकाज करीत असलेल्या कर्मचाऱ्यास मारहाण करून कामात अडथळा निर्माण केल्याची घटना परंडा येथे घडली आहे. या प्रकरणी परंडा पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

याबाबत फिर्यादी युवराज बिभीषण भोसले (वय ३८, रा. सोनारी, ता. परंडा, जि. धाराशिव) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, दि.१६ एप्रिल रोजी दुपारी १ वाजण्याच्या सुमारास पंचायत समिती कार्यालय, परंडा येथे ते शासकीय कामकाज करीत होते.

दरम्यान, आरोपी अश्विनी बाबुराव मगर (रा. शेळगाव, ता. परंडा, जि. धाराशिव) यांनी कार्यालयाजवळील रस्त्यावर फिर्यादीस अडवून, तू शेळगाव येथे नेमणुकीस असताना माझ्या घराशेजारील सार्वजनिक ७ बाय ३३ जागा तुझ्या नावावर का केली नाही? असा जाब विचारत शिवीगाळ केली. त्यानंतर चापट मारून मारहाण केली व खोटी केस टाकण्याची धमकी देत शासकीय कामात अडथळा निर्माण केला.

या प्रकरणी फिर्यादीने दि.१९ एप्रिल रोजी दिलेल्या तक्रारीवरून परंडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस करीत आहेत.

## तरुणीचा गळा आवळून खून

**कर्जासाठी पैशांच्या मागणीचा आरोप; गुन्हा दाखल...**

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.२१ एप्रिल -**
उमरगा शहरातील डिग्गी रोड परिसरात एका २२ वर्षीय तरुणीचा गळा आवळून खून केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. कर्ज फेडण्यासाठी पैशांची मागणी करत सतत त्रास दिल्याच्या कारणावरून हा प्रकार घडल्याचा आरोप असून, या प्रकरणी उमरगा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



मयत पलक दत्ता कांबळे (वय २२, रा. उजळंब, ता. बसवकल्याण, जि. बीदर, राज्य कर्नाटक, सध्या वास्तव डिग्गी रोड, उमरगा) असे असून, त्या अनुसया व्यंकट सूर्यवंशी यांच्या राहत्या घरी राहत होत्या.

याबाबत फिर्यादी केशव धनाजी शिंदे (वय ४३, रा. कुंभार पट्टी, उमरगा) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, दि.१७ एप्रिल रोजी सकाळी ११.१९ वाजण्यापूर्वी आरोपी दत्ता शामराव कांबळे (वय २७, रा. उजळंब, ता. बसवकल्याण, जि. बीदर, सध्या वास्तव उमरगा) याने मयत पलक कांबळे हिच्याकडे कर्ज फेडण्यासाठी व दुचाकीचे दुकान सुरू करण्यासाठी आईकडून दोन लाख रुपये आणण्याची मागणी केली होती.

या कारणावरून तो वारंवार त्रास देत होता.

याच पार्श्वभूमीवर आरोपीने मयत हिचा कशाच्यातरी साहाय्याने गळा आवळून खून केल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे.

या प्रकरणी फिर्यादीने दि.१८ एप्रिल रोजी दिलेल्या तक्रारीवरून उमरगा पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला असून पुढील तपास पोलीस करीत आहेत.

## तेरखेडा येथे विनापरवाना तलवार बाळगणारे तिघेजण अटकेत

**तभा वृत्तसेवा**
**वाशी, दि.२१ एप्रिल -**
वाशी तालुक्यातील तेरखेडा येथे मध्यरात्रीच्या सुमारास सार्वजनिक ठिकाणी विनापरवाना तलवार बाळगून संशयास्पद हालचाली करणाऱ्या तिघांना पोलिसांनी ताब्यात घेत त्यांच्या विरोधात शस्त्र कायद्यांतर्गत गुन्हा दाखल केला आहे. या घटनेमुळे परिसरात काही काळ खळबळ उडाली.




पोलीसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, दि.१६ एप्रिल रोजी रात्री सुमारे ११.१० वाजता तेरखेडा येथील ब्रिजखालील बसस्थानक परिसरात काही युवक संशयास्पदरीत्या फिरत असल्याची माहिती स्थानिक गुन्हा शाखेच्या पथकाला मिळाली. माहितीची खातरजमा करण्यासाठी पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली.

यावेळी रेहान हरुण सय्यद (वय १९), मोहसीन शब्बीर सय्यद (वय ३१) व अब्दुल हरुण सय्यद (वय २१, सर्व रा. तेरखेडा) हे तिघे संशयास्पद हालचाली करताना आढळले. झडतीदरम्यान त्यांच्या ताब्यातून सुमारे ५०० रुपये किंमतीची लोखंडी तलवार आढळून आली. सदर शस्त्र कोणताही वैध परवाना न घेता बाळगण्यात आले होते.

पोलिसांनी तलवार जप्त करत तिघांनाही ताब्यात घेतले. या प्रकरणी पोलीस कर्मचारी संदेश पंडित शिरसागर (नेमणूक पोलीस ठाणे, भूम) यांच्या फिर्यादीवरून येरमाळा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास सुरू आहे.

दरम्यान, तलवार सापडल्यामुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, ही तलवार युवकांकडे नेमकी कुठून आली याबाबत नागरिकांमध्ये चर्चा सुरू आहे. तसेच परिसरात इतरांकडेही बेकायदेशीर शस्त्रे तर नाहीत ना, याची सखोल चौकशी करण्याची मागणी स्थानिकांकडून होत आहे.

## संतसहवासातून दुःखमुक्तीचा मार्ग : हभप. बाबासाहेब चौरे महाराज



**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.२१ एप्रिल -**
मनुष्याला दुःखातून मुक्त करण्यासाठी संतांचे मार्गदर्शन अत्यंत आवश्यक असून, संतांचा सहवास जीवनाला योग्य दिशा देतो, असे प्रतिपादन खंडाळ्याचे सुप्रसिद्ध कीर्तनकार हभप. बाबासाहेब चौरे महाराज यांनी केले.

येथील पत्रकार संघाचे अध्यक्ष सचिन ताकमोघे यांचे वडील स्व. प्रतापराव ताकमोघे यांच्या प्रथम पुण्यस्मरण दिनानिमित्त अक्षय तृतीया या पवित्र दिवशी किर्तन व भजन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी सिंदफळ येथील नृसिंह भजनी मंडळाने भावपूर्ण भजन सादर केले.

आपल्या कीर्तनात चौरे महाराज पुढे म्हणाले की, मनुष्याच्या जीवनातील दुःख दूर करून त्याला सुखप्राप्ती व्हावी यासाठी संत मार्गदर्शन करतात. मनुष्याचा देह नाशवंत असला तरी देव आणि देवाचे नामस्मरण हेच शाश्वत आहे. त्यामुळे जीवनातील प्रत्येक क्षणाचा सदुपयोग करून भगवंताचे नामस्मरण करणे आवश्यक आहे.

मनुष्याला ८४ लाख योनींमधून प्रवास केल्यानंतर हा मनुष्यजन्म लाभतो. हा जन्म सार्थ करण्यासाठी सत्कर्म आणि नामस्मरण हाच खरा मार्ग आहे, असेही त्यांनी सांगितले.

अक्षय तृतीया या दिवसाचे महत्त्व सांगताना त्यांनी नमूद केले की, राजा भगीरथाने गंगा पृथ्वीवर आणली तो दिवस अक्षय तृतीया मानला जातो.

तसेच व्यासांनी महाभारत लेखनासाठी निवडलेला दिवसही हाच असल्याचे मानले जाते. पूर्वजांचे स्मरण करण्यासाठीही हा दिवस पवित्र मानला जातो.

गरुड पुराणातील संदर्भ देत त्यांनी मृत्यूनंतर आत्म्याच्या प्रवासाचे वर्णन केले.

तेराव्या दिवशी केलेले विधी, तसेच वर्षश्राद्धानंतर आत्म्याला मुक्ती मिळते, असे त्यांनी सांगितले. त्यामुळे अशा प्रसंगी हरी चिंतन व सत्संगाचे आयोजन करणे आवश्यक असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

या कार्यक्रमास नागरिक व भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## 'मांजरा शुगर'मध्ये दिलीपराव देशमुख यांच्या वाढदिवसानिमित्त विविध उपक्रम



**तभा वृत्तसेवा**
**मंगरूळ, दि.२१ एप्रिल -**
तुळजापूर तालुक्यातील मंगरुळ येथील मांजरा शुगर इंडस्ट्रीज (कंचेश्वर) येथे माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांच्या ७६ व्या वाढदिवसानिमित्त विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले.

या निमित्ताने रक्तदान शिबीर, आरोग्य तपासणी, वृक्षारोपण, क्रीडा स्पर्धा, नवचंडी यज्ञ व महाप्रसाद वाटप असे कार्यक्रम पार पडले. भालचंद्र रक्तपेढी, लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित रक्तदान शिबिरात १०५ कर्मचाऱ्यांनी रक्तदान केले. कारखान्यातील विविध विभागांतील कर्मचाऱ्यांना पदोन्नती व पगारवाढ जाहीर करण्यात आली. तसेच आयोजित हॉलीबॉल स्पर्धेत डिस्टिलरी विभाग विजेता तर उत्पादन विभाग उपविजेता ठरला.

या प्रसंगी कारखान्याचे जनरल मॅनेजर सतीश वाकडे, तांत्रिक प्रमुख अजित कदम यांच्यासह अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

CMYK

# धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## १५ लाखांची खंडणी मागणी; मारहाण व जीवे मारण्याची धमकी

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२१ एप्रिल -**

वाशी तालुक्यातील सरमकुंडी शिवारात काम सुरू असताना कंपनीच्या अधिकाऱ्याकडे १५ लाख रुपयांची खंडणी मागून मारहाण व जीवे मारण्याची धमकी दिल्याची गंभीर घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी वाशी पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

याबाबत फिर्यादी गौरव सुहास भिंगाडे (वय ४३, रा. चिपळूण, जि. रत्नागिरी, सध्या वास्तव वाशी, ता. वाशी, जि. धाराशिव) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, दि. १८ एप्रिल २०२६ रोजी सायंकाळी ६.३० वाजण्याच्या सुमारास सरमकुंडी शिवारातील गट नं. १०८ व १०७ मधील सेरेटिका रिन्युएबल इंडिया ५ प्रा. लि. कंपनीच्या झिरो पॉइंटवर ते व इतर कर्मचारी कामकाज करीत होते. दरम्यान, आरोपी पृथ्वीराज रमेश गपाट (रा. इंदापूर, ता. वाशी, जि. धाराशिव) व त्याचे दोन अनोळखी साथीदार यांनी संगनमताने तेथे जबरदस्तीने प्रवेश केला. त्यांनी फिर्यादीकडे १५ लाख रुपयांची खंडणी मागणी करत शिवीगाळ केली व मारहाण केली. तसेच खंडणी न दिल्यास दिवसा भोसकून ठार मारण्याची धमकी दिली.

या प्रकरणी फिर्यादीने दि.१९ एप्रिल २०२६ रोजी दिलेल्या तक्रारीवरून वाशी पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला असून पुढील तपास पोलीस करीत आहेत.



## संक्षिप्त वृत्त...



### पाडोळीत अपघातात मृत्यू; कुटुंबाला १.०१ लाखांची मदत

**धाराशिव, दि.२१ एप्रिल -**

येथील रहिवासी व विद्युत दुरुस्तीचे काम करणारे शरद महादेव खराडे यांचे काम करत असताना दुर्दैवी अपघाती निधन झाले. मनमिळावू स्वभाव व सामाजिक कार्यकर्ते म्हणून ओळख असलेल्या खराडे यांच्या निधनामुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. त्यांच्या पश्चात आई-वडील, पत्नी रेखा, मुलगा शुभम, मुलगी आदिती व दोन भाऊ असा परिवार आहे. याप्रसंगी रुपामाता उद्योग समूहाच्या वतीने त्यांच्या कुटुंबाला १,०१,००० ची आर्थिक मदत देण्यात आली. जि.प. धाराशिवचे माजी उपाध्यक्ष सुधाकर गुंड गुरुजी व ॲड. अजित गुंड पाटील यांच्या हस्ते हा धनादेश सुपूर्द करण्यात आला. यावेळी ॲड. शरद गुंड पाटील, अमोल गुंड पाटील, विशाल गुंड पाटील, संदीप गुंड पाटील यांच्यासह इतर उपस्थित होते. तसेच शुभम खराडे याला शिक्षण पूर्ण झाल्यानंतर रुपामाता उद्योग समूहात नोकरी देण्याचे आश्वासन देण्यात आले.



### महात्मा बसवेश्वर जयंतीनिमित्त पुतळ्याच्या उभारणीसाठी भूमिपूजन

**उमरगा, दि.२१ एप्रिल -**

जगतज्योती महात्मा बसवेश्वर महाराज यांच्या ८९५ व्या जयंतीनिमित्त तालुक्यातील एकुरगा येथे भक्तिमय वातावरणात भव्य सोहळा पार पडला. यावेळी महात्मा बसवेश्वर महाराजांच्या पूर्णाकृती पुतळ्याच्या उभारणीसाठी भूमिपूजन करण्यात आले. या पुतळ्यासाठी शरण पाटील फाउंडेशनच्या माध्यमातून १५ लाखांचा निधी देण्यात आला असून, उमरगा जनता सहकारी बँकेचे चेअरमन शरण पाटील यांच्या हस्ते भूमिपूजन संपन्न झाले. कार्यक्रमात महात्मा बसवेश्वर यांच्या समता, बंधुता व सामाजिक न्यायाच्या विचारांचा जागर करण्यात आला. तसेच 'अनुभव मंटप'च्या माध्यमातून दिलेल्या लोकशाही व समतेच्या संदेशाचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले. याप्रसंगी आमदार प्रवीण स्वामी यांच्यासह विविध मान्यवर व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.



### तुळजापूरात महात्मा बसवेश्वर जयंती उत्साहात साजरी

**तुळजापूर, दि.२१ एप्रिल -**

१२ व्या शतकातील क्रांतीसूर्य महात्मा बसवेश्वर यांची जयंती शहरात विविध ठिकाणी उत्साहात साजरी करण्यात आली. नळदुर्ग रोडवरील महात्मा बसवेश्वर चौकात उपनगराध्यक्ष रामचंद्र रोचकरी व विशाल रोचकरी यांच्या हस्ते प्रतिमापूजन करण्यात आले. वीरशैव जंगम मठात गौरीशंकर साखरे यांच्या हस्ते महात्मा बसवेश्वर, छत्रपती शिवाजी महाराज व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांना अभिवादन करण्यात आले. यावेळी विविध मान्यवर व समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. नगरपरिषद कार्यालयातही उपाध्यक्ष रामचंद्र रोचकरी, नगरसेवक पंडितराव जगदाळे व विशाल रोचकरी यांच्या उपस्थितीत जयंती साजरी करण्यात आली. तसेच शहरातील विविध शासकीय कार्यालये व संघटनांच्या वतीनेही जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.

## हरीत क्रांतीचा प्रेरणादायी वारसा जपला जाणार : आ. राणादादा

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.२१ एप्रिल -**

हरीत क्रांतीचे शिल्पकार व महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री कै. वसंतराव नाईक यांचे नळदुर्ग येथे उभारण्यात येत असलेले स्मारक हे केवळ बांधकाम नसून हरीत क्रांतीच्या प्रेरणादायी इतिहासाची साक्ष देणारे ठरेल, असे प्रतिपादन आमदार राणा जगजितसिंह पाटील यांनी केले.





नळदुर्ग येथील गोलाई चौकात उभारण्यात येत असलेल्या वसंतराव नाईक यांच्या भव्य स्मारक व पुतळा उभारणीच्या कामाची पाहणी करताना ते बोलत होते. आमदार पाटील यांच्या प्रयत्नांतून या स्मारकास मंजुरी मिळाली असून सध्या काम वेगात सुरू आहे. यावेळी आमदार पाटील यांनी कामाची पाहणी करून संबंधित अधिकाऱ्यांना सूचना देत, स्मारकाचे काम दर्जेदार, भव्य आणि वेळेत पूर्ण करावे, तसेच याकडे नगराध्यक्ष बसवराज धरणे यांनी विशेष लक्ष द्यावे, असे निर्देश दिले. पुढे बोलताना त्यांनी सांगितले की, राष्ट्रीय महामार्गालगत गोलाई चौकात उभारण्यात येणारे हे स्मारक नळदुर्ग शहराच्या वैभवात भर घालणारे ठरणार असून भावी पिढ्यांसाठी प्रेरणास्थान ठरेल.

यावेळी नगराध्यक्ष बसवराज धरणे, उपनगराध्यक्ष नय्यर जहागीरदार, जिल्हा परिषद बांधकाम समितीचे सभापती सिद्धेश्वर कोरे, ॲड. आशिष सोनटक्के, ॲड. दीपक आलुरे, बबन चौधरी, विलास राठोड, विजय शिंगाडे, दयानंद मुडके तसेच भाजपचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## वाशी तालुक्यात 'विंड वर्ल्ड' पुन्हा सुरु होण्याच्या तयारीत

### थकीत देणीवरून स्थानिकांचा आक्षेप

**तभा वृत्तसेवा**
**वाशी, दि.२१ एप्रिल -**

धाराशिव जिल्ह्यातील वाशी तालुक्यात पवनऊर्जा क्षेत्राला पुन्हा एकदा गती मिळताना दिसत आहे. तब्बल बारा वर्षांपासून बंद असलेली 'विंड वर्ल्ड' कंपनी पुन्हा कार्यान्वित होण्याच्या तयारीत असून, यामुळे परिसरात विकासाच्या नव्या अपेक्षा निर्माण झाल्या आहेत.

राज्यात सध्या पवनऊर्जा निर्मिती प्रकल्पांना मोठ्या प्रमाणावर चालना मिळत असून, दुष्काळी भाग म्हणून ओळखल्या जाणाऱ्या वाशी तालुक्यातही विविध कंपन्यांकडून पवनचक्की प्रकल्प उभारणीचे काम सुरू आहे. सेरेंटिका, रिन्यूएबल आणि टाटा यांसारख्या कंपन्यांनी येथे कामांना गती दिली आहे. राज्याचे मुख्यमंत्री ऊर्शींशपवीर ऋरवपर्रीळी यांच्या नेतृत्वाखाली ऊर्जा आणि पायाभूत सुविधांमध्ये वेगाने विकास होत असल्याचे चित्र दिसत आहे.

या पार्श्वभूमीवर २०१२ पासून बंद असलेली 'विंड वर्ल्ड' कंपनी पुन्हा सुरू होणार असल्याची माहिती समोर आली आहे. कंपनीकडून मसोबाच्या वाडी परिसरातील सब-स्टेशनची दुरुस्ती व देखभाल सुरू करण्यात आली असून, बंद पडलेल्या पवनचक्क्यांच्या दुरुस्तीचे कामही लवकरच हाती घेतले जाणार असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले.

मात्र, या घडामोडींमुळे स्थानिक शेतकरी आणि तरुणांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. बारा वर्षांपूर्वी कंपनीने कामे बंद करताना अनेक शेतकऱ्यांचे भाडे, पगारी वाहने तसेच जमिनींची देणी थकवून निघून गेल्याचा आरोप स्थानिकांकडून करण्यात येत आहे. त्यामुळे आधी थकीत देणी द्या, मगच कामे सुरू करा अशी ठाम भूमिका नागरिकांनी घेतली आहे.

जर थकीत देयकांचा प्रश्न मार्गी लावला गेला नाही, तर कंपनीच्या नव्या प्रकल्पांना स्थानिकांकडून विरोध होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. त्यामुळे कंपनीसमोर प्रकल्प पुन्हा सुरू करण्यासोबतच स्थानिकांचा विश्वास मिळवण्याचे मोठे आव्हान उभे राहिले आहे.

## हरित उपक्रमांसाठी व्यंकटेश महाजन महाविद्यालयाला 'हरित महाविद्यालय पुरस्कार'



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२१ एप्रिल -**

छत्रपती संभाजीनगर येथील मौलाना आज़ाद महाविद्यालय येथे आयोजित शिक्षणतज्ज्ञांच्या राष्ट्रीय संमेलनात हरित मंडळ (ग्रीन क्लब) उपक्रमांच्या उत्कृष्ट सादरीकरणाबद्दल व्यंकटेश महाजन वरिष्ठ महाविद्यालय, धाराशिवला 'हरित महाविद्यालय पुरस्कार' प्रदान करण्यात आला.

हा पुरस्कार महाविद्यालयातील हिंदी विभागप्रमुख प्रा. डॉ. विनोदकुमार वायचळ यांना देऊन त्यांचा गौरव करण्यात आला. यावेळी महात्मा गांधी मिशन अभिमत विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगरचे कुलगुरू प्रो. डॉ. विलास सपकाळ, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे व्यवस्थापन समिती सदस्य प्रो.डॉ. गजानन सानप तसेच मौलाना आझाद महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. डॉ. मजहर फारुकी यांच्या हस्ते सन्मानपत्र व सत्कार करण्यात आला. या यशाबद्दल महाविद्यालयाच्या मार्गदर्शिका रेखाताई महाजन, संस्था सचिव ॲड. मिलिंद पाटील, शेषाद्री डांगे, कमलाकर पाटील, डॉ. अभय शहापूरकर तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रशांत चौधरी यांच्यासह प्राध्यापक व कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले आहे.

महाविद्यालयाच्या हरित उपक्रमांना मिळालेल्या या राष्ट्रीय पातळीवरील सन्मानामुळे परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

## नागेवाडीत जटागीर बाबा यात्रा उत्साहात

**तभा वृत्तसेवा**
**भूम, दि.२१ एप्रिल -**

तालुक्यातील नागेवाडी येथे ग्रामदैवत श्री जटागीर बाबा महाराज यांची यात्रा धार्मिक व सामाजिक कार्यक्रमांनी उत्साहात पार पडली.

चैत्र अमावस्येच्या दिवशी काल्याचे कीर्तनानंतर हजारो भाविकांसाठी महाप्रसाद वाटप करण्यात आले. रात्री पालखी मिरवणूक वाजतगाजत काढून पारंपरिक मान असलेल्या घाटे यांच्या वाड्यावर पूजा-अर्चा करण्यात आली. पालखी मिरवणूक गावातून काढण्यात आली. यावेळी तरुणांनी विविध सोंगे सादर केली, तर महिला मंडळाचाही उत्स्फूर्त सहभाग लाभला. दुपारी महाआरती, शेरणी वाटप तसेच महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले. यात्रेनिमित्त भारूड कुस्ती स्पर्धाही पार पडली.

## मानेवाडी ग्रामपंचायतीच्या सरपंचपदी मनोहर माने बिनविरोध



**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.२१ एप्रिल -**

तुळजापूर तालुक्यातील मानेवाडी ग्राम पंचायतीच्या सरपंचपदी भाजपचे कार्यकर्ते व आमदार ठरपर गरसक्षळींीळपह झरींळश्र यांचे समर्थक मनोहर यशवंत माने यांची बिनविरोध निवड झाली आहे. त्यांच्या निवडीनंतर भाजप कार्यकर्त्यांनी गुलाल उधळून व फटाक्यांची आतषबाजी करून जल्लोष साजरा केला.

मानेवाडी ग्रामपंचायतीचे तत्कालीन सरपंच नेहरू दशरथ बंडगर यांना मासिक बैठक न घेतल्याच्या कारणावरून धाराशिव जिल्हाधिकाऱ्यांनी अपात्र ठरवले होते. त्यानंतर सरपंचपद रिक्त झाले होते. या रिक्त पदासाठी जाहीर करण्यात आलेल्या पोटनिवडणुकीत मनोहर माने यांचा एकमेव अर्ज दाखल झाल्याने सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी त्यांची बिनविरोध निवड जाहीर केली.

निवड जाहीर होताच कार्यकर्ते व समर्थकांनी मोठ्या उत्साहात जल्लोष साजरा केला. ग्राम पंचायतीचे माजी सरपंच सुनिल खटके, शहाजी हाक्के यांच्यासह ग्रामस्थांनी नूतन सरपंचांचा सत्कार करून स्वागत केले.

गेल्या अनेक वर्षांपासून सरपंचपद रिक्त असल्यामुळे गावच्या विकासकामांवर परिणाम झाला होता. मात्र आता मनोहर माने यांच्या निवडीमुळे विकासकामांना गती मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

## लोहाऱ्यात ठाकरे शिवसेनेत नाराजीचा स्फोट

### तालुकाध्यक्ष शेखर पाटील यांचा राजीनामा...

**तभा वृत्तसेवा**
**लोहारा, दि.२१ एप्रिल -**

लोहारा तालुक्यात शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे गट) मध्ये नाराजीचे राजकारण चांगलेच तापले असून, पक्षाशी एकनिष्ठ राहिलेले शेतकरी सेनेचे तालुकाध्यक्ष शेखर पाटील यांनी आपल्या पदाचा राजीनामा देत असंतोष व्यक्त केला आहे. त्यांच्या या निर्णयामुळे तालुक्यातील राजकीय वातावरण ढवळून निघाले असून शिवसैनिकांमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे.

पत्रकार परिषदेत बोलताना पाटील यांनी लोहारा-उमरगा मतदारसंघाचे आमदार प्रवीण स्वामी यांच्या कार्यपद्धतीवर थेट टीका करत तीव्र नाराजी व्यक्त केली. लोकसभा व विधानसभा निवडणुकांमध्ये मतदारांनी मोठा विश्वास दाखवून लीड दिला, मात्र आश्वासने पूर्ण न झाल्याने जनतेत भ्रमनिरास निर्माण झाल्याचे त्यांनी स्पष्ट केले. मतदार आम्हाला प्रश्न विचारतात, पण उत्तर द्यायला आमच्याकडे काहीच उरत नाही, अशी खंत त्यांनी व्यक्त केली.

तालुक्यातील अनेक विकासकामे अर्धवट असल्याचा मुद्दा त्यांनी मांडत शेतरस्त्यांची दुरवस्था, मूलभूत सुविधांचा अभाव आणि प्रशासनावर आमदारांचा प्रभाव नसल्याची चर्चा यामुळे जनतेचा रोष वाढत असल्याचे सांगितले. संबंधित अधिकाऱ्यांवर अंकुश नसलेला आमदार जनतेच्या प्रश्नांना न्याय कसा देणार? असा सवालही त्यांनी उपस्थित केला. पाटील यांनी स्पष्ट केले की, त्यांनी पक्षाशी कधीही गद्दारी केली नाही आणि पुढेही करणार नाहीत. मात्र, निर्णय प्रक्रियेत जुन्या पदाधिकाऱ्यांना डावलून मोजक्या लोकांमध्येच चर्चा होत असल्याने अनेक शिवसैनिक नाराज असल्याचे त्यांनी नमूद केले. रस्ता रोको, मोर्चे काढून जनतेच्या प्रश्नांसाठी लढा दिल्यानंतरही कार्यकर्त्यांना दुय्यम स्थान दिले जात असल्याची खंत त्यांनी व्यक्त केली. तालुक्याच्या विकासासंदर्भात लोहारा तालुक्यातून वगळलेली गावे पुन्हा समाविष्ट करणे, रेस्ट हाऊस, बसस्थानक, रस्ते, वीजपुरवठा तसेच माकणी येथून लोहारा शहराला कायम स्वरूपी पाणीपुरवठा यांसारख्या मुद्द्यांवर आमदारांनी ठोस भूमिका घ्यावी, अशी मागणी त्यांनी केली. मात्र या विषयांवर अपेक्षित प्रतिसाद मिळत नसल्याचा आरोप त्यांनी केला. तालुक्यातील प्रलंबित प्रश्न सोडवण्यासाठी लवकरच सामाजिक संघटनेच्या माध्यमातून तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही त्यांनी प्रशासनाला दिला. जनतेच्या प्रश्नांवर मौन धारण करणाऱ्यांना जागं करण्यासाठी रस्त्यावर उतरावं लागेल, असे ते म्हणाले.

दरम्यान, या घडामोडींमुळे लोहारा तालुक्यात ठाकरे शिवसेनेतील अंतर्गत मतभेद उघडकीस आले असून, येणाऱ्या काळात या नाराजीचे राजकीय परिणाम काय होणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## उमरगा तालुक्यात उन्हाचा कडाका वाढला; नागरिकांना सतर्क राहण्याचा आरोग्य विभागाचा इशारा

**आकाश पोतदार**
**उमरगा, दि.२१ एप्रिल -**


एप्रिल महिन्याच्या उत्तरार्धातच उमरगा तालुक्यात उन्हाचा कडाका प्रचंड वाढला असून तापमानाने धोकादायक पातळी गाठण्यास सुरुवात केली आहे. सकाळपासूनच अंगाची लाही लाही करणारे ऊन जाणवत असून दुपारच्या सुमारास परिस्थिती अधिकच तीव्र होत आहे. उष्णतेमुळे नागरिकांचे दैनंदिन जीवन विस्कळीत झाले असून बाजारपेठा व रस्ते दुपारच्या वेळेत ओस पडत आहेत.

सध्या उष्माघात, चक्कर येणे, अशक्तपणा, मळमळ अशा तक्रारींमध्ये वाढ होण्याची शक्यता व्यक्त होत आहे. वाढत्या तापमानामुळे शरीरातील पाण्याचे प्रमाण झपाट्याने कमी होत असून डिहायड्रेशनचा धोका निर्माण झाला आहे. त्यामुळे नागरिकांनी या काळात अधिक सतर्क राहण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

विशेषतः दुपारी १२ ते ४ या वेळेत शक्यतो बाहेर पडणे टाळावे. अत्यावश्यक काम असल्यासच बाहेर पडावे आणि त्या वेळी डोके झाकण्यासाठी छत्री, टोपी, दुपट्टा किंवा पांढरा शेला वापरावा. थेट सूर्यप्रकाशापासून स्वतःचे संरक्षण करणे अत्यंत गरजेचे आहे. उन्हाळ्यात शरीराला पाण्याची जास्त गरज भासते. त्यामुळे तहान लागली नसली तरी वेळोवेळी पाणी पिण्याची सवय ठेवावी. लिंबूपाणी, ताक, लस्सी, ओआरएस यांसारख्या द्रवपदार्थांचा आहारात समावेश करावा. प्रवास करताना किंवा बाहेर पडताना पाण्याची बाटली सोबत ठेवणे आवश्यक आहे. आहाराबाबतही विशेष काळजी घेणे गरजेचे आहे. शिळे अन्न टाळावे तसेच जड, मसालेदार पदार्थांचे सेवन कमी करावे. दुपारच्या वेळेत चहा, कॉफी व गॅसयुक्त शीतपेये टाळणे फायदेशीर ठरते, कारण त्यामुळे शरीरातील पाणी कमी होऊ शकते. घरातील उष्णता कमी ठेवण्यासाठी दिवसा पडदे, झडपा किंवा सनशेडचा वापर करावा. थेट सूर्यप्रकाश घरात येऊ नये याची काळजी घ्यावी. रात्री खिडक्या उघड्या ठेवून हवा खेळती राहील याची व्यवस्था करावी. पंखे, कुलर किंवा एसीचा योग्य वापर करून घरातील वातावरण थंड ठेवावे. हलके, सैल आणि पांढऱ्या रंगाचे सूती कपडे परिधान करणेही उपयुक्त ठरते. उन्हात काम करणाऱ्या मजूर व कामगारांनी अधिक काळजी घेणे आवश्यक आहे. शक्यतो कडक उन्हात काम टाळावे. काम करताना डोके व चेहरा ओल्या कापडाने झाकल्यास उष्णतेचा परिणाम कमी होऊ शकतो. मध्ये मध्ये विश्रांती घेणेही तितकेच महत्त्वाचे आहे. गरोदर महिला, लहान मुले, वयोवृद्ध आणि आजारी व्यक्तींसाठी हा काळ अधिक धोकादायक ठरू शकतो. त्यामुळे या गटातील व्यक्तींना विशेष जपणे आवश्यक आहे. त्यांना थेट उन्हापासून दूर ठेवावे आणि पुरेशा प्रमाणात पाणी व द्रवपदार्थ द्यावेत.

दरम्यान, चक्कर येणे, डोके गरगरणे, मळमळ किंवा अशक्तपणा जाणवत असल्यास त्वरित सावलीत जाऊन विश्रांती घ्यावी. लक्षणे गंभीर वाटल्यास ताबडतोब वैद्यकीय सल्ला घेणे आवश्यक आहे. पाळीव प्राणी आणि गुरेढोरे यांनाही उष्णतेचा फटका बसत आहे. त्यांना सावलीत ठेवणे व पुरेसे पाणी देणे गरजेचे आहे. ग्रामीण भागात शेतकऱ्यांनी जनावरांसाठी पाण्याची व सावलीची योग्य व्यवस्था करावी.

उमरगा तालुक्यातील वाढत्या उष्णतेच्या पार्श्वभूमीवर प्रत्येकाने स्वतःची काळजी घेणे अत्यावश्यक ठरत आहे.




> सध्या वाढत्या उष्णतेमुळे उष्माघात, डिहायड्रेशन, चक्कर येणे, अशक्तपणा यांसारख्या तक्रारींमध्ये वाढ होण्याची शक्यता आहे. नागरिकांनी भरपूर पाणी पिणे, दुपारच्या कडक उन्हात बाहेर जाणे टाळणे आणि हलका, पचायला सोपा आहार घेणे आवश्यक आहे. लहान मुले, वयोवृद्ध आणि गरोदर महिलांनी अधिक सतर्क राहावे. उष्माघाताची लक्षणे जाणवल्यास विलंब न करता त्वरित उपचार घेणे महत्त्वाचे आहे.
>
> **- कोमल गरड (जाधव),** वैद्यकीय अधीक्षक